CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २१ एप्रिल २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १६३ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### कॉर्पोरेट मंत्रालयाकडून जेनसोलविरुद्ध चौकशी सुरू

**नवी दिल्ली** : कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जेनसोल इंजिनिअरिंगविरुद्ध स्वतःहून चौकशी सुरू केली आहे. सेबीने कंपनीच्या प्रवर्तकांवर बंदी घातल्यानंतर मंत्रालयाने ही चौकशी सुरू केली आहे. कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालय जेनसोलच्या आर्थिक नोंदी आणि एक्सचेंज फाइलिंग्जची तपासणी करत आहे. प्रत्यक्षात कंपनीवर ९७५ कोटी रुपयांच्या व्यवसाय कर्जाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. यामुळे, या वर्षी कंपनीचा शेअर सुमारे ८५ टक्क्यांनी घसरला आहे. जेनसोलच्या शेअर्सच्या किमतींमध्ये फेरफार आणि निधी वळवण्याच्या तक्रारींनंतर सेबीने जून २०२४ मध्ये चौकशी सुरू केली. तपासादरम्यान, सेबीला असे आढळून आले की कंपनीच्या प्रवर्तकांनी वैयक्तिक वापरासाठी निधी वळवला.

### विमानतळावर इंडिगो विमानाला ट्रॅव्हल्सची धडक

**बंगळुरू** : बंगळुरूमधील केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका ट्रॅव्हल्सने उभ्या असलेल्या इंडिगो विमानाला धडक दिली. यासंदर्भातील व्हिडीओ समाज माध्यमावर प्रसारित झाला आहे. विमानतळाच्या अल्फा पार्किंग बे ७१ येथे हा अपघात झाला. विमानतळ प्रशासनाने सांगितले की, ही ट्रॅव्हल्स विमानतळ कर्मचाऱ्यांना सोडण्यासाठी वापरली जात होती. इंडिगोने आपल्या निवेदनात म्हटले की, चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाला. यात चालकाला किरकोळ दुखापत झाली असून विमानाचे किती नुकसान झाले आहे याचा अंदाज घेण्यात येत आहे. विमानतळ प्रशासनाने सांगितले की, या अपघाताची माहिती डीजीसीए अर्थात् नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला देण्यात आली आहे आणि या प्रकरणाची चौकशी केली जात आहे.

### 'फोनपे'ने बदलले नाव

**मुंबई** : भारतातील आघाडीची डिजिटल पेमेंट कंपनी फोनपेने आपल्या बहुप्रतीक्षित आयपीओच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे आणि स्वत:ला प्रायव्हेट लिमिटेडकडून पब्लिक लिमिटेड कंपनीत रुपांतरित केले आहे. कंपनीने संचालक मंडळाच्या बैठकीत या बदलाला मंजुरी दिली. कंपनीने आपले नावही बदलले असून आता ती कंपनी 'फोनपे लिमिटेड' या नावाने ओळखली जाणार आहे. मात्र, हा बदल सध्या कंपनीच्या सदस्यांच्या विशेष ठरावाच्या तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या सेंट्रल प्रोसेसिंग सेंटरच्या मंजुरीच्या अधीन आहे.

### झांबिया विमानतळावर भारतीय नागरिकाला अटक

**लुसाका** : आफ्रिकन देश झांबिया येथील केनेथ कौंडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका भारतीय नागरिकाला अटक करण्यात आली असून त्याच्या सुटकेसमधून २० कोटी रोख आणि ४ कोटी किंमतीचे सोने जप्त करण्यात आले. आरोपी दुबईला जाण्याच्या तयारीत होता. विमानतळ अधिकाऱ्याने सांगितले की, २७ वर्षीय भारतीय नागरिक दुबईला जाण्यासाठी विमानतळावर पोहोचला. विमानतळावर तपासणीदरम्यान सुरक्षा अधिकाऱ्यांना त्याच्यावर संशय आला. त्याच्याकडील सुटकेसची तपासणी केली असता, त्यात २.३२ मिलियन डॉलर्स म्हणजेच १९ कोटी रुपये आणि ५ लाख डॉलर्स म्हणजेच ४ कोटी रुपये किंमतीच्या ७ सोन्याच्या विटा आढळल्या. त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून रोख रक्कमेसह सोने जप्त करण्यात आले.

### प्राध्यापकावर लैंगिक छळाचा आरोप

**नवी दिल्ली** : जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने (जेएनयू) स्कूल ऑफ इंटरनॅशनल स्टडीजचे प्राध्यापक स्वर्ण सिंग यांना निलंबित केले आहे. जपान दूतावासातील एका अधिकाऱ्याने प्राध्यापक सिंग यांच्याविरुद्ध लैंगिक छळाची तक्रार दाखल केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. जेएनयू कौन्सिलच्या बैठकीत हे मांडण्यात आले आणि विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीने (आयसीसी) केलेल्या चौकशीनंतर हा निर्णय घेण्यात आला. जेएनयूच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, प्राध्यापक दूतावासातील अधिकाऱ्याच्या सतत संपर्कात होते. त्या अधिकाऱ्याने तक्रार केली आहे की प्राध्यापक तिला त्रास देत असत. त्यांनी अंतर्गत तक्रार समितीकडे तक्रार दाखल केली आणि पुरावा म्हणून त्यांच्या संभाषणाचे रेकॉर्डिंग देखील दिले.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ४३.0 | २७.५ |
| अमरावती | ४४.४ | २६.१ |
| भंडारा | ४४.१ | २५.० |
| बुलडाणा | ३९.६ | २६.४ |
| चंद्रपूर | ४४.६ | -.- |
| गडचिरोली | ४२.६ | २३.६ |
| गोंदिया | ४२.२ | २४.८ |
| नागपूर | ४४.० | २४.० |
| वर्धा | ४४.० | २७.४ |
| वाशीम | ४२.६ | -.- |
| यवतमाळ | ४३.६ | २७.४ |

# जनतेने नाकारल्यानेच ठाकरेंची धडपड

## भाजप नेत्याची उबाठा-मनसेच्या संभाव्य युतीवर टीका

◆ **मुंबई, २० एप्रिल**

उद्धव ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येण्याबाबतच्या चर्चा राज्यात जोरात रंगल्या आहेत. उद्धव आणि राज या दोघांनीही युतीबाबत सकारात्मक भूमिका घेतली असताना भारतीय जनता पक्षाचे नेते अतुल भातखळकर यांनी मात्र यावर खोचक शब्दात टीका केली आहे.



दोघेही भाऊ एकत्र आले तर आम्हाला आनंदच होईल. आपसातील वाद, भांडणे मिटवून एकत्र काम करण्यास तयार असतील तर वाईट वाटून घेण्यासारखे काहीच नाही. या मुद्यावर आम्ही काय बोलणार ? त्यांनी ऑफर दिली, त्यांनी अटी ठेवल्यावर तेच बोलू शकतील, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. अतुल भातखळकर यांनी उबाठा आणि मनसे या दोघांनाही जनतेने नाकारले आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या हिताचा मुद्दा नाही. सध्या महायुती महाराष्ट्राचे हित उत्तमरीत्या जपत आहे, अशा शब्दात टोला हाणला. राजकीय वर्तुळातून उद्धव-राज यांच्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनीही ते दोघे बंधू एकत्र येत असतील तर आनंदच आहे. मराठी माणसासाठी ही चांगली गोष्ट आहे. मी आणि बाळा नांदगावकर यांनी दोघे एकत्र राहावेत म्हणून खूप प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर राज ठाकरे यांनीही अनेकदा टाळी देण्याचा प्रयत्न केला पण उद्धव यांनी प्रतिसाद दिला नाही. खरे तर जेव्हा महाबळेश्वर येथे झालेल्या बैठकीत जर उद्धव ठाकरेंऐवजी राज यांच्याकडे धुरा सोपविली असती तर शिवसेना फुटलीच नसती, असेही रामदास कदम म्हणाले.

ठाकरे घराण्यावर सातत्याने टीका करणारे मंत्री नितेश राणे यांनी पुन्हा एकदा उद्धव यांच्यावर वैयक्तिक पातळीवर टीका केली. राज यांच्याशी युती करायची असल्यास उद्धव यांना बायकोला विचारावे लागेल, असे राणे म्हणाले. (वृत्तसंस्था)

### सर्वच घराणी एकत्र आली पाहिजेत : भुजबळ

केवळ राज आणि उद्धव ठाकरेच नव्हे तर सर्वच राजकीय घराणी एकत्र आली पाहिजेत, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. दोघे ठाकरे बंधू एकत्र आल्यास राज्यातील वातावरणात एक वेगळेच वातावण निर्माण होईल. विशेष मराठी माणसाला राज-उद्धव एकत्र यावेत, असे मनापासून वाटते, असे भुजबळ म्हणाले.



तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी नियुक्ती झाल्यानंतर शैलेश पांडे यांनी रविवारी पदभार स्वीकारला. एमआयडीसी येथे झालेल्या या पदग्रहण समारंभाला प्रबंध संचालक धनंजय बापट आणि कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शैलेश पांडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले

# जायचे होते दिल्लीला, विमान उतरले जयपूरला

## विमान कंपनीच्या गैरव्यवस्थापनावर ओमर अब्दुल्ला संतापले

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला विमानाने राजधानी दिल्लीसाठी निघाले, पण विमान कंपनीच्या गैरव्यवस्थापनामुळे त्यांना जयपूरमध्ये उतरावे लागले.

शनिवारी रात्री इंडिगोचे विमानातून ओमर अब्दुल्ला जम्मू येथन दिल्लीला रवाना झाले. परंतु दिल्ली विमानतळावर विमानांची गर्दी असल्याने विमान उतरण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे विमान दिल्लीत उतरू शकले नाही आणि विमान थेट जयपूरला वळवण्यात आले. तिथे रात्री उशिरा १ वाजता विमान पोहचले. विमानातून उतरल्यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ली यांचा पारा चढला. त्यांनी एक सेल्फी शेअर करत समाज माध्यमावर संतप्त भावना व्यक्त केल्या.

दिल्ली विमानतळ म्हणजे एक संपूर्ण गोंधळाची परिस्थिती आहे. जम्मूहून निघाल्यानंतर ३ तास हवेत फिरवून आम्हाला जयपूरला वळवले. आता मी विमानाच्या जिन्यावर उभा राहून थोडी ताजी हवा घेत आहे. येथून कधी निघणार, काहीच कल्पना नाही, असे अब्दुल्ली यांनी पोस्टमध्ये म्हटले. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशने मोडला भारतासोबतचा करार

## दक्षिण त्रिपुरातील मुहुरी नदीजवळ धरणाचे सुरू केले बांधकाम

◆ **अगरतळा, २० एप्रिल**

बांगलादेशमधील काळजीवाहू सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीब उर रहमान आणि तत्कालीन भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यात झालेल्या कराराचे उल्लंघन करून दोन्ही देशाच्या सीमेवरील दक्षिण त्रिपुरातील मुहुरी नदीवर धरण बांधण्यास सुरुवात केली आहे. ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबध बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बांगलादेशकडून बांधण्यात येणार महुरी नदीवरील धरण १.५ किलोमीटर लांब आणि २० फूट उंच आहे. या धरणामुळे भारताच्या हद्दीतील भूभागाला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच बांगलादेशने उचललेल्या या पावलामुळे स्थानिक लोकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या भागातील स्थानिक आमदार दीपांकर सेन यांनी याबाबत आवाज उठवला असून, केंद्रीय गृहमंत्रालयाने हस्तक्षेप करून तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी केली. सेन यांनी सांगितले की, बांगलादेशच्या स्थापनेच्या वेळी मुजीब उर रहमान आणि भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यात एक करार झाला होता. या करारानुसार सीमारेषेवर झीरो लाईनपासून १५० यार्ड अंतरामध्ये कुठलेही बांधकाम होणार नाही, असे निश्चित करण्यात आले होते. मात्र बांगलादेशकडून आता उभारण्यात येत असलेले धरण हे सीमेवरील झीरो लाईनपासून केवळ ५० यार्ड अंतरावर आहे.

अनेक ठिकाणी हे अंतर केवळ १० यार्ड एवढेच आहे. बांगलादेशकडून जाणीवपूर्वक या धरणांचे बांधकाम केले जात आहे, असा आरोप सेन यांनी केला. दक्षिण त्रिपुराचे पोलिस आयुक्त सी. सेन यांनी सांगितले की, बांगलादेश या प्रकल्पावर वेगाने काम करत आहे. तसेच ज्या ठिकाणी हे धरण बांधले जात आहे, त्या भागात ५०० हून अधिक कुटुंबीयांचे वास्तव्य आहे. (वृत्तसंस्था)

### शेख हसीनांविरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी करणार



**ढाका** : बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यासह १२ लोकांविरुद्ध पोलिसांच्या राष्ट्रीय केंद्रीय ब्युरोने इंटरपोलला १२ लोकांविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस जारी करण्याची विनंती केली आहे. सहाय्यक पोलिस महानिरीक्षक एनामुल हक सागर यांनी पोलिस मुख्यालयात प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, शेख हसीना यांच्यासह इतर आरोपींचे प्रत्यार्पण व्हावे यासाठी रेड कॉर्नर नोटीस जारी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने हसीना आणि अनेक माजी कॅबिनेट मंत्री, सल्लागार, लष्करी आणि नागरी अधिकाऱ्यांविरुद्ध मानवतेविरुद्ध गुन्हा आणि नरसंहार केल्याच्या आरोपाखाली अटक वॉरंट जारी केले आहे. दरम्यान इंटरपोल ही आंतरराष्ट्रीय गुन्हे अन्वेषण संस्था आहे, जी विविध देशांतील पोलिस यंत्रणांमध्ये समन्वय साधते. इंटरपोलकडून विविध रंगांच्या नोटिसा जारी केल्या जातात, ज्यांचा उद्देश गुन्हेगारांची माहितीची देवाणघेवाण करणे हा असतो. (वृत्तसंस्था)

# आता कर्मचारी निवड परीक्षेत आधारद्वारे बायोमॅट्रिक

## मे २०२५ पासून लागू होणार नियम

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

कर्मचारी निवड आयोग (एसएससी) यांच्या वतीने आगामी परीक्षांमध्ये आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील महिन्यापासून होणाऱ्या सर्व परीक्षांमध्ये हा नियम लागू राहील.

यासंदर्भात एक अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे. त्यात म्हटले आहे की, मे २०२५ पासून परीक्षेचे उमेदवार ऑनलाईन नोंदणीच्यावेळी, परीक्षेचे अर्ज भरताना आणि परीक्षा केंद्रावर हजेरी लावताना आधारचा उपयोग करून स्वत:चे प्रमाणीकरण करू शकणार आहेत. अर्थात, हे आधार प्रमाणीकरण ऐच्छिक असून याचा उद्देश परीक्षा प्रक्रिया अधिक सुकर आणि सोपी करणे हा आहे. आधार ही एक १२ आकड्यांची अशी ओळख आहे जी प्रत्येक भारतीयाकडे आहे.

परीक्षेला येणाऱ्यांनी आपली खोटी ओळख दाखवू नये यासाठी हे प्रमाणीकरण अत्यंत उपयुक्त आहे. जेणेकरून बनावट ओळखपत्राद्वारे परीक्षा देण्याच्या प्रकारांनाही चाप बसेल. कार्मिक मंत्रालयाने मागील वर्षी सप्टेंबर महिन्यातच कर्मचारी निवड परीक्षेत आधार प्रमाणिकरणाला मंजुरी दिली होती. (वृत्तसंस्था)

# ६० टक्के देशांतीलच शाळांमध्ये अन्नविषयक कायदे

## युनेस्कोच्या अहवालातील धक्कादायक वास्तव

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

युनेस्कोच्या ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग रिपोर्टनुसार, फक्त ६० टक्के देशांमध्ये शाळांमध्ये अन्न आणि पेये नियंत्रित करणारे कायदे आणि मानके आहेत. हा अहवाल लंडन स्कूल ऑफ हायजीन अँड ट्रॉपिकल मेडिसिनच्या नेतृत्वाखालील रिसर्च कन्सोर्टियम फॉर स्कूल हेल्थ अँड न्यूट्रिशनच्या भागीदारीत प्रकाशित करण्यात आला आहे, जो स्कूल मील्स कोलिशनचा संशोधन उपक्रम आहे.



जीईएम टीमने असे नमूद केले की ३० कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये शालेय अन्न आणि पोषण शिक्षणाच्या सर्वेक्षण-आधारित मूल्यांकनात असे आढळून आले की शालेय प्रणालीमध्ये एकात्मता बहुतेकदा अभ्यासक्रमाबाहेरील किंवा प्रकल्प-आधारित क्रियाकलापांद्वारे होते, स्वतंत्र विषय म्हणून किंवा अभ्यासक्रमात नाही.

२८ पैकी फक्त तीन देशांमध्ये नियमितपणे मूल्यांकन केले गेले आणि वापरले गेले. मूल्यांकन माहितीमध्ये अन्न आणि पोषण, ज्ञान, अन्न पद्धती, पौष्टिक स्थिती, सवयी आणि आहार याबद्दलच्या दृष्टिकोन आणि धारणांमध्ये बदल समाविष्ट होते, अहवालात म्हटले आहे. बहुतेक शालेय जेवण कार्यक्रमांमध्ये पोषण, आरोग्य आणि सामाजिक संरक्षण उद्दिष्टांसह शिक्षण उद्दिष्टे असतात. तथापि, कमी कार्यक्रम लठ्ठपणा रोखण्यावर किंवा कमी करण्यावर लक्ष केंद्रित करतात, असे त्यात म्हटले आहे.

शालेय जेवणाच्या तरतुदीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या दुसऱ्या सर्वेक्षणात असे आढळून आले की ७२ टक्के देशांनी शाळेच्या परिसरात किंवा जवळ परवानगी असलेल्या अन्नावर काही मर्यादा नोंदवल्या आहेत आणि ५२ टक्के देशांनी शाळेच्या परिसरात किंवा जवळ परवानगी असलेल्या अन्नावर राष्ट्रीय स्तरावर बंदी घातली आहे.

उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये अन्न प्रणाली परिवर्तनाशी पोषण धोरणाच्या सहभागाच्या पुनरावलोकनात असे दिसून आले की, बहुतेक धोरणात्मक कृती निरोगी निवड वर्तन बदलासाठी संवादावर केंद्रित असताना, अन्न पर्यावरण क्षेत्रातील बहुतेक परिणाम अन्न लेबलिंग, उत्पादन सुधारणा, शाळांमध्ये निरोगी अन्न प्रदान करणे आणि अन्न जाहिरातींवर प्रतिबंध घालण्यावर केंद्रित होते. अनारोग्यकारक अन्न किंवा पेयांचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला नाही.

अन्न पर्यावरणाऐवजी वैयक्तिक जबाबदारीवर आणि नियामक आणि कायदेविषयक सुधारणांवर भर देण्यात आला, अहवालात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### केवळ ९३ देशांमध्येच आहेत कायदे

१८७ पैकी फक्त ९३ देशांमध्ये शालेय अन्न आणि पेये यावर कायदे, अनिवार्य मानके किंवा मार्गदर्शन आहे. तथापि, या ९३ पैकी फक्त २९ टक्के देशांमध्ये शाळांमध्ये अन्न आणि पेये विपणन प्रतिबंधित करणारे उपाय होते आणि ६० टक्के देशांमध्ये अन्न आणि पेये नियंत्रित करणारे मानके आहेत, असे ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग (जीईएम) अहवालात म्हटले आहे.

### आणि केजरीवालांनी पत्नीसह केले नृत्य...

**दिल्ली** विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर आपचे सर्वेसर्वा आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल अज्ञातवासात गेल्यासारखे दिसत होते. कोणत्याही राजकीय घडामोडीत त्यांचा सहभाग दिसत नव्हता. केजरीवाल आतापर्यंत राजकारणात का सक्रिय नव्हते, याचे कारण आता समजले आहे. ते आपल्या मुलीच्या हर्षिताच्या विवाहाच्या तयारीत गुंतले होते. हर्षिताचा विवाह नुकताच संभव जैनसोबत झाला. दोघेही आयआयटीयन आहेत. या दोघांनी बेसिल हेल्थ नावाचा एक स्टार्टअपही सुरू केला आहे.

विवाहाशी संबंधित कार्यक्रम ल्युटन्स झोन परिसरातील कपूरथळा हाऊसमध्ये झाले. कपूरथळा हाऊस हे पंजाबच्या मुख्यमंत्र्यांचे दिल्लीतील अधिकृत शासकीय निवासस्थान आहे. विवाहाचा मुख्य कार्यक्रम शांग्रिला या पंचतारांकित हॉटेलात झाला. विवाहाला केजरीवाल यांचे नातलग तसेच आपचे नेते मंडळी उपस्थित होती. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान सपत्नीक या समारंभाला उपस्थित होते. विवाहसमारंभातील संगीत कार्यक्रमात केजरीवाल यांनी पत्नी सुनितासह जोरदार डान्सही केला. भगवंत मान यांनाही मग आपल्या पत्नीसह नाच करण्याचा मोह आवरला नाही.

हर्षिताच्या विवाहानिमित्त २० एप्रिलला केजरीवाल यांनी राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसाठी स्वागतसमारंभाचे आयोजन केले होते. यात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी हजेरी लावली. मुलीचे लग्न आटोपल्यामुळे केजरीवाल आता राजकारणाकडे पूर्णवेळ लक्ष देतील, राजकारण संन्यासातून बाहेर येतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

●● ●●

### फरक नव्या आणि जुन्या मुख्यालयाचा

**काँग्रेस** पक्षाचे नवे मुख्यालय इंदिरा भवन कार्यान्वित झाले आहे. जुन्या २४ अकबर रोडवरील काँग्रेस पक्षाच्या जुन्या मुख्यालयात प्रवेश करणे तसे फारसे कठीण नव्हते. देशाच्या कोणत्याही भागातून आलेला कार्यकर्ता आपल्या राज्याशी संबंधित नेत्याला सहज भेटू शकत होता, आपले म्हणणे मांडू शकत होता. पण नव्या मुख्यालयात मात्र सर्वांना मुक्त प्रवेश नाही. सुरक्षेच्या कारणास्तव देशातून येणाऱ्या कार्यकर्त्यांना आत प्रवेश करण्यासाठी चांगलेच पापड बेलावे लागतात. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे चेहरे सुद्धा नव्या मुख्यालयात दिसत नाही. जुन्या मुख्यालयात पदाधिकारी सहज दृष्टीस पडत होते, कार्यकर्ते त्यांच्याशी संपर्क साधू शकत होते. आता नव्या मुख्यालयात आत बसलेल्या पदाधिकाऱ्याने बाहेर फोनवर सुरक्षा यंत्रणांना सूचना दिली तरच संबंधित कार्यकर्त्यांना आत प्रवेश मिळतो, अन्यथा बाहेरच ताटकळत उभे राहावे लागते. मध्यंतरी महाराष्ट्रातील काही कार्यकर्ते आपल्या राज्याशी संबंधित प्रभारी नेत्यांना भेटायला इंदिरा भवनात आले होते. पण, आतून सूचना नसल्यामुळे बराचवेळ त्यांना प्रवेशद्वारावर ताटकळत बसावे लागले. बरीच फोनाफोनी झाल्यावर गंगेत घोडे न्हाले आणि या कार्यकर्त्यांना आत प्रवेश मिळाला, मात्र तोपर्यंत त्यांचा संयम संपला होता. त्यामुळे काँग्रेसच्या नव्या अत्याधुनिक मुख्यालयापेक्षा जुने मुख्यालयच चांगले होते, किमान त्यात आत सगळ्यांना प्रवेश तरी मिळत होता, अशी चर्चा त्या कार्यकर्त्यांमध्ये सुरु होती.




### राहुल गांधी यांचा अमेरिका दौरा

**लोकसभेतील** विरोधी पक्षनेते राहुल गांधी अमेरिकेच्या दौऱ्यावर पोहोचले आहेत. गांधी यांचा प्रत्येक परदेश दौरा वादाच्या भोवऱ्यात सापडत असतो. कारण, या दौऱ्यात ते काही न काही वादग्रस्त विधान करीत असतात, देशाच्या विरोधात बोलत असतात. २१ आणि २२ एप्रिलला राहुल गांधी ब्राऊन विद्यापीठात विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संबोधित करणार आहेत. राहुल गांधी यांचा हा दुसरा अमेरिका दौरा म्हटला पाहिजे. याआधी सप्टेंबर २०२४ मध्ये ते पहिल्यांदा अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. त्यावेळी त्यांनी डलास येथील टेक्सास विद्यापीठ तसेच वॉशिंग्टन डीसीमधील जॉर्जटाऊन विद्यापीठात विद्यार्थ्यांना संबोधित केले होते. त्यावेळी त्यांनी जातीय जगगणनेची मागणी केली होती तसेच भारतातील आरक्षण प्रणालीवर टीकाही केली होती. त्यामुळे राहुल गांधी आपल्या या अमेरिका दौऱ्यात काय तारे तोडणार, याकडे काँग्रेस पक्षाचे लक्ष लागले आहे. काँग्रेसला अनेकवेळा अडचणीत आणणरे सॅम पित्रोदा या दौऱ्यात राहुल गांधी यांच्यासोबत आहेत. त्यामुळे ही जोडी काँग्रेस पक्षाच्या अडचणी वाढवणार यात शंका नाही.

●● ●●

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची चॉकलेट डिप्लोमसी

**चॉकलेट** हे लहान मुलांना खूप आवडत असते. लहान मुलांना चॉकलेट दिले की ते खुश होतात, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत असतो. कोणीही पाहुणा आला की, तो घरातील लहान मुलांना चॉकलेट देत असतो. पण, परदेश दौऱ्यात कोणी चॉकलेटचा वापर केल्याचे आपण ऐकले नसावे. पण, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या स्लोव्हाकिया दौऱ्यात चॉकलेट डिप्लोमसीचा वापर करीत लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांची मने जिंकली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नुकत्याच पोर्तुगाल आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर गेल्या होत्या. स्लोव्हाकियात त्यांना एका विद्यापीठाच्या कार्यक्रमात मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटून मुर्मू यांनी त्यांचा आनंद वाढवला. नंतर सिहोट शहरातील सिटी पार्कमध्ये मुर्मू यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या ठिकाणीही मुर्मू यांनी उपस्थितांना चॉकलेट वाटले. मुर्मू यांनी सलग दोन कार्यक्रमात चॉकलेट वाटलेले पाहून स्लोव्हाकियाचे पंतप्रधान पीटर पेलेरगिनी यांनीही चॉकलेटसाठी आपला हात मुर्मू यांच्या समोर केला. त्यामुळे मुर्मू यांनी त्यांच्याही हातावर स्मितहास्य करीत चॉकलेट ठेवले. हे पाहून नित्राच्या महापौरांनाही चॉकलेटचा मोह आवरला नाही, त्यांनीही आपला हात समोर केला. मुर्मू यांनी त्यांनाही निराश केले नाही. मुर्मू यांच्या या चॉकलेट डिप्लोमसीची चांगलीच चर्चा झाली.

● दिल्लीवाला

# जानवे घातल्यामुळे विद्यार्थ्याला सीईटी परीक्षेला बसण्यापासून रोखले

## कॉलेजचे प्राचार्य आणि कर्मचारी निलंबित

◆ **बंगळुरू, २० एप्रिल**

१७ एप्रिल रोजी, कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील साई स्फुर्ती पीयू कॉलेजमध्ये, एका विद्यार्थ्याने जानवे काढण्यास नकार दिल्याने त्याला परीक्षेला बसू देण्यात आले नाही. शनिवारी हे प्रकरण चर्चेत आले आणि त्यावरून वाद निर्माण झाला. आता या प्रकरणात प्राचार्य डॉ. चंद्रशेखर बिरादार आणि कर्मचारी सतीश पवार यांना निलंबित करण्यात आले आहे.



शिवमोगा जिल्ह्यातील आदिचुंचनागिरी शाळेतही असाच एक प्रकार घडला, जिथे कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (सीईटी) देण्यासाठी आलेल्या तीन विद्यार्थ्यांना त्यांचे जानवे काढण्यास सांगण्यात आले. कर्नाटक ब्राह्मण महासभेच्या वतीने पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. आरोपीविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

कर्नाटकमध्ये कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (सीईटी) घेण्यात आली. येथील सरकारने काही विद्यार्थ्यांना जानवे काढण्यास सांगितले आणि एका ठिकाणी ते कापल्याचा आरोप आहे. हे अत्यंत निषेधार्ह आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे पण ज्या मुलाला परीक्षेला बसू दिले गेले नाही त्याचे काय? तुम्हाला यावर उपाय शोधावा लागेल.

शिवमोगा येथील भाजपा खासदार बी.वाय. राघवेंद्र यांनीही या घटनेचा निषेध केला.

ते म्हणाला की, हा अन्याय आहे. मी याचा तीव्र निषेध करतो. अशी घटना जाणूनबुजून घडली असो किंवा नकळत. हे पुन्हा घडू नये यासाठी सरकारने पावले उचलली पाहिजेत. हिंदू धर्माविरुद्ध अशा घटना वारंवार घडत आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. जे कोणी जबाबदार असतील, त्यांच्यावर सरकारने कारवाई करावी. (वृत्तसंस्था)

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोमवार, २१ एप्रिल २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

कोलकाता नाईट रायडर्स वि. गुजरात टायटन्स

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता

# राज्यात पाणीटंचाईच्या झळा!

## धरणसाठा आला ३८ टक्क्यांवर | उजनी शून्यावर, जलसाठ्यांची घसरगुंडी

◆ **मुंबई, २० एप्रिल**

राज्यातील धरणसाठा आता ३८.९५ टक्क्यांवर आलाय. पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण, विदर्भातील सर्व मोठ्या धरणांचा पाणीसाठा आता झपाट्याने खाली घसरलाय. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील बहुतांश भागातील नागरिक सापडले आहेत.

अकोल्यात पाणी चोरीला जाऊ नये म्हणून पाण्याच्या टाक्यांना कुलूप लावले जात आहेत. मराठवाड्यात १०-१२ दिवसांनी एकदा नळाला पाणी येतानाचे चित्र पुन्हा सुरू झाले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये पाण्याच्या नियोजनावरून नागरिकांमध्ये रोष दिसून येत आहे. राज्यभरात पाणीटंचाईचा प्रश्न चांगलाच पेटला आहे.

महाराष्ट्राच्या सहा महसूल विभागांपैकी पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या तीन विभागातील धरणांमध्ये आता ४० टक्क्यांहूनही कमी पाणी शिल्लक आहे. पुणे विभागात राज्यातील सर्वात कमी पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत काही टक्क्यांनी पाणीसाठा अधिक असला तरी काही प्रमुख धरणे एप्रिलमध्यावरच मायनसच्या दिशेने वाटचाल करू लागली आहेत. त्यामुळे शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. गेल्या वर्षी याच सुमारास पाणीसाठा ३३.६२ टक्के एवढा होता. तो यंदा ३८.९५ टक्के एवढाच राहिला आहे. (वृत्तसंस्था)

### सर्वात कमी जलसाठा पुणे विभागात

राज्यात पुणे विभागातील लघु मध्यम आणि मोठ्या एकूण ७२० धरणांमध्ये आता केवळ ३२.७० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. खडकवासला धरण ५१.१२ टक्क्यांवर भरले असून त्यात सध्या २८.५८ दलघमी उपयुक्त पाण्यासाठी आहे. पानशेत धरणात ३४.१० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. सांगलीतील वारणा धरण ४०.५६ टक्क्यांवर येऊन पोहोचले आहे. साताऱ्यातील कोयना ३७.२२ टक्क्यांवर आहे. तर सोलापूरमधील उजनी धरण आता शून्यावर पोहोचले आहे. कोल्हापुरातील दूधगंगा २६.४८ टक्क्यांवर असून राधानगरी धरण ५४ टक्क्यांवर आहे.

### गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा पाणीसाठा

| विभाग | गतवर्षीचा जलसाठा | यंदाचा जलसाठा |
|---|---|---|
| नागपूर | ४४.८९% | ३९.२७% |
| अमरावती | ४८.४५% | ४८.९६% |
| पुणे | २९.५१% | ३२.७०% |
| छ. संभाजीनगर | १७.०६% | ३८.७७% |
| नाशिक | ३७.४१% | ४२.६४% |
| कोकण | ४७.६८% | ४८.४१% |


# नक्षल्यांची शांतता चर्चेसाठी सरकारकडे पुन्हा विनवणी

### उत्तर पश्चिम सब झोनल ब्युरोने जारी केले पत्रक

### उपमुख्यमंत्री विजय वर्मा यांचे मानले आभार

◆ **सुकमा, २० एप्रिल**

नक्षलवाद्यांच्या उत्तर पश्चिम विभागाचा सब झोनल ब्युरोने पुन्हा एकदा युद्धविरामाची मागणी करणारे पत्रक जारी केले आहे. यात पहिल्यांदाच नक्षल्यांनी छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय वर्मा यांचे आभार मानले आहे, तसेच शांतीवार्ता करण्याची सरकारकडे मागणी केली.




एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, नारायणपूर आणि राजनांदगाव जिल्ह्यातील दुर्गम भागात नक्षलवाद्यांचा उत्तर पश्चिम विभागाचा सब झोनल ब्युरो प्रभारी रुपेश याचे पत्रक आढळले. यात त्याने छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय वर्मा यांनी शांती वार्तासाठी प्रतिसाद दिल्यासंदर्भात आभार व्यक्त केले. महिनाभरासाठी तरी कारवाया रोखाव्या आणि आमच्या नेत्यांच्या सुरक्षेची हमी सरकारने द्यावी असेही यात नमूद करण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च २०२६ पर्यंत नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याची घोषणा केली. त्या पृष्ठभूमीवर छत्तीसगड, महाराष्ट्रातील गडचिरोली, झारखंड, तेलंगणा या प्रमुख नक्षल प्रभावित राज्यात सुरक्षा दलाने मोठ्या प्रमाणात कारवाया सुरू केल्या आहे. त्यामुळे घाबरलेल्या नक्षल नेत्यांनी आणि समर्थक शांतीची भाषा करीत आहे. याच पृष्ठभूमीवर २४ मार्चला तेलंगणात एक बैठक घेऊन सरकारपुढे शांतीचा प्रस्ताव मांडला होता. दोन्ही पक्षात शांतीवार्ता होईपर्यंत कारवाया रोखण्यात याव्या, अशी विनंतीही करण्यात आली होती. मात्र, कारवाया सुरूच असल्याने हतबल झालेल्या नक्षलवाद्यांनी पुन्हा एकदा पत्रक जारी केले. (वृत्तसंस्था)

### आधी शस्त्र खाली टाकावे

नक्षल्यांनी जारी केलेल्या पत्रकावर वृत्तसंस्थेशी बोलताना सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण जी. चव्हाण म्हणाले, नक्षलवाद्यांना चर्चा हवी असेल तर त्यांनी प्रथम शस्त्र खाली टाकून आत्मसमर्पण केले पाहिजे. दोन दशकापूर्वी तेलंगणात असाच एक प्रयत्न झाला होता. मात्र, यातून कुठलाच मार्ग निघाला नाही. त्यामुळे अशा प्रकारचा प्रस्ताव हा नक्षलवाद्यांच्या रणनीतीचा एक भाग आहे.

## विचारपुष्प



नि वैदिक काळातील संतांपासून ते रामकृष्ण, विवेकानंद, रामतीर्थ आणि अशाच प्रकारच्या अन्य आधुनिक काळातील महान व्यक्तींपर्यंत सर्वांनी आपल्या प्राचीन आदर्शांप्रति भावात्मक तथा त्यांच्या अनुभूती-युक्त आपल्या जीवनाद्वारे आपल्या समाजावर त्यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची छाप सोडली आहे.

**श्रीगुरुजी,**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

## महत्त्वाचे

### एचडीएफसीने मुदत ठेवींचे व्याजदर बदलले

**नवी दिल्ली** : एचडीएफसी बँकेने मुदत ठेवींवरील (एफडी) व्याजदर कमी केले आहेत. आता, एचडीएफसी बँकेत एफडी केल्यावर, सामान्य नागरिकांना ३ ते ७.०५ टक्क्यांपर्यंत व्याज मिळेल. तर ज्येष्ठ नागरिकांना ३.५० ते ७.५५ टक्क्यांपर्यंत व्याज मिळेल. ३ कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेच्या एफडीच्या व्याजदरात हे बदल करण्यात आले आहेत. अलिकडेच, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ इंडियाने मुदत ठेवींवरील व्याजदर कमी केले आहेत. आता, एसबीआय १ वर्षाच्या एफडीवर ६.७० टक्के व्याज देत आहे. आता, सामान्य नागरिकांना बँक ऑफ इंडियामध्ये १ वर्षाच्या वर ७.०५ टक्के व्याज मिळेल. आरबीआयने रेपो दरात कपात केल्यानंतर आता बँकाही एफडी व्याजदर कमी करत आहेत.

### लॅण्डिंग करताना विमानाचे चाक तुटले



**न्यूयॉर्क** : अमेरिकन विमान कंपनी फ्रंटियर एअरलाइन्सच्या विमानाचे चाक लँडिंग दरम्यान तुटले. विमानाने फ्लोरिडाहून सॅन जुआन, प्यूर्टो रिकोसाठी उड्डाण केले, परंतु लँडिंग करताना त्याचा पुढचा लँडिंग गियर बिघडला. ऑनलाइन व्हायरल झालेल्या व्हिडीओंमध्ये विमानाच्या खिडकीतून धूर बाहेर पडत असल्याचे दिसून येते, तर विमानाच्या आतून प्रवाशांच्या रडण्याचे आणि प्रार्थना करण्याचे आवाज ऐकू येतात. मेलानी गोंझालेझ व्हार्टन नावाच्या एका प्रवाशाने फेसबुकवर अपघाताबद्दल लिहिले: काही मिनिटांसाठी मला वाटले की पृथ्वीवरील आपली कहाणी संपली आहे. वास्तविकता अशी आहे की अननुभवी लोक विमान चालवत होते. फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन आणि नॅशनल ट्रान्सपोर्टेशन सेफ्टी बोर्ड या प्रकरणाची चौकशी करत आहेत.

### मणिपूरमध्ये प्रतिबंधित संघटनांच्या ९ सदस्यांना अटक

**इम्फाळ,** पोलिस आणि सुरक्षा दलांनी गेल्या ४८ तासांत मणिपूरच्या इम्फाळ खोऱ्यातील प्रतिबंधित संघटनांच्या नऊ सदस्यांना अटक केली. इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील नोंगदाम गावाजवळील नेपेटपल्ली अँड्रो रोडवरून शनिवारी बंदी घातलेल्या युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट अर्थात् पम्बईच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर खंडणीचा आरोप आहे. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, शुक्रवारी, सुरक्षा दलांनी बिष्णुपूर जिल्ह्यातील निंगथौखोंग वॉर्ड क्रमांक १३ मधून बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या सदस्याला अटक केली. त्याचदिवशी, इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील सलाम मामांग लीकाई केतुकी लम्पाक येथून बंदी घातलेल्या केसीपीच्या दोन कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. याशिवाय इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील क्यामगेई हेइबोंग माखोंग भागातून बंदी घातलेल्या प्रपाकच्या एका पदाधिकाऱ्याला अटक केली. प्रतिबंधित कांगले यावोल कन्ना लुपच्या एका कॅडरला इम्फाळ पूर्व जिल्ह्यातून ताब्यात घेण्यात आले.

# राज्यात हिंदी अनिवार्य नाही : मुख्यमंत्री फडणवीस

◆ **पुणे, २० एप्रिल**

हिंदी भाषेच्या मुद्यावरून महाराष्ट्रात राजकारण पेटले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात हिंदी भाषा अनिवार्य केली नसल्याचे स्पष्ट केले आहे. नवीन अभ्यासक्रमानुसार आता तीन भाषा शिकता येणार असून हिंदी नव्हे तर मराठीच अनिवार्य असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

दक्षिणेत भाषेच्या मुद्यावरून वाद सुरू असताना राज्यातही मनसे, उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार गट पक्षाने हिंदी भाषा अनिवार्य करता येणार नसल्याचे सांगत महायुती सरकारशी दोन हात करण्याची तयारी दर्शविली आहे. अनेक नामवंत शिक्षण तज्ज्ञांनीही हिंदी सक्तीला विरोध दर्शविला. या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांनी पुणे येथे बोलताना भूमिका स्पष्ट केली. नवीन शिक्षण धोरणात तीन भाषा शिकण्याची संधी दिली आहे.

तीन भाषा शिकणे अनिवार्य आहे. यापैकी मराठी ही भाषा आपण अनिवार्य केली आहे. मात्र, तिसरी भाषा ही भारतातील कुठलीही भाषा घेतली तरी चालेल. मग, त्यात हिंदी, गुजराती, मल्याळम किंवा अन्य दुसरी कुठलीही असेल, असे फडणवीस यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### शिक्षकांची उपलब्धताही महत्त्वाची

तीन भाषांचा प्रस्ताव जेव्हा समितीने संबंधित मंत्र्याच्या अध्यक्षतेखालीली समितीकडे पाठविला तेव्हा हिंदी ही तिसरी भाषा ठेवली तर शिक्षकांची अडचण जाणार नाही. हिंदी भाषेचे शिक्षक सहज मिळतील. इतर भाषांचा समावेश केला तर शिक्षक मिळणार नाहीत. वा व्यवहार्य मुद्दा डोळ्यासमोर ठेवूनच हिंदीचा विचार केला. त्यामुळे हिंदीची सक्ती केल्याचे म्हणणे चुकीचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# जम्मू-काश्मीरच्या रामबनमध्ये ढगफुटी

### भूस्खलनामुळे इमारतींसह वाहनांचे मोठे नुकसान

### १०० हून अधिक जणांना वाचवण्यात यश



◆ **जम्मू, २० एप्रिल**

जम्मू-काश्मीरच्या रामबन जिल्ह्यात गारपीट आणि भूस्खलनामुळे अचानक पूर आला. त्यात ४० घरांचे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीतून १०० हून अधिक लोकांना वाचवण्यात आले आहे. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

उधमपूरचे भाजपा खासदार आणि केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी समाज माध्यमावर सांगितले की, शनिवारी रात्री उशिरा रामबन परिसरात अनेक ठिकाणी मुसळधार गारपीट झाली. तसेच जोरदार वारे आणि पावसामुळे भूस्खलनही झाले आहे. (वृत्तसंस्था)

# थार वाळवंट तब्बल ३८ टक्के झाले हिरवे!

### वाढते पर्जन्यमान, शेतीचा विस्तार कारणीभूत ● नव्या पाहणीतील निष्कर्ष

◆ **अहमदाबाद, २० एप्रिल**

गेल्या २० वर्षांत भारतातील थार वाळवंट ३८ टक्के अधिक हिरवे झाले असून, यामागे हवामान बदल आणि शेतीचा झपाट्याने झालेला विस्तार, हे दोन प्रमुख घटक असल्याचे एका नव्या अभ्यासातून समोर आले आहे. शोधकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दोन दशकांत थार वाळवंटात अधिक लोक राहायला लागले असून, त्यांनी तेथील भूभाग शेतीसाठी आणि नागरी वापरासाठी बदलला आहे. या बदलांमुळे वाळवंटातील हरित क्षेत्र वाढले आहे. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे हवामान बदलामुळे या भागात मान्सून दरम्यान होणाऱ्या पर्जन्यमानात मोठी वाढ झाली आहे.

थार वाळवंट, ज्याला 'ग्रेट इंडियन डेझर्ट' असेही म्हणतात, हे वायव्य भारत आणि आग्नेय पाकिस्तानमध्ये पसरलेले असून, याचे क्षेत्रफळ सुमारे २ लाख चौरस किलोमीटर आहे. या वाळवंटाचा ८५ टक्के भाग भारतात राजस्थान, गुजरात आदी राज्यांमध्ये असून, १५ टक्के भाग पाकिस्तानच्या हद्दीत आहे. जगातील इतर वाळवंटांमध्ये दुष्काळ अधिक तीव्र होत असताना, थार वाळवंटात नागरीकरण आणि शेतीचा विकास वेगाने झालेला दिसतो. त्यामुळे हे जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले वाळवंट बनले आहे, जेथे १६ मिलियन (१.६ कोटी) हून अधिक लोक राहतात. आयआयटी गांधीनगर येथील सिव्हिल इंजिनिअर आणि अभ्यासाचे सहलेखक विमल मिश्रा यांनी सांगितले की, पाण्याची आणि ऊर्जेची उपलब्धता वाढल्याने शेती व नागरी क्षेत्रांचा विस्तार झाला आहे. परिणामी, पिकांचे उत्पादनही लक्षणीयरीत्या वाढले आहे. जगातील इतर कोणत्याही वाळवंटात अशा प्रमाणात नागरीकरण, शेती आणि पर्जन्यमान वाढलेले दिसत नाही.



'सेल रिपोर्ट सस्टेनबिलिटी' या नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात २००१ ते २०२३ दरम्यानचे उपग्रहचित्रांचे विश्लेषण करण्यात आले. या कालावधीत वाळवंटात सरासरी ३८ टक्के हरिततेत वाढ झाली आहे. पावसात झालेल्या ६४ टक्के वाढीमुळे तसेच मान्सूनशिवाय इतर काळात भूगर्भजलाच्या सिंचनामुळे हा हरित विस्तार शक्य झाला. (वृत्तसंस्था)

### जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन गरजेचे

अभ्यासकांचे म्हणणे आहे की, जर जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन योग्य रीतीने केले गेले, तर हा भाग वाढती लोकसंख्या समर्थपणे झेपवू शकतो. मात्र, वाढते तापमान आणि भूगर्भजलाचा अतिवापर हे गंभीर धोके ठरू शकतात. जर या पावसाच्या वाढीचा योग्य वापर केला गेला, तर हा प्रदेश अधिक सशक्तपणे बहरू शकतो. एक स्वतंत्र अभ्यास असा भाकीत करतो की, २१व्या शतकाच्या अखेरीस थर वाळवंटाचा अधिक भाग हिरवा झालेला दिसेल.

# अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष आजपासून भारत दौऱ्यावर

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स सोमवारी चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहे. त्यांच्यासोबत पत्नी उषा आणि तीन मुलेदेखील भारतात येणार आहेत. त्यांच्या विशेष विमानाचे सकाळी १० वाजता पालम येथील वायुसेनेच्या तळावर आगमन होईल, यावेळी केंद्र सरकारचे वरिष्ठ मंत्री त्यांचे स्वागत करतील. या दौऱ्यात व्हान्स पंतप्रधान मोदी यांची भेट घेणार असून अक्षरधाम येथेही सहकुटुंब दर्शन घेणार आहे.



परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी सायंकाळी व्हान्स आणि त्यांच्या भारतीय वंशाच्या पत्नी उषा यांच्या सन्मानार्थ रात्रीभोजचे आयोजन करतील. याआधी मोदी आणि अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष व्यापार, शुल्क आणि इतर महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करतील. यावेळी भारतीय शिष्टमंडळात परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि अमेरिकेतील भारताचे राजदूत विनय मोहन क्वात्रा उपस्थित राहणार आहेत. (वृत्तसंस्था)

### चंद्रपूर ठरले देशात सर्वात हॉट

**चंद्रपूर** : मागील दोन दिवसांपासून विदर्भात उष्णतेची लाट असून रविवारी देशात सर्वाधिक तापमानाची नोंदं चंद्रपुरात झाली आहे. चंद्रपुरात सर्वाधिक ४४.६ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अनेक प्रमुख शहरांमधील तापमान ४४ अंशांच्या पार गेले आहे. अमरावतीत तापमानाचा पारा ४४.४ अंशावर गेला.

# रुग्णालयातील महिलेस अटक, तीन दिवसांची पोलिस कोठडी

**डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

### डॉ. शिरीष वळसंगकर यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीतून उलगडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

महाराष्ट्राला हादरवून सोडलेल्या डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्येप्रकरणी वळसंगकर यांच्या रुग्णालयात प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करणाऱ्या मनीषा मुसळे-माने हिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्येपूर्वी डॉ. वळसंगकर यांनी एक चिठ्ठी लिहलेली होती. यामध्ये मनीषा मुसळे-माने हिच्यामुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी मनीषा हिला रविवारी दुपारी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तिला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.



८ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास डॉ. वळसंगकर यांच्या घरातील बाथरूममध्ये ही घटना घडली आहे. याप्रकरणी डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर (वय ४५, वर्ष, रा. वळसंगकर हॉस्पिटल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने (रा. सोलापूर) हिच्याविरुद्ध १९ एप्रिल रोजी रात्री दहा वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला अटक करण्यात आली आहे. आरोपी मनीषा ही वळसंगकर हॉस्पिटलमध्ये काम करत होती. तिला डॉक्टर वळसंगकर यांनी वेळोवेळी सहकार्य करून देखील आरोपीने फिर्यादींवर खोटे आरोप करून धमकी वजापत्र पाठवल्याने फिर्यादीच्या वडिलांनी आरोपीच्या त्रासाला कंटाळून राहते घरी स्वतःच्या बेडरूममधील अटॅच असलेल्या बाथरूममध्ये स्वतःच्या परवाना असलेल्या पिस्टलमधून कानशीलमध्ये गोळी घालून आत्महत्या केली. आरोपी मनीषा ही फिर्यादीच्या वडीलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरली आहे, असे डॉ. अश्विन यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



### कोण आहेत मनीषा मुसळे-माने?

मनीषा माने ही मरीआई चौकातील गवळी वस्ती तालीम येथील स्वर्गीय सुरेश निंबाळकर यांचे मोठे बंधू आणि गिरणी कामगार तसेच व्यवसायाने गवळी असलेले हरिभाऊ निंबाळकर यांची कन्या आहे. हरिभाऊ यांना एक मुलगी आणि दोन मुले आहेत. तिचा विवाह सर्वप्रथम मुसळे नाम व्यक्तीशी झाला होता. मात्र, पतीला दारूचे व्यसन असल्याने तिने त्याला सोडून माने नामक व्यक्तीशी दुसरा विवाह केला. पहिले पती मुसळे यांच्यापासून मनीषा हिला दोन मुले आहेत. मुलीने दुसरा विवाह केल्यामुळे निंबाळकर कुटुंबीय तिच्याशी बोलत नव्हते. काही वर्षांपूर्वी हरिभाऊ निंबाळकर यांचे निधन झाले. त्यावेळी मनीषा ही वडीलाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी गवळीवस्ती येथे गेल्यानंतर तिच्या भावांनी तिला तिथे येण्यापासून मज्जाव केला होता. मात्र, मनीषा हिने चिडून तिसऱ्या दिवशीचा विधी स्वतःच उरकून वडिलाप्रती आपली भावना व्यक्त केली होती, याचीही चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली होती. शाळा कॉलेजला असतानाच मनीषा ही त्यांच्या दवाखान्यामध्ये कामाला लागली होती. कालांतराने डॉ. वळसंगकर यांच्या घरातली ती मेंबर बनली. हॉस्पिटलमध्ये बघता बघता टॉपवर गेली. डॉ. वळसंगकर यांच्यानंतर मनीषा हिचाच हॉस्पिटलमध्ये वट्ट होता. डॉक्टर वगळता अन्य कर्मचारी स्टाफसुद्धा तिला टरकून होता. तिचे इतके प्रस्थ होते की तिच्याशिवाय हॉस्पिटलमध्ये काडीसुद्धा हलत नव्हती, अशी परिस्थिती होती. सामान्य घरातून आलेली आणि जवळपास २० ते २५ वर्षे हॉस्पिटलमध्ये कामकाज बघून प्रमुखपद निभावत असलेली मनीषा हिचा बंगला पाहिल्यानंतर डोळे दिपल्याशिवाय राहत नाहीत, असे समजते. डॉक्टरांची जणू ती एक मानसकन्या असल्याची कर्मचाऱ्यात चर्चा आहे. डॉ. वळसंगकर यांना हॉस्पिटलमधून बेदखल करण्यात आल्यानंतर मनीषा माने हिलासुद्धा काढून टाकण्यात येत असल्याची कुणकुण लागताच तिने डॉ. शिरीष वळसंगकर यांना मी इतकी वर्षे हॉस्पिटलमध्ये काम केले, मला दोन आपत्य आहेत, माझ्या कुटुंबाचे पुढे कसे होणार? मला कामावरून काढल्यास मी आत्महत्या करेन, अशी तिने धमकी दिली होती. त्याचा सर्वात मोठा तणाव डॉ. शिरीष वळसंगकर यांच्यावर होता. मनीषा खूप वर्षापासून हॉस्पिटलचे कामकाज बघत आहे. शिवाय ती आपल्या घरातील सदस्य असल्यासारखी असल्यामुळे तिला कामावरून काढू नये म्हणून कुटुंबातील सदस्यांमध्येसुद्धा वाद होता. त्यातूनच डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्येचे पाऊल उचलले असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलीस तपासात आणखी काय पुढे येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अग्रलेख...

# होमिओपॅथ नव्हे, देवदूत

काही वेळा पुरस्कारामुळे व्यक्ती मोठी होते, तर काही वेळेला व्यक्तीमुळे पुरस्काराचे महत्त्व वाढत असते. एखादा पुरस्कार मिळाला म्हणून त्या व्यक्तीला, त्याच्या कुटुंबाला आणि नातेवाईकांना आनंद होणे स्वाभाविक असते. आपल्याला पुरस्कार मिळावा म्हणून झटणारे, प्रयत्न करणारे पुष्कळ जण असतात, पण काही व्यक्ती अशा असतात समाजासाठी खूप काही करूनही त्या पुरस्काराच्या मागे धावत नसतात, तर पुरस्कारच त्यांच्या मागे धावत असतो. एखाद्या विशिष्ट व्यक्तीला पुरस्कार मिळावा म्हणून समाजातील सर्वजण जेव्हा मनापासून प्रयत्न करतात, तेव्हा त्या पुरस्काराचे मोल वाढत असते. यावर्षी प्रजासत्ताक दिनी पद्म पुरस्कारांची घोषणा झाली आणि मध्य भारतातील प्रसिद्ध होमिओपॅथ, रा. स्व. संघाचे निष्ठावान आणि समर्पित स्वयंसेवक तसेच श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेडचे अध्यक्ष डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तेव्हा नागपुरातीलच नाही तर मध्य भारतातील प्रत्येकाला आपल्यालाच पद्म पुरस्कार मिळाल्याचा आनंद झाला. त्या दिवशी नागपुरात दुसऱ्यांदा दिवाळी साजरी केली गेली. योग्य व्यक्तीला योग्य पुरस्कार जाहीर झाल्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली. खरं म्हणजे डॉ. डांगरे यांना पद्म पुरस्कार याच्याआधीच मिळायला पाहिजे होता, पण यावेळी 'देर आये दुरुस्त आये', असे म्हणायला हरकत नाही. डॉ. डांगरे यांनी नि:स्पृह भावनेने या पुरस्काराचे श्रेय रा. स्व. संघाच्या संस्काराला दिले.

विलास डांगरे तसे होमिओपॅथी डॉक्टर. कधीकाळी होमिओपॅथीच्या डॉक्टरांची, साबुदाण्याच्या गोळ्या देणारे डॉक्टर म्हणून चेष्टा केली जात असे. पण डॉ, डांगरे यांची होमिओपॅथीवर नितांत श्रद्धा आणि विश्वास होता. त्यांनी होमिओपॅथीला लोकमान्यतेसोबत राजमान्यताही मिळवून दिली. होमिओपॅथीचीच नाही तर होमिओपॅथी डॉक्टरांचीही प्रतिष्ठा वाढवली. डॉ. डांगरे यांचे औषध मिळावे म्हणून रुग्णांचे नातेवाईक रात्रीपासूनच त्यांच्या सुरेंद्रनगरच्या दवाखान्यात रांगा लावत होते. त्यांच्या दवाखान्यातील रुग्णांची गर्दी हा होमिओपॅथीच नाही तर ॲलोपॅथीच्या डॉक्टरांसाठी असूयेचा विषय होता, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. डॉ. डांगरे यांच्या दवाखान्यात नंबर लागणे आणि त्यांचे औषध मिळणे हे भाग्याचे लक्षण मानले जात होते. रुग्णांसाठी त्या फक्त साबुदाण्याच्या गोळ्या नव्हत्या, तर अमृतकण होते, असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. डॉ. डांगरे यांच्यावर रुग्णांचा अतूट विश्वास आहे. डॉ. डांगरेच आपल्याला बरे करू शकतील, रोगमुक्त करू शकतील, अशी श्रद्धा हजारो रुग्णांच्या मनात होती आणि अजूनही आहे. ज्या असाध्य अशा आजारावर ॲलोपॅथीचे डॉक्टर हात जोडत अशा आजाराच्या एक दोन नाही तर हजारो रुग्णांना डॉक्टरांनी बरे नाही तर नेहमीसाठी रोगमुक्त केले, त्यांना नवजीवन दिले. ॲलोपॅथी डॉक्टर आता काही करू शकत नाही, हे लक्षात आल्यावर रुग्ण शेवटचा पर्याय म्हणून डॉ. विलास डांगरे यांच्या दवाखान्यात धाव घेत होते आणि डॉक्टरांनीही आपल्यावरील रुग्णांच्या या विश्वासाला कधीच तडा जाऊ दिला नाही. कितीही अत्यवस्थ असला आणि कसाही असला तरी कोणत्याही रुग्णावर उपचार करण्यास त्यांनी नकार दिला नाही. ॲलोपॅथीला मर्यादा आल्यानंतर डॉ. विलास डांगरे यांनी होमिओपॅथी उपचाराचा राजमार्ग प्रशस्त केला. याचा अर्थ आपल्याला ॲलोपॅथी उपचार पद्धतीला कमी लेखायचे नाही. त्या उपचार पद्धतीचीही आज गरज आहे.

विशेष म्हणजे उपचार करताना डॉ. विलास डांगरे यांनी रुग्णाच्या खिशाकडे कधी पाहिले नाही. ज्या रुग्णांची आर्थिक परिस्थिती दयनीय असेल अशा रुग्णांकडून एक पैसाही त्यांनी कधी घेतला नाही. पैसे नाही म्हणून कोणी त्यांच्या दवाखान्यातून रिकाम्या हाताने परत गेला नाही. डॉक्टरांना दैवी आशीर्वाद आहे, असे म्हटले जाते, ते उगीच नाही. डॉ. विलास डांगरे यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९५४ चा अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजारचा. त्या काळात प्रत्येकाची असते, तशीच त्यांच्या घरची परिस्थिती हलाखीची. शिक्षणासाठी म्हणून डॉ. विलास डांगरे नागपूरला आपल्या मोठ्या बहिणीच्या म्हणजे ताराबाई भोयर यांच्या घरी आले आणि नागपूरचेच झाले. विलास डांगरे यांना होमिओपॅथी डॉक्टर करण्याचा त्यांचे बहीणजावई डॉ. प्रभाकरराव भोयर यांचे यासाठी सगळ्यांनी आभारच मानले पाहिजे. १९७४ मध्ये विलास डांगरे यांनी होमिओपॅथीचा डिप्लोमा घेतला, त्यानंतर त्यांना मागे वळून पाहण्याची गरजच पडली नाही. त्यांच्या हाताला दैवी असे यश आहे. रुग्णाची नाडी पाहिली की त्यांना काही सांगण्याची गरज पडत नाही. अशा डॉक्टरांची संख्या आज कमी होत आहे. नि:स्वार्थ वैद्यकीय सेवेची ५१ वर्षे त्यांनी पूर्ण केली आहे, रुग्णसेवेचा हा सुवर्णमहोत्सवच म्हटला पाहिजे. डॉ. विलास डांगरे यांच्याकडून उपचार करून घेणाऱ्या अनेक अति महत्त्वाच्या नेत्यांची यादी पाहिली म्हणजे डोळे दिपून जातात. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, नितीन गडकरी, सुषमा स्वराज, बाळासाहेब ठाकरे, मोहन धारिया, विलासराव देशमुख, गुलाम नबी आझाद, बनवारीलाल पुरोहित, विजय भटकर, मुकुल वासनिक, विलास मुत्तेमवार अशी त्यांच्या अतिमहत्त्वाच्या रुग्णांची किती नावे सांगावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डांगरे यांचे औषध घेतले. डॉक्टर संघाचे स्वयंसेवक असले तरी काँग्रेसचे वा अन्य पक्षांचे कितीतरी नेते त्यांच्याकडून मोठ्या विश्वासाने औषध घेतात. कितीही मोठा आणि श्रीमंत व्यक्ती वा राजकारणी असो की, एखादा सामान्य माणूस डॉक्टर त्याच्याशी तेवढ्याच आपुलकीने आणि जिव्हाळ्याने बोलणार, त्याची ख्यालीखुशाली विचारणार. कोणताही रुग्ण डॉक्टरच्या आपुलकीच्या आणि जिव्हाळ्याच्या बोलण्यानेच अर्धा बरा होत असतो. गंमत म्हणजे नागपुरातीलच नाही तर मध्य भारतातील अनेक ख्यातनाम आणि चांगली प्रॅक्टिस असलेले अनेक ॲलोपॅथी डॉक्टर डॉ. विलास डांगरे यांच्याकडून औषध घेतात, ते उगीच नाही. डॉ. विलास डांगरे यांची रा. स्व. संघानंतर श्रद्धा आहे, रामकृष्ण परमहंस, मां शारदा आणि स्वामी विवेकानंद यांच्यावर. या गोष्टींसाठीच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले आहे. रामकृष्ण मठ हे त्यांचे दुसरे श्रद्धास्थान म्हणायला हरकत नाही. नागपूरच्या रामकृष्ण मठात त्यांचे नियमित जाणे आहे. याठिकाणी स्वामी व्योमरूपानंद यांच्या आग्रहाने विलास डांगरे यांनी स्वामी वीरेश्वरानंद यांच्याकडून दीक्षा घेतली. स्वामी वीरेश्वरानंद यांना मां शारदा यांनी दीक्षा दिली होती. तीन आरसाठी डॉ. विलास डांगरे यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. रा. स्व. संघ, रामकृष्ण मठ आणि आपले रुग्ण. यासाठी त्यांनी विवाहही केला नाही. रुग्णांचा परिवार हाच आपला परिवार मानला.

मधल्या एका दुर्दैवी घटनेने डॉक्टरांना आपली दृष्टी गमवावी लागली. पण त्यामुळेही ते निराश झाले नाहीत. बरे झाल्यानंतर त्यांनी पुन्हा रुग्णसेवेला प्रारंभ केला. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या घटनेनंतरही त्यांच्या स्मरणशक्तीत काहीच फरक पडला नाही. आपले दु:ख आणि वेदना विसरत त्यांनी रुग्णांना बरे करण्याचा संकल्प नव्याने सोडला. रुग्णसेवा हीच ईशसेवा यावर त्यांची अढळ अशी निष्ठा आहे. काही माणसं समाजासाठी जगत असतात, यासाठी आपल्या आयुष्याचा होमकुंड करून टाकतात. आज वैद्यकीय व्यवसायाबद्दल फारसे चांगले बोलले जात नाही. वैद्यकीय सेवा ही अतिशय महागडी होत चालली आहे. डॉक्टर होताना जी शपथ घेतली जाते, त्याचा नंतर अनेकांना विसर पडू लागला आहे. याचा अर्थ सगळेच ॲलोपॅथी डॉक्टर खराब आहेत, असे नाही. आजही ॲलोपॅथीत अनेक चांगले, सेवाभावी आणि समर्पित डॉक्टर आहेत, पण त्यांची संख्या कमी आहे. अशा डॉक्टरांची संख्या वाढण्याची गरज आहे. वैद्यकीय क्षेत्रातील या नकारात्मक परिस्थितीत डॉ. विलास डांगरे यांच्यासारखे सेवाभावी डॉक्टर अंधारात मिणमिणत्या दिव्यासारखे काम करत आहेत. अंधार दूर करण्यासाठी एक पणतीच पुरेशी असते. डॉ. विलास डांगरे यांचे काम अशाच पणतीसारखे आश्वासक आणि दिलासादायक आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# राष्ट्रपतींना 'व्हेटो' नाही!

ग्यानी झैलसिंग राष्ट्रपती असतानाची ही घटना. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्याशी त्यांचे शीतयुद्ध सुरू होते. त्या शीतयुद्धाचा एक भाग म्हणून ग्यानीजींनी संसदेने पारित केलेल्या पोस्टल विधेयकाला आपली मंजुरी रोखून ठेवली होती. राष्ट्रपतींनी विधेयकाला मंजुरी द्यावी म्हणून राजीव गांधी आपल्या काही मंत्र्यांना राष्ट्रपतींकडे पाठवीत होते. पण, ग्यानीजी त्यास तयार नव्हते.

**ताजा निवाडा :** सर्वोच्च न्यायालयाचे दोन न्यायमूर्ती न्या. पारडीवाला व न्या. महादेवन् यांनी तामिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल या प्रकरणात दिलेल्या निवाड्यानंतर राष्ट्रपतींना हे करता येणार नाही. राष्ट्रपती व राज्यपाल यांना एखाद्या विधेयकावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. आजवर अशी कोणतीही कालमर्यादा नसल्याने राष्ट्रपती वा राज्यपाल यांना वादग्रस्त विधेयक एकदम न फेटाळता ते थंड्याबस्त्यात ठेवण्याची सोय होती. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निवाड्याने ही सोय काढून घेण्यात आली आहे. या निवाड्याचे सर्वसाधारणपणे स्वागत करण्यात आले असले तरी त्यातील एका उणिवेवर बोट ठेवण्यात आले आहे.

**राष्ट्रपतींची बाजू :** सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेले प्रकरण राज्य सरकार विरुद्ध राज्यपाल असे होते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आपला निवाडा यापुरताच मर्यादित ठेवला असता तर बरे झाले असते असे मानले जाते. सर्वोच्च न्यायालयाने सारासार विचार करून राष्ट्रपतींसाठीही एक कालमर्यादा घालून दिली आहे. पण असे करताना न्यायालयाने राष्ट्रपतींची बाजू ऐकून घेतली नाही ही या निवाड्यातील एक वादग्रस्त बाब ठरली आहे. अटर्नी जनरल आर. वेंकटरमाणी यांनी म्हटले आहे, या साऱ्या वादात राष्ट्रपतींची बाजू ऐकून घेणे आवश्यक होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली नाही. या साऱ्या प्रकरणात राष्ट्रपती कुठेच नव्हते. अटर्नी जनरलांची ही खंत योग्य अशीच आहे. केंद्र सरकार याबाबत सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल करणार काय, या प्रश्नांवर अटर्नी जनरलांचे उत्तर होते, याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

**वेणुगोपाल यांची प्रतिक्रिया :** माजी अटर्नी जनरल व नामवंत कायदेपंडित के. के. वेणुगोपाल यांनी मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशावर समाधान व्यक्त केले आहे. राज्यपाल व राष्ट्रपती यांना एकाच पारड्यात ठेवून सर्वोच्च न्यायालयाने योग्य तेच केले आहे, असे वेणुगोपाल यांनी म्हटले आहे.

**कलम २०० व २०१ :** राज्यघटनेच्या कलम २०० व २०१ मध्ये याबाबत तरतूद करण्यात आली आहे. कलम २०० मध्ये राज्यपालांच्या कृतीची चर्चा करण्यात आली आहे तर कलम २०१ मध्ये राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राखून वा रोखून ठेवलेल्या विधेयकांची चर्चा करण्यात आली आहे. सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास कलम २०१ हे राज्यपालांनी कलम २०० अंतर्गत घेतलेल्या निर्णयाच्या परिणामांबाबत आहे.

**वादाचा प्रारंभ :** विविध राज्यांच्या विधानसभांनी पारित केलेल्या विधेयकांना त्या त्या राज्याच्या राज्यपालांनी मंजुरी न देता ते थंड्याबस्त्यात ठेवण्याच्या घटना मागील काही वर्षांपासून घडत आहेत. प्रथम हे पंजाबमध्ये झाले, केरळमध्ये झाले आणि तामिळनाडूतही झाले. तामिळनाडू विधानसभेने काही विधयके पारित केल्यानंतर ती मंजुरीसाठी राज्यपालांकडे पाठविण्यात आली. राज्यपालांनी त्या विधेयकांना मंजुरी न देता ती फेरविचारासाठी राज्य विधानसभेकडे पाठविली. राज्य विधानसभेने ती पुन्हा मंजूर करीत, मंजुरीसाठी पुन्हा राज्यापालांकडे पाठविली. घटनेनुसार राज्यपालांनी या विधेयकांना स्वीकृती देणे अपेक्षित होते. त्यांनी ती न देता राष्ट्रपतींकडे पाठविली. एकूण १० विधेयकांपैकी राष्ट्रपतींनी तीन विधेयकांना मंजुरी दिली आणि सात विधेयके थंड्याबस्त्यात टाकली. त्यांनीही त्यावर कोणताही निर्णय घेतला नाही. या विरोधात तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यावर निवाडा देताना सर्वोच्च न्यायालयाने ९० दिवसांच्या आत अशा विधेयकांवर निर्णय घेण्यात यावा अशी कालमर्यादा राज्यपाल व राष्ट्रपती दोघांसाठीही निर्धारित केली.

**निर्णय म्हणजे मंजुरी नव्हे :** सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती व राज्यपाल यांना विधेयकाला मंजुरी देण्यासाठी ९० दिवसांची कालमर्यादा घालून दिली असली तरी, याचा अर्थ ९० दिवसांच्या आत त्या विधेयकाला मंजुरी देणे असा मात्र नाही. राष्ट्रपतींना विधेयकाबाबत काही स्पष्टीकरण हवे असल्यास ते त्यांनी संबंधित राज्यांकडून मागवावे आणि राज्यांनी याबाबत राष्ट्रपतींना पूर्ण सहकार्य करावे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय योग्य असाच आहे. मात्र, तो घेण्यापूर्वी राष्ट्रपतींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली असती तर ते योग्य झाले आहे. कारण, न्यायाचे एक प्रमुख तत्त्व म्हणजे सर्व पक्षांना ऐकून घेणे. यात राष्ट्रपती एक 'पक्ष' आहे. त्यांचीही एखादी भूमिका असावी. सर्वोच्च न्यायालयाने ती ऐकून घेतली असती तर ती बाजूही देशासमोर आली असती.

**तर आमचा सल्ला मागावा :** राज्य सरकारने पारित केलेल्या विधेयकांबाबत निर्णय घेताना राष्ट्रपतींच्या मनात काही शंका- कुशंका असतील तर राष्ट्रपतींनी कलम १४३ अंतर्गत त्यांना असेलल्या अधिकारांचा वापर करीत सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागावा असेही या निवाड्यात नमूद करण्यात आले आहे. मात्र यासाठी आम्ही राष्ट्रपतींना सक्ती करू शकत नाही. राष्ट्रपतींनी सल्ला मागितल्यास तो एक चांगला निर्णय असेल असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. यासाठी न्यायालयाने काही देशांतील घटनात्मक तरतुदींचा हवाला दिला आहे.

**राष्ट्रपतींना व्हेटो नाही! :** एखाद्या विधेयकाची मंजुरी रोखून ठेवण्याबाबत राज्यपालांना व्हेटो म्हणजे नकाराधिकार नाही. हीच बाब राष्ट्रपतींना लागू होते असे परखड भाष्य सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निवाड्यात केले आहे.

**संदर्भ पाकिस्तानचा :** ४१५ पृष्ठांच्या या ऐतिहासिक आदेशात सर्वोच्च न्यायालयाने अमेरिका व पाकिस्तान यांच्या राज्यघटनांमध्ये असेलल्या तरतुदीचांही संदर्भ दिला आहे.

**'मूळ चौकटीचे' मूळ :** ५२ वर्षे व तीन दिवसांपूर्वी २४ एप्रिल १९७३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार खटल्यात एक निवाडा दिला होता. ७ विरुद्ध ६ अशा अटीतटीच्या निवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार तर आहे पण, घटनेच्या मूळ चौकटीला धक्का लावणारी घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार नाही असे म्हटले होते. राज्यघटनेची मूळ चौकट म्हणजे काय हेही न्यायालयाने आपल्या निवाड्यात परिभाषित केले आहे. पण, हा 'मूळ चौकट' शब्द आला कुठून?

पाकिस्तान सर्वोच्च न्यायालयाच्या एका न्यायाधीशाने आपल्या एका निवाड्यात या शब्दाचा वापर केला. नंतर भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने त्याचा वापर केला. ज्येष्ठ विधिज्ञ फॉली नरिमन यांच्या एका पुस्तकात हा रंजक किस्सा सांगण्यात आला आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ताज्या निवाड्यात पुन्हा एकदा पाकिस्तान राज्यघटनेचा संदर्भ दिला आहे हे विशेष.

**उपराष्ट्रपतींचे अण्वस्त्र! :** सर्वोच्च न्यायालयाच्या या निवाड्यावर, विशेषत: राष्ट्रपतींसाठी त्यांनी घालून दिलेल्या कालमर्यादेबाबत सरकारी गोटातून टीका केली जाईल हे अपेक्षित होते. तसे झालेही. उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी या विधेयकावर टीकास्त्र नव्हे तर अण्वस्त्र सोडले आहे. येणाऱ्या काळात या अण्वस्त्राचे साद-पदसाद उमटत राहणार आहेत.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# लोकप्रतिनिधींशिवाय लोकशाही कशी?.

साडेचार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वारंवार पुढे ढकलल्या जात आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा नेहमी उपस्थित केला जात असून, न्यायालयात या विषयाच्या अनेक याचिका दाखल आहेत. ठोस कारणांशिवाय निवडणुका रोखून धरता येत नसल्याची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. परंतु, अद्याप या विषयावर तोडगा निघालेला नाही. राज्य निवडणूक आयोगाने अनेक ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत जाहीर केली. अनेक ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षणही जाहीर केले. परंतु, निवडणुका मात्र होऊ शकल्या नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींशिवाय लोकशाही कशी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महाराष्ट्रात २७ हजार ९५१ ग्रामपंचायती आहेत. यातील बहुतांश ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राजवट आहे. अनेक ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत काढून सहा महिने लोटले. परंतु, निवडणुका जाहीर होत नसल्याने नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये कमालीची नाराजी आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून मुदतीत निवडणुका घेण्याची सूचना निवडणूक आयोगाला करण्यात आली. राज्य सरकारही निवडणुका घेण्यासाठी इच्छुक आहेत. मग, घोडे अडले तरी कुठे, असा प्रश्न पडतो. ग्रामपंचायती आणि सरपंचांना कायद्याने विशेषाधिकार दिले आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी हजारावर योजना आहेत. परंतु, या योजना राबविणारे सरपंच आणि ग्रामसभाच अस्तित्वात नसल्याने बहुतांश विकासकामे ठप्प आहेत. जानेवारी २०२६ मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परंतु, न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा पेच सुटलेला नाही आणि अशातच नवनवीन याचिका दाखल केल्या जात आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणूक पार पडली. यानंतर तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, अशी अपेक्षा होती. या निवडणुकांच्या मार्गातील ओबीसी आरक्षण केवळ एवढाच अडसर नाही तर अन्य अनेक मुद्यांबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल आहेत. या सर्व प्रश्नांवर न्यायालयाने एकत्रित सुनावणी घ्यावी, अशी जनतेची अपेक्षा आहे. केवळ ग्रामपंचायतींच्याच नाही, तर मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २५७ नगरपालिका आणि २८९ नगर पंचायतींच्या निवडणुका बाकी आहेत. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भातील ढीगभर याचिकांचा निपटारा केला तरीही निवडणूक कार्यक्रम काही घोषित होऊ शकला नाही!

जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक असल्याने अधिकाऱ्यांवर कोणाचाच वचक राहिलेला नाही. नको तिथे पैसा खर्ची होत आहे आणि गरजेच्या ठिकाणी हात आखडता घेतला जात आहे. हा सर्व सावळागोंधळ रोखण्यासाठी निवडणुका हाच एकमेव मार्ग आहे आणि नेमका हाच मार्ग विविध कारणांनी अवरुद्ध करून ठेवलेला आहे. निवडणुकांसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी वारंवार पुढे ढकलली जात आहे. आता जनता या प्रकाराला त्रासली असून होईल त्या स्थितीत निवडणुका घ्या, अशी मागणी होऊ लागली आहे. २५ फेब्रुवारी २०२५ च्या सुनावणीतही फार काही निष्पन्न झालेले नाही. स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी नसल्याने नागरिकांची विविध कामांसाठी परवड होत आहे. संपूर्ण महाराष्ट्राचाच कारभार सध्या अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाखाली आहे. निवडणुका होत नसल्याने काहींनी यासाठीही न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. परिणामी, न्यायालयाचाही वेळ खर्ची पडत आहे. लोकप्रतिनिधींअभावी रस्त्यावरील खड्डे, गटारी-नाल्यांची सफाई, पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती एवढेच काय, नागरिकांच्या प्रमाणपत्रांचीही कामे खोळंबली आहेत. लोकप्रतिनिधींवर नागरिकांचा वचक असतो. कारण, त्यांना पुन्हा निवडून यायचे असते. परंतु, अधिकाऱ्यांना ही भीती नसते. काही ठिकाणी प्रत्यक्ष आमदारांनाच ही स्थानिक कामे करावी लागत आहे. मार्च २०२१ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता येणार नाही, या सबबीवर सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आणि तेव्हापासून महाराष्ट्राच्या वाट्याला ही डोकेदुखी आली. तत्कालीन सरकारने आपली बाजू योग्यरीत्या मांडली असती तर आज हा पेच निर्माण झाला नसता. परंतु, आता पश्चात्ताप करण्याशिवाय उपाय नाही.

देवेंद्र फडणवीस यांचा नगरसेवक, महापौर, आमदार, मुख्यमंत्री असा प्रवास राहिलेला आहे. त्यामुळे त्यांना या समस्येची चांगलीच जाण आहे. त्यामुळेच नागरिकांसह राजकीय कार्यकर्त्यांना त्यांच्याकडून मोठी अपेक्षा आहे. सरकार निवडणुका घेण्याबाबत आग्रहीसुद्धा आहे. परंतु, न्यायालयीन कामकाजात सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसतो. परिणामी, हा मुद्दा खूपच गुंतागुंतीचा होऊन बसला आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली चिंता

सर्वोच्च न्यायालयाने एका नाजूक विषयावर परखड मत व्यक्त केलेले आहे. यामध्ये न्यायमूर्ती म्हणतात की, आज काळ बदलत चाललेला आहे. मुला-मुलींचे कॉलेज जीवनातील संबंध हे लग्नापर्यंत पोहोचतीलच असे नाही. तर त्यांच्यामध्ये ब्रेकअप झाले असता मुलावर दाखल होणारा बलात्काराचा गुन्हा योग्य नाही. असे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. यामध्ये न्यायमूर्ती स्पष्ट करतात की, आमच्याही घरी मुली आहेत. परंतु तरीसुद्धा न्याय म्हणून बघताना अशा संबंधांना समजून घेणे आवश्यक आहे.

सातत्याने वर्तमानपत्रात छापून येणारी बातमी म्हणजे लग्नाचे आमिष दाखवून प्रस्थापित केलेल्या संबंधांमुळे युवकावर गुन्हा दाखल करण्यात आला. कधी कधी मुलीचे वय साडेसतरा वर्षे असल्यामुळे ती अल्पवयीन आहे असेही म्हटले जाते. तसे पाहिले तर साडेसतरा आणि अठरा याच्यामध्ये फारसा फरक नाही. तरीही सातत्याने कुठलेही संबंध लग्नापर्यंत जर पोहोचले नाही तर मुलांवर हमखास अशा पद्धतीचे आरोप होतात व त्यांच्यावर गुन्हे सुद्धा दाखल होतात. अशा गुन्ह्यांमध्ये त्यांच्या जीवनातील अनेक वर्षे निघून गेल्यावर जर माननीय सर्वोच्च न्यायालयासारखे न्यायालय त्याच्यावरचे गुन्हे रद्द करण्याचा आदेश देतही असेल तरीसुद्धा विलंबाने न्याय मिळणे म्हणजे न्याय नाकारणेच होय. आता तीस वर्षांच्या एका आयपीएस झालेल्या आणि २८ वर्षांच्या एका डॉक्टर तरुणीचे एक प्रकरण नुकतेच चर्चेत आलेले आहे. यामध्ये सुद्धा आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवून संबंध ठेवले अशा पद्धतीचा आरोप ठेवून त्याच्यावर गुन्हा दाखल केला गेला आहे. हे लोक अनेक वेळा भेटले आणि लग्नाआधी केरळला फिरायला सुद्धा गेले. दोघेही सज्ञान आहेत. वय सुद्धा काही बालिश नाही. दोघेही उच्चशिक्षित आहेत.

आणखी एका प्रकरणांमध्ये एक विधवा स्त्री जी ४५ वर्षांच्या वर आहे व आरोपी पन्नास वर्षांचा पोलिस अधिकारी आहे यांचेही अशाच प्रकारचे 'आमिष'प्रकरण समोर आले होते. संबंधविच्छेद म्हणजे ब्रेकअप नंतर मुलगी साडेसतरा वर्षांची असो की पंचेचाळीस वर्षांची, बारावी पास असो की एमबीबीएस डॉक्टर, आरोप मात्र लग्नाचे आमिष दाखविणे हेच असतात. डॉक्टर झालेल्या मुलीने आमिषाला बळी पडण्याचे कारणच काय? तिला चांगला डॉक्टर मुलगा मिळाला नसता का?



माझ्या 'नाही'चा अर्थ नाहीच होतो हे सूत्र का पाळले जात नाही. या सर्व प्रकरणातील गंभीरता लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने आपली चिंता व्यक्त केली असेल असे वाटते. पूर्वी एक काळ असा होता की मुली फारशा शिकत नव्हत्या किंवा त्यांना नोकरी राहत नव्हती अशा वेळेस नोकरी करणारा मुलगा ही एक मोठी गोष्ट समजली जात होती. परंतु आता समाज बदललेला आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये कोणीही भेदभाव करत नाही. त्यामुळे दोघांनाही शिक्षणाच्या समान संधी प्रदान केल्या जातात. अनेक समाजामध्ये तर लग्नासाठी मुलीच मिळत नाही अशा परिस्थितीमध्ये मुलगा मुलीला लग्नाचे आमिष कसे दाखवू शकतो? कारण ५० हजार रुपये सुद्धा पगार असलेल्या मुलांना आज मुली मिळत नाही ही एक वास्तविकता आहे. त्यामुळे लग्नाचे आमिष मुलींनी मुलांना दाखविण्याची वेळ आलेली आहे. अशा प्रकारच्या संबंधांमध्ये टाळी एका हाताने वाजत नाही याचे ही स्मरण ठेवणे आवश्यक आहे. ज्या समस्या शिक्षकांना दहाव्या वर्गात बघायला मिळत होत्या, त्या त्यांना आता सहावी, सातवीमध्ये बघायला मिळत आहे. जी मद्यसंस्कृती पूर्वी मुंबई, पुण्यापुरती मर्यादित होती, ती आता तीन-चार लाखांच्या शहरांपर्यंत सुद्धा पोहोचलेली आहे. पानठेल्यावर सिगारेट पिणाऱ्या मुलांसोबतच मुलीही आपल्याला दिसू शकतात.

मुलांना मैत्रीण आणि मुलीला मित्र जर असतील तर आई-वडील सुद्धा त्यांच्याकडे शंकाग्रस्त दृष्टीने लक्ष ठेवायचे. हळूहळू याला मागासलेपणा समजला जाऊ लागला. यामध्ये मुलींचे वडील जास्तच मागास आणि कालबाह्य वृत्तीचे आहेत असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात येऊ लागला. फॅशनच्या नावाखाली जी पोशाख संस्कृती सर्वत्र दिसू लागली तिच्यावर जर कोणी बोट ठेवले तर त्याला सर्वांत प्रथम विरोध घरातूनच व्हायचा आणि तो म्हणजे मुलीच्या आईचा. तुम्हाला काही समजत नाही. आजकाल जग कुठे गेलेले आहे हे तुम्हाला माहीत आहे का? हाऊस मौज आता नाही करायची तर केव्हा करायची. समाज प्रबोधन करणाऱ्या एखाद्या वक्त्याने या विषयावर जर आपले काही मत मांडले तर पुरोगामी असलेल्या अनेक विदुषी त्यांच्यावर आक्रमकपणे तुटून पडायला तयार असायच्या आणि असा विषय मांडणाऱ्यांची मानसिकता किती रोगग्रस्त आहे, त्यांच्या डोक्यातच किती खराबी आहे अशा पद्धतीचे विषय मांडले जायचे. त्यामुळे घरातल्या वडिलांचा विरोध मोडून काढला गेला. समाजातले या विषयावर बोलणारे, लिहिणारे काही लोक असतील तर तेही थंड झाले. त्यामुळे या विषयाला विरोध करणारा ना घरात उरला ना महाविद्यालयात उरला. त्यामुळे महाविद्यालयातील स्नेहसंमेलने आणि विविध कार्यक्रम हे अनेक लोकांसाठी पर्वणी ठरू लागले. व्हॅलेंटाईन डे, रोज डे, फ्रेंडशिप डे सारखे उत्सव हे समाज उत्सव झाले आणि यातूनच मैत्रीच्या नव्या व्याख्या जन्माला आल्या. मर्यादा कोणी ओलांडली हे बघणे गौण झाले. फक्त काही ब्रेकअप हे आवाज न होता तर काही आवाज करून होतात. काहींमध्ये गुन्हे दाखल होतात.

सगळेच मुलं किंवा मुली असे अजिबातच नाही. कोणाच्या जीवनामध्ये एखादा असा प्रसंग घडल्यास त्यांचे संपूर्ण जीवनच तसे जाणार आहे असाही याचा अर्थ नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या मताचा व चिंतेचा आपणही आदर व सन्मान केला पाहिजे. अशा पद्धतीचे सर्व धोके ओळखून आपण आपल्या घरातील पाल्यांना कशा पद्धतीने सजग, जागृत करू शकू याचा पालकांनीही विचार केला पाहिजे. अशा पद्धतीच्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांना सुद्धा आपल्या संवादामध्ये कशा पद्धतीचा बदल करावा लागेल याचाही विचार शिक्षकांनी करणे गरजेचे आहे. भविष्यकाळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे समुपदेशन ही सुद्धा काळाची एक गरज होऊन बसणार आहे. वृत्तपत्रांमध्ये छापून येणारे असे सर्व आमिषाचे प्रसंग शाळा, महाविद्यालये अशा सर्व ठिकाणी सांगितले गेले पाहिजे. जेणेकरून पुढच्याच ठेच मागचा शहाणा अशा पद्धतीने काहीतरी सुधार होऊ शकेल. ठेच खाऊन शहाणे होण्यापेक्षा इतरांना लागलेल्या ठेचा बघून आपण आपोआपच शहाणे होणे आवश्यक आहे. सुप्रीम कोर्टाच्या चिंतेवर आपण उपाय शोधू शकल्यास उत्तमच आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### संघटन म्हणजेच शक्ती

आम्ही बालपणी संघ शाखेत खेळ खेळायचो . त्याच नाव 'संघटन में शक्ती हैं.' खरंच आहे संघटन एक महाशक्ती आहे. त्याचा संघटक उत्तम असला पाहिजे. त्याचं एक छान उदाहरण म्हणजे ब्रिटनचा व्हाईसराय लॉर्ड माऊंबॅटनने म्हटलं होतं की, छत्रपती शिवाजी महाराजांसारखा उत्तम संघटक आमच्या इंग्लंडमध्ये जन्माला असता तर त्याने संपूर्ण ब्रह्मांडावर राज्य केले असते. उत्तम संघटक असेल तर उत्तम संघटना निर्माण होते. आताच मागील दोन महिन्यापूर्वी नरेंद्रनगर मैदानावर 'मुख्यमंत्री चषक अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा' पार पडली. तीन ते चार दिवस ही स्पर्धा चालली. कुठल्याही संघाचे भांडण नाही, कुठल्याही परीक्षकांची अरेरावी नाही आणि कुठल्याच प्रकारचा गोंधळ नाही. अगदी मस्त नरेंद्रनगरवसी व संपूर्ण नागपूरकरांनी भरपूर आनंद घेतला. विशेष म्हणजे आजच्या मोबाईलच्या युगात लहान मुलेसुद्धा या स्पर्धेचा आनंद घेत होते.

संस्था मजबूत असेल तर कोणतेही सामाजिक कार्य अगदी सहजपणे पार पडू शकते हे या लक्षवेध संस्थेकडून शिकण्यासारखे आहे. १९९० मध्ये पहिले नरेंद्रनगर क्रीडा मंडळ म्हणन ही संस्था उदयास आली. नंतर हळहळ त्याचा वटवृक्ष होत २००४ मध्ये तिचे रूपांतर लक्षवेध बहुउद्देशीय संस्था म्हणून नावारूपास आली. कबड्डी सामन्यासाठी एकाच वेळेस सुमारे ५ ते ६ हजार प्रेक्षक बघू शकतील असे सुंदर प्रकाशझोतातील मिनी स्टेडियम तयार केले होते. पिण्याच्या पाण्याची सोय, गाड्या पार्किंग व्यवस्था अगदी चोख. आलेल्या सर्व संघाची नाश्ता, भोजन, निवासाची पूर्ण व्यवस्था संस्थेने केली होती. उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले, तर बक्षीस वितरण नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. सांगायचं तात्पर्य हे की, जर संघटन मजबूत असेल तर कोणतेही कठीण कार्य ते उत्तमरीत्या पार पाडू शकता. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नरेंद्रनगर लक्षवेध बहुउद्देशीय संस्था हे होय.

**भूषण पांढरीपांडे**/७०५७०६४७६७

### कशासाठी? पोटासाठी!

कोरोनाचे उच्चाटन झाल्यानंतर आजकल बांधकाम क्षेत्रात जबरदस्त मागणी वाढली आहे. प्रत्येक जण घर खरेदी करण्यात अग्रेसर आहे. घराची मागणी वाढल्यामळे कशल मनष्यबळाची गरज वाढली आहे. ती पूर्ण करण्याकरिता बाहेरील राज्यातील मजूर रोजंदारीवर आपल्या महाराष्ट्रात येत आहेत. त्यामुळेच घराचे बांधकाम वेळेत पूर्ण होत आहे. पण ते मजूर किती धोकादायक स्थितीत काम करतात हे प्रत्यक्ष पाहिल्यावर लक्षात येते. आपण ज्या आलिशान घरात राहायला जातो ते यांच्या जीवावर उदार होऊन करण्यामुळे शक्य होते. पण त्यांची स्थिती काय आहे. राहायला टीनाची झोपडी, उघड्यावर अंघोळ, रस्त्याच्या कडेला एखादे कापड अंथरूण लहान बाळाला झोपवणे. उघड्यावर लाकडाच्या काड्या पेटवून स्वयंपाक करून जेवणे. इतका त्रास असून सुद्धा हे लोक मजेत आयुष्य जगतात. मालकांना काय दिवसभर काम करणारे मजूर हवेच असतात. एखाद्याचा दुर्घटनेत मृत्यू झाल्यास सरकार आणि मालक दोन-चार लाख त्यांच्या कुटुंबाला देतात आणि त्यांचे तोंड बंद करतात. पण त्यांच्या सुरक्षिततेबद्दल काहीच योजना आखत नाहीत. विस्थापित मजुरांबद्दल सगळेच बेफिकीर असतात. घरचे दारिद्र्य त्यांना असा धोका पत्करायला भाग पाडते. हे चक्र पोटासाठी असेच सुरू राहणार.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

### काँग्रेस पक्षाला ना धोरण, ना राजकीय इच्छाशक्ती

मुंबईत झालेल्या २६/११ च्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार तहव्वूर राणा याला भारतात आणल्यानंतर काँग्रेस पक्षात नुसती अस्वस्थता पसरली आहे. याचा परिणाम म्हणा की केंद्रीय, राज्यस्तरीय काँग्रेसच्या नेते मंडळींकडून रोज वाट्टेल ती विधाने, प्रतिक्रिया या विषयावर ऐकण्यास येत आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी तर दहशतवादी तहव्वूर राणाचा मानवाधिकार जपला जावा असे म्हटले आहे. काँग्रेसचे आमदार विजय वड्डेटीवार यांनी तहव्वूर राणाला आणायला पंधरा वर्षे का लागली? महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर मुंबईमध्ये त्याचा उपयोग करून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करतील, असे म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार २०१४ मध्ये केंद्रात आल्यानंतर खऱ्या अर्थाने या विरुद्ध परत एकदा कारवाईस सुरुवात झाली होती. याचा परिणाम मुंबई दहशतवादी हल्ल्याचा मुख्य आरोपी दहशतवादी तहव्वूर राणाला आज भारतात आणले गेले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या होकारामुळे हे शक्य झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काँग्रेस पक्षाला ना धोरण, ना नीती यामुळे काँग्रेस पक्षाने ज्या काही चुका केल्यात त्याचा परिणाम इतक्या वर्षांनंतरही देश भोगत आहे. आज काँग्रेस पक्ष आणि त्याचे राष्ट्रीय नेतृत्व आपली मुस्लिम व्होट बँक शाबूत ठेवण्यासाठी देशातील मोठ्या समाजाला चुकीचे ठरवत असल्यानेच चित्र देशात सातत्याने गेल्या तीन दशके दिसत आहे. एकंदरीतच आजचा काँग्रेस पक्ष एक पारिवारिक पक्ष झाला असून पक्षाची अवस्था ना धोरण ना कोणती राजकीय इच्छाशक्ती अशी झाली आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## 'गेट वे ऑफ इंडिया'वर गर्जला संविधानाचा जागर!

**तसा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. २० एप्रिल -**

संविधान अमृत महोत्सव व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त जागर संविधानाचा हा कार्यक्रम रविवारी अरबी सागराच्या साक्षीने आणि गेट वे ऑफ इंडिया या ऐतिहासिक स्थळी हजारो नागरिकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित या कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, आमदार संजय उपाध्याय, मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी मंत्री भाई गिरकर, माजी मंत्री राज पुरोहित, संस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभूषण चावरे आदी उपस्थित होते.

ना. शेलार म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांचा हा सांगीतिक कार्यक्रम केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न राहता, सामाजिक जाणीव जागवणारा हा सोहळा आहे. त्यांनी दिलेली मूल्ये, तत्वे आणि विचार जगाला मार्गदर्शक असून ती जगाच्या व्यासपीठावर नेण्यात येणार आहे, अमेरिका आणि युरोपमधील विद्यापीठात सुध्दा चर्चासत्र, शोधनिबंध सादर करण्यात येतील, असा संस्कृतिक कार्य विभागाचा मानस आहे.

संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना सांस्कृतिक विभागातर्फे हा कार्यक्रम आयोजित करून संविधानाचा जागर करण्यात येत आहे. राज्यात या निमित्ताने चर्चासत्रे, उद्देशिकेचं वाचन, घरोघरी संविधान यासारख्या उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी व अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अभिनेते सुबोध भावे यांनी केले.

# ट्रम्पविरोधात विरोधक पुन्हा रस्त्यावर

### न्यू यॉर्क, वॉशिंग्टनसह देशभरात आंदोलन; लोकशाही मूल्यांचा ऱ्हास होत असल्याची टीका

**न्यूयॉर्क, २० एप्रिल-**




अमेरिकेतील लोकशाही मूल्यांचा ऱ्हास होत असून लोकशाहीला धोका निर्माण झाल्याची टीका करीत राजधानी वॉशिंग्टनसह देशभरात विरोधकांनी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले आहे. अडीचशे वर्षांपूर्वी १९ एप्रिल १७७५ रोजी अमेरिकेत क्रांतिकारी युद्धाला प्रारंभ झाला होता. याची आठवण म्हणून ट्रम्पविरोधात विरोधकांनी आंदोलन केले. मॅनहटन, न्यूयार्क आणि व्हाईट हाऊससमोर आंदोलन करण्यात आले. बोस्टन येथील आंदोलनात ८० वर्षीय थॉमस बॅसफोर्ड सहभागी झाले होते. अमेरिकन नागरिकांवर त्यांच्याच सरकारकडून हल्ले होत असून याविरोधात उभे राहण्याची गरज असल्याचे बॅसफोर्ड म्हणाले. अमेरिकेच्या स्वातंत्र्यापुढील हा सर्वात वाईट काळ आहे. आपण मुळात कोण आहोत आणि आपल्या पूर्वजांनी काय केले त्यापासून आपण धडा घेतला पाहिजे. आता पुन्हा स्वातंत्र्यासाठी लढावे लागणार आहे, असे बॅसफोर्ड म्हणाले. कोलोरॅडो राज्यातही हजारो नागरिक एकत्र जमले. आम्ही निर्वासितांच्या पाठीशी असल्याचे फलक त्यांच्या हाती होते. तर काहींनी निराशा दर्शविण्यासाठी अमेरिकेचा ध्वज जमिनीच्या दिशेने लटकविले होते. पोर्टलँड, ओरेगो, सन फ्रॅन्सिस्को, अलास्का येथेही मोठ्या प्रमाणात नागरिकांनी ट्रम्प प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. संघीय सरकार कमजोर करण्यामागे सल्लागार एलन मस्क असल्याची नारेबाजी नागरिकांनी केली. तसेच टेस्ला कार्यालयासमोरच आयोजकांनी आंदोलनाची योजना आखली होती पण ती यशस्वी झाली नाही. आंदोलनाशिवाय अन्न वितरण, निवाऱ्यांमध्ये आश्रयास असलेल्यांची मदत करणे, त्यांना शिकविणे आदी प्रकारची आंदोलनेही करण्यात आली. कोलंबिया, साऊथ कारब्लिना, मॅनहटन आदी ठिकाणी नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेतला. **(वृत्तसंस्था)**

# समृध्दी महामार्गावर कापसाने भरलेल्या ट्रकला आग

**कारंजा लाड, २० एप्रिल-**

कापसाने भरलेल्या एका ट्रकला आग लागल्याने ट्रक जळून खाक झाला. ही घटना नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाजवळील मंगरूळ चव्हाळा गावाजवळ रविवारी पहाटे ४ वाजता घडली. कापसाने भरलेला ट्रक नागपूरकडे जात असताना अचानक ट्रकने



पेट घेतला. या आगीत कापूस गाठी व ट्रक जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. घटनेची माहिती अग्निशमन केंद्र अधिकारी विवेक माकोडे यांनी कारंजा नगरपरिषद अग्निशमन दलाचे फायरमन शुभम झोपाटे यांना दिली. त्यानंतर तत्काळ अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि आगीवर नियंत्रण मिळवले. तोपर्यंत कापूस आणि ट्रक जळून खाक झाला होता. चालक चंदू खराडे, फायरमन आमद खान, शुभम झोपाटे व मुझम्मिल खान यांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न केले. सुदैवाने यात जीवित हानी झाली नाही. **(तभा वृत्तसेवा)**

## राज्यात भाजपाच्या संघटन बांधणीला नवे बळ

### ९६३ मंडळ अध्यक्षांच्या नियुक्त्या

### नव्या २५८ मंडळांची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२० एप्रिल-**

विधानसभा निवडणूकीत अभूतपूर्व यश मिळविलेल्या भारतीय जनता पक्षाने प्रदेश संघटना मजबुत करण्यामध्येही धडाडी दाखवली आहे.

राज्यभरात एकूण १२२१ मंडळ स्थापन केले असून त्यापैकी ९६३ मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रभावी पद्धतीने करण्यात आली आहे. ''संघटन हेच खरे बळ'' या तत्त्वावर चालत महाराष्ट्रात मजबूत गड उभारण्याची तयारी केली आहे.विभागवार नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्येकोकण-ठाणे व उत्तर महाराष्ट्रात प्रत्येकी १८४ मंडळे,पश्चिम महाराष्ट्रात २२२ मंडळे,विदर्भात ३१३, मराठवाड्यात २०७ व मुंबई विभागात १११ मंडळे गठीत करण्यात आले आहेत. कार्याध्यक्ष चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी एका संघटित आणि समर्पित कार्यपद्धतीची ही सुरुवात आहे. भाजपची रणनीती आता अधिक गावखेड्यांपर्यंत पोहोचवण्याचा आणि सर्वसामान्य मतदाराशी थेट संवाद साधला जात आहे.

## 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर', 'खालिद का शिवाजी'सह 'जुनं फर्निचर' चित्रपटाची कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवड

### मंत्री आशिष शेलार यांची घोषणा

### मराठीचा डंका साता समुद्रापार

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २० एप्रिल**

फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर' आणि 'खालिद का शिवाजी' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे. तर 'जुनं फर्निचर' या चित्रपटाची विशेष निवड झाली आहे.

फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे या कालावधीत महोत्सव होत आहे. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्यावतीने कान या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा चार मराठी चित्रपटांची एन्ट्री झाली आहे. राज्याचे सांस्कतिक कार्यमंत्री अँड आशिष शेलार यांनी रविवारी पत्रकार परिषदेत त्याची घोषणा केली.

महामंडळामार्फत २०१६ पासून कान महोत्सवातील फिल्म मार्केटमध्ये मराठी चित्रपट पाठवले जात आहेत. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा आणि जागतिक सिनेप्रेमींना मराठी चित्रपटाची भूरळ पडावी, हा यामागचा हेतू आहे. या चित्रपट निवडीसाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने तज्ज्ञ परीक्षण समिती तयार केली होती. आदित्य सरपोतदार, निखिल महाजन, गणेश मतकरी, इरावती कर्णिक, अपूर्वा शालिग्राम यांचा यात समावेश होता.

### स्थळ

भारतातील ग्रामीण भागातील पारंपारिक अरेंज मॅरेज व्यवस्थेवर भाष्य करणारा 'स्थळ' हा चित्रपट आहे. समाजात खोलवर रुजलेली पितृसत्ताक पद्धत, रंगभेद आणि सामाजिक दृष्टिकोन अशा अनेक गोष्टींवर या चित्रपटात प्रकाश टाकण्यात आला आहे. सचिन पिळगांवकर या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. अभिनेत्री नंदिनी चिकटे या चित्रपटात मुख्य भूमिकेत तर दिग्दर्शन जयंत सोमलकर यांनी केले आहे.

### स्नो फ्लॉवर

'स्नो फ्लॉवर' या चित्रपटात मार्मिक, क्रॉसकंट्री कथा सांगणारा आहे. रशिया आणि कोकण या दोन वेगळ्या संस्कृतींना जोडणारा हा चित्रपट आहे. बर्फाळ सायबेरिया आणि हिरवेगार कोकण यांच्या विरोधाभासी पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट आहे. गजेंद्र अहिरे दिग्दर्शक असुन विठ्ठल अहिरे, छाया कदम, वैभव मांगले आणि सरफराज आलम सफू हे महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

### खालिद का शिवाजी

राज मोरे यांच्या ' या चित्रपटात खालिद हा मुस्लिम धर्मीय असल्याने त्याला इतर मुले एकटे पाडतात. त्याचे निरागस डोळे मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा शोध घेतात, हे या चित्रपटात दाखवले आहे.

### जुनं फर्निचर

महेश मांजरेकर अभिनित व दिग्दर्शित 'जुनं फर्निचर' हा चित्रपट ज्येष्ठ नागरिकांच्या अस्तित्त्वावर भाष्य करणारा आहे. वृद्धापकाळात पोहोचल्यावर आपलीच मुले आपल्याला कशाप्रकारे नाकारतात आणि त्यामुळे होणारे हाल दाखवण्यात आले आहेत. भूषण प्रधान हा मुख्य भूमिकेत आहे. मेधा मांजरेकर, अनुषा दांडेकर, समीर धर्माधिकारी, डॉ. गिरीश ओक, विजय निकम, संतोष मिजगर, अलका परब, शरद पोंक्षे याचाही समावेश आहे.

## चित्रपट वार्ता

### ओटीटीच्या विश्वात पदार्पण करणार भूमी



**मुंबई** : मोठ्या पडद्यानंतर आता अभिनेत्री भूमी पेडणेकर अखेर ओटीटीच्या जगात पाऊल ठेवणार आहे. ती लवकरच 'द रॉयल्स' या वेबसीरिजमध्ये दिसणार आहे. तथापि, वेबसीरिजमध्ये काम करण्याची ऑफर मिळण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही तिने अनेक ओटीटी प्रोजेक्ट नाकारले होते. भूमी म्हणाली, मला ओटीटीवर पदार्पण करण्यासाठी अनेक वेबसीरिजच्या ऑफर आल्या. मी सर्वांच्या पटकथा वाचल्या होत्या, पण त्या करण्यास नकार दिला. तथापि, नंतर ते सर्व प्रकल्प खूप यशस्वी झाले. पण सर्वात मोठी गोष्ट म्हणजे मला त्या प्रकल्पांशी द रॉयल्स सोबत जेवढे नाते होते तेवढे कधीच वाटले नाही. म्हणूनच मी हे मान्य केले. 'द रॉयल्स'मध्ये भूमी पेडणेकरसोबत ईशान खट्टर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या दोघांशिवाय या शोमध्ये झीनत अमान, साक्षी तन्वर, नोरा फतेही, दिनो मोरिया, मिलिंद सोमण, चंकी पांडे, विहान सामत आणि सुमुखी सुरेश यांच्याही भूमिका आहेत. हा शो ९ मे रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होईल.

### सामंथाच्या जीवनात पुन्हा परतले प्रेम?



**हैदराबाद** : दाक्षिणात्य अभिनेत्री सामंथा रूथ प्रभू गेले काही दिवस तिच्या आजारपणामुळे आणि वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत होती. घटस्फोटानंतर ती काहीशी अस्वस्थ झाली होती. तिचा नवरा नागा चैतन्य याने दुसरे लग्न केले आणि तो आपल्या जीवनात पुढे गेला. सामंथा मात्र अडकून पडली की काय, असे वाटत असतानाच ती एका लोकप्रिय निर्माता, दिग्दर्शकासोबत प्रेमबंधनात अडकल्याच्या चर्चा कानावर येत आहेत. राज निदिमोरू असे या निर्माता, दिग्दर्शकाचे नाव असून त्याच्यासोबत ती नुकतीच तिरुपतीच्या दर्शनाला गेली होती. सामंथा आणि राज हे पारंपरिक पोशाखात दिसून आले. विशेष म्हणजे, दोघांनी कधीही आपल्या प्रेमसंबंधांच्या बातम्यांचे खंडन केले नाही. त्यामुळे सामंथाही आपल्या आयुष्यात पुढचा विचार करू लागली आहे, हे पाहून चाहत्यांनीही समाधान व्यक्त केले.

### 'वागले की दुनिया' मध्ये सुगंधा मिश्राचा प्रवेश

**मुंबई** : सोनी सबवरील 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से' ही मालिका मध्यमवर्गीय माणसाचा दैनंदिन संघर्ष आणि त्यांच्या कुटुंबातील हृदयस्पर्शी क्षण हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडून प्रेक्षकांची आवडती मालिका बनली आहे. या लोभस विश्वात आता लोकप्रिय अभिनेत्री आणि कॉमेडीयन सुगंधा मिश्राचा प्रवेश होत आहे. ती या मालिकेत सुमन गढिया नामक एका विचित्र, अत्यंत नाटकी स्वभावाच्या स्त्रीच्या रूपात दिसणार आहे. नाटकीपणा आणि बनवाबनवी करणे तिच्या स्वभावात आहे. सुमन यामिनी (मानसी जोशी) सोबत एका नाटकात काम करत आहे आणि आपल्या एका आगामी नाटकात मध्यमवर्गीय स्त्री साकारण्यासाठी तशा स्त्रियांचे निरीक्षण करता यावे या हेतूने ती या सोसायटीमध्ये आली आहे. गोड गोड बोलून ती यामिनीला भुलवते आणि साई दर्शन सोसायटीत राहायला येते, पण प्रत्यक्षात तिचा उद्देश काही इतका सरळसोट नाही! प्रेक्षकांना लवकरच एक धक्का बसणार आहे, कारण सुमन राजेशला (सुमित राघवन) सापळ्यात अडकवण्यासाठी एक युक्ती करते आणि मग त्याच्यावर अयोग्य वर्तन केल्याचा आरोप करते. हे ऐकून सगळ्यांना धक्काच बसतो, पण वंदना (परिवा प्रणती) आणि सखी (चिन्मयी साळवी) ठामपणे राजेशच्या पाठीशी उभ्या राहतात.

# राज्यात अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण कधी लागू करणार? : सुरेशचंद्र राजहंस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २० एप्रिल-**

अनुसूचित जातीच्या आरक्षणचा लाभ एकाच जातीला न होता सर्व जातींना होण्यासाठी आरक्षणाचे अ, ब, क, ड वर्गीकरण करावे, ही अनुसूचित जातीतील उपेक्षित, वंचित जातींची गेल्या अनेक वर्षांपासून मागणी आहे. सर्वोच्च न्यायालयाने वर्गीकरणाचे अधिकार राज्यांना असल्याचा निकाल दिल्यानंतर महाराष्ट्रात निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जाती अभ्यास आयोगाची स्थापना करण्यात यावी अशी मागणी केली तत्कालीन भाजपा प्रणित शिंदे सरकारला केली होती परंतु महायुती सरकारने कर्नाटक आणि इतर राज्याचा अभ्यास दौरा करण्यासाठी अभ्यास समिती स्थापन करून समाजाची निव्वळ दिशाभूल व फसवणूक केली. अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे वर्गीकरण करण्याची इच्छाशक्ती फडणीस यांच्या नेतृत्वातील भाजपा, महायुती सरकारची नसल्याने हे सरकार केवळ वेळकाढूपणा करत आहे ,असा आरोप सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक आणि प्रदेश काँग्रेस प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस यांनी केला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या मागणीनुसार लोकसंख्येच्या आधारावर संधी मिळाली पाहिजे, जितनी आबादी उतना हक्क यानुसार काँग्रेसचे सरकार असलेल्या तेलंगणा राज्यात अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण लागू करण्याचा निर्णय तेलंगणा सरकारने घेतला परंतु महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मातंग व तत्सम समाजाच्या मतांवर डोळा ठेवून, उपेक्षित वंचित जातींच्या मतांवर डोळा ठेवून महायुती सरकारने न्या. बदर समिती गठित करून निवडणूकीत राजकीय फायदा घेतला .परंतु महायुती सरकारने गठित केलेल्या या बदर समितीला मुदतवाढ देण्यापलीकडे काही केले नाही. अशी टीका राजहंस यांनी केली आहे.

## मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वीतेसाठी शासन कटीबद्ध

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२० एप्रिल-**




वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. शासनाचे हे मिशन पूर्णत्वास नेण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने सर्वतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे. शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (थउड) ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत. तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी देखील ही संस्था सहकार्य करणार आहे. ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवून त्यांच्यावर मोफत उपचार करतील. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनाला असलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्था देखील या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

## जैन बालसंस्कार शिबिराचे गुरुवारपासून सोलापुरात आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

शहराच्या मध्यवर्ती भागातील, भुसार पेठेतील १७० वर्षांची पावन परंपरा लाभलेले, अतिशय प्रभावी व नूतन जीर्णोद्धारित असे परमपूज्य श्री दिगंबर जैन माणिकस्वामी महाराज यांचे पुण्यस्मरणप्रेरित मंदिर, हे सकल श्रद्धालू जैन भक्तांसाठी आत्मकल्याणाचा दीपवत आहे. या पुण्यभूमीत, भगवान जिनेंद्र देवाच्या कृपाछायेतील पवित्र वातावरणात, वय वर्षे ५ ते २५ या वयोगटातील बालक व बालिकांच्या अंतःकरणात जिनधर्माचे शाश्वत तत्त्व, आत्मशुद्धी, अहिंसा, संयम व सदाचाराचे बीज रोवले जावे, त्यांना धर्माचरणाचा दिग्दर्शक प्रकाश मिळावा, या पवित्र उद्देशाने, गुरुवार दि. २४ एप्रिल ते बुधवार दि. ३० एप्रिल या कालावधीत जिनधर्म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याची मंगलमय माहिती मंदिर समितीचे श्रद्धेय अध्यक्ष डॉ. रणजित हिरालाल गांधी यांनी अत्यंत नम्रपणे दिली.



भगवान जिनेंद्र देवाच्या असीम कृपेने व आचार्य, सिद्ध, उपाध्याय, साधू भगवंतांच्या दिव्य आशीर्वादाने गेल्या चार वर्षांपासून श्री दिगंबर जैन माणिकस्वामी महाराज मंदिर येथे जिनधर्म संस्कार शिबिर अखंड श्रद्धेने व भक्तिभावाने आयोजित केले जात आहे. यावर्षीही पवित्र उद्देशाने शिबिरासाठी गुगल फॉर्मद्वारे पूर्वनोंदणी करण्यात आली असून, यामध्ये १५० शिबिरार्थींनी सहभाग नोंदविला आहे. या शिबिरार्थ्यांमध्ये विशेषतः ६० बालिका भगिनींचा समावेश होऊन, धर्मसंस्कारांचे तेज उजळत आहे.

या पुण्यशिबिराचा शुभारंभ गुरुवार, दि. २४ एप्रिल रोजी सकाळी ठीक ६.३० वा. धर्मप्रेमी डॉ. आदर्श मेहता व डॉ. रश्मी मेहता यांच्या मंगल हस्ते ध्वजारोहण विधीने करण्यात येणार आहे. हे शिबिर पूर्णतः निःशुल्क असून, प्रत्येक दिवशी सकाळी ६.३० ते ११ या वेळेत शिस्तबद्ध दिनचर्येनुसार शिबिर संपन्न होणार आहे.

शिबिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम जसे की भगवान जिनेंद्राचे अभिषेक-विधी, अर्घ्य-पूजा, जिनसिद्धांत परिचय वर्ग, धर्मकथन, सामूहिक स्तोत्र-पठण तसेच जिनधर्म संस्कार पाठमाला ही धार्मिक पुस्तिका संस्कार शिबिरासाठी प्रकाशित करण्यात येणार आहे. बालक-पालकांसाठी प्रेरणादायी सांस्कृतिक सादरीकरण अशा अनेक आध्यात्मिक व प्रेरणादायी उपक्रमांचा समावेश असेल. शिबिराच्या पुण्यसमारोपदिनी, शिबिरार्थ्यांच्या अध्यात्मिक अध्ययनाचे मूल्यमापन करून, त्यांना धर्मसेवेचा गौरवचिन्ह म्हणून प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या प्रमाणपत्रांद्वारे त्यांच्या जिनधर्म निष्ठेचा सन्मान करण्यात येईल.

शिबिर कालावधीत, प्रत्येक शिबिरार्थ्यासाठी शुद्धता, सात्विकता आणि सेवाभाव ध्यानात घेऊन अल्पोपहाराची व्यवस्था, अभिषेक व पूजाविधीचे साहित्य, सोवळ्याची वस्त्रे, तसेच धार्मिक वाचन व लेखन साहित्याची पवित्र किट मंदिर समितीच्या वतीने पूर्णतः निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शिबिरार्थ्यांना जिनपूजाविधी आणि अभिषेक यांचे सखोल मार्गदर्शन प्रतिष्ठाचार्य डॉ. महावीर शास्त्री यांच्याद्वारे करण्यात येणार असून, धार्मिक तत्त्वज्ञान व आचारधर्म यांचे सुसंवादात्मक अध्यापन पं. विजय काळेगोरे, पं. रवींद्र काळे व पं. संदेश बोराळकर यांच्यासारख्या तज्ञ विद्वानांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विविध उपसमित्यांची सुयोग्यरित्या नेमणूक करण्यात आली असून, सकल दिगंबर जैन समाजातील पालकांनी आपल्या पाल्यास या शिबिरात सहभागी करून त्याच्या अंतःकरणात जिनधर्माच्या गूढ व पवित्र संस्कारांची बीजे रोवावीत, हा आवाहनपर धर्मविचार मंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. रणजित गांधी यांनी भक्तिपूर्वक व्यक्त केला.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषता बार्शी नगरपरिषद ता. बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डी. सोलापूर सब डी. व ता. बार्शीपैकी बार्शी नगरपरिषद हद्दीतील जामीन सि. स. नं. ८१ यापैकी मधील बाजूची जागा याचे क्षेत्र ५१.७५ चौ. मी. येणेप्रमाणे वर्णनाची जागा ही श्री. श्रीकांत रामचंद्र वैद्य यांचे मालकीची असून हक्कपत्रकी त्यांचे नाव दाखल आहे. सदरची मिळकत ही आमचे पक्षकार यांनी खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा खरेदी देणार यांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. आमचे पक्षकार यांनी सदर जागेची बाजार भावाने होणारी योग्य ती किंमत देऊन खरेदी घेण्याचे ठरविले असून तसा करार खरेदी देणार व आमचे पक्षकार यांचे दरम्यान दिनांक १९/04/२०२५ रोजी झालेला आहे.

तरीदेखील वर नमुद मिळकतीसंबंधाने कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास उदा. साठे करार, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, पोटगीहक्क, वारसाहक्क, फेडपत्र, भाडेपट्टा, टाच, बोजा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्याची शाबिती संबंधिताने ही नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसात कागदपत्रानिशी आमचे ऑफीसमध्ये येऊन तशी आमच्या पक्षकाराची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असून सदर मिळकतीशी कोणाचाही कसलाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही. व असल्यास त्याने तो स्वतः होऊन सोडून दिलेला आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून कोणाचीही, कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. मुदतबाह्य तक्रारींचा विचार केला जाणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सर्वाच्या माहितीकरिता हे जाहिर प्रसिध्दिकरण केले असे. ता. २१/04/२०२५.

**सही/-**
**ॲड. प्रवीण पी. करंजकर**
**''रघु -कुल'', कर्मवीर नगर, पाटील प्लॉट, बार्शी, ४१३४११**
**फो.नं. ०२१८४-२२३३४१. मो. नं. ९८२२०६५६६१**

www.tarunbharat.net
तरुण भारत




## महत्त्वाचे

### १७ वर्षीय आयुष म्हात्रेचे सीएसकेकडून पदार्पण



**मुंबई** : मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याने रविवारी वानखेडे स्टेडियमवर इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ च्या ३८ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. राजस्थान रॉयल्सने १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीला पदार्पण केल्यानंतर दुसऱ्या दिवशी, चेन्नई सुपर किंग्जने १७ वर्षीय मुंबई रणजी खेळाडू आयुष म्हात्रेला त्याची पहिली कॅप देऊन आश्चर्यचकित केले. राहुल त्रिपाठीच्या जागी आलेला म्हात्रे सीएसकेकडून खेळणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. मुंबईनेही एक बदल केला, अश्वनी कुमारला पर्यायी खेळाडूंच्या बेंचवरून प्लेइंग इलेव्हनमध्ये आणले. या हंगामात वानखेडे स्टेडियमवर खेळलेल्या तीनपैकी दोन सामन्यांमध्ये मुंबईने विजय मिळवला असल्यामुळे हार्दिक पांड्यानेही त्याच पद्धतीचे अनुसरण करण्याचा निर्णय घेतला यात आश्चर्य वाटले नाही. खेळाडूंना स्वतःला व्यक्त करू देणे महत्त्वाचे आहे, असे सीएसकेचा कर्णधार धोनी म्हणाला. या हंगामात आतापर्यंत झालेल्या सलग पाच पराभवांमधून सावरण्याचा प्रयत्न करताना आपल्या मोहिमेला पुनरुज्जीवित करण्यासाठी धोनी प्रयत्नशील आहे.

### फिट इंडिया संडेज ऑन सायकल राजकोटमध्ये

**नवी दिल्ली** : युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी राजकोटमधील भयवदर येथे देशव्यापी फिट इंडिया संडेज ऑन सायकल चळवळीचे नेतृत्व केले. ते नेहरू युवा केंद्र संघटना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या उत्साही माय भारत स्वयंसेवकांसह उत्साहाने सायकलिंग केले. ही सायकल यात्रा अधिक तंदुरुस्त, सक्रिय आणि स्थूलतामुक्त भारतासाठी सामूहिक वचनबद्धतेचे प्रतीक आहे. सायकलिंग मोहीम भारतातील अनेक ठिकाणी एकाच वेळी आयोजित करण्यात आली होती, यामध्ये सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या राजधान्या तसेच प्रादेशिक केंद्रे, राष्ट्रीय उत्कृष्टचा केंद्रे आणि खेलो इंडिया केंद्रे यांचा समावेश होता. नवी दिल्लीतील प्रतिष्ठित मेजर ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियममध्ये ६०० हून अधिक नागरिकांनी झुंबा आणि दोरीवरून उडी मारून सायकलिंग चळवळीत सहभागी झाले. यावेळी प्रसिद्ध अभिनेता आणि रग्बी इंडियाचे अध्यक्ष राहुल बोस सायकलिंग चळवळीत सहभागी झाले.

### आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताची विजयी सुरुवात

**अम्मान** : भारताने आशियाई १५ वर्षांखालील आणि १७ वर्षाखालील मुष्टियुद्ध स्पर्धेत पहिल्या दिवशी दोन विजयांसह आपल्या मोहिमेची सुरुवात केली. हार्दिक दहिया (४३ किलो) आणि रुद्राक्ष सिंगने (४६ किलो) प्राथमिक फेरीत दमदार विजयांसह सुरुवात केली. आशियाई मुष्टियुद्धने आयोजित केलेला हा पहिलाच कार्यक्रम आहे. या स्पर्धेला ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया आणि नव्याने स्थापन झालेल्या जागतिक मुष्टियुद्धने मान्यता दिली आहे. भारताने या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी ५६ सदस्यीय युवा मुष्टियुद्ध संघ मैदानात उतरवले आहेत.१५ वर्षांखालील संघात २०२४ मध्ये अल ऐन येथे झालेल्या आशियाई शालेय मुले आणि मुलींच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत कांस्यपदक विजेता रवी सिहाग तसेच २०२४ च्या सब-ज्युनियर राष्ट्रीय मुलींच्या मुष्टियुद्ध विजेता (६४-६७ किलो) तृष्णा मोहिते यांचा समावेश आहे. १७ वर्षांखालील मुलांच्या संघात २०२४ च्या आशियाई ज्युनियर स्पर्धेत अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक जिंकणारा साहिल दुहान आणि देवांश यांचा समावेश आहे.

### झ्वेरेव्हचा तिसरा विजय

**म्युनिक** : ॲलेक्झांडर झ्वेरेव्हने म्युनिकमधील बीएमडब्ल्यू ओपनमध्ये निर्दोष कामगिरी करून आपला २८ वा वाढदिवस साजरा केला, या स्पर्धेत त्याने तिसरे जेतेपद पटकावले आणि फिलिप कोलश्रेबरच्या स्पर्धेच्या विक्रमाशी बरोबरी केली. जर्मन स्टारने दुसऱ्या मानांकित बेन शेल्टनला ६-२, ६-४ असे पराभूत केले आणि घरच्या मैदानावर त्याचा आराम अधोरेखित केला. झ्वेरेव्हला ७१ मिनिटांच्या अंतिम सामन्यात एकही ब्रेक पॉइंटचा सामना करावा लागला नाही, एटीपी आकडेवारीनुसार त्याने सुरुवातीपासून शेवटपर्यंत सामना नियंत्रित केला आणि त्याची सर्व्हिस अभेद्य ठरली. हे खूप खास आहे, मला नेहमीच जर्मनीमध्ये स्पर्धा जिंकायला आवडते. कदाचित मी करू शकणारी ही सर्वात खास गोष्ट आहे. ही निश्चितच वाढदिवसाची एक उत्तम भेट आहे, चला ते अशा प्रकारे सांगूया, असे झ्वेरेव्ह म्हणाला. मला निश्चितच माहित होते की मला आज माझे सर्वोत्तम टेनिस खेळायचे आहे,

# कोहलीच्या खेळीने बंगळुरू विजयी

### पंजाब किंग्जवर ७ गड्यांनी मात

◆ **मुल्लानपूर, २० एप्रिल**

सुयश शर्मा, कृणाल पांड्या व अनुभवी भुवनेश्वर कुमारची प्रभावी गोलंदाजी आणि विराट कोहली व देवदत्त पडिक्कलच्या दमदार अर्धशतकी खेळीच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) ईडन गार्डन्सवर आयपीएल सामन्यात पंजाब किंग्जवर ७ चेंडू शिल्लक ठेवत ७ गड्यांनी दणदणीत विजय नोंदवला. या विजयाबरोबरच आरसीबीने १० गुणांसह गुणतालिकेत लखनौ, पंजाबला मागे टाकत पाचव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानी झेप घेतली. ५४ चेंडूंत नाबाद ७३ धावांची विजयी खेळी करणारा विराट कोहली सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवत सुयश शर्मा, कृणाल पांड्या व अनुभवी भुवनेश्वर कुमारने पंजाब किंग्जला २० षटकांत ६ बाद १५७ धावांपर्यंत रोखले. विराट कोहली (नाबाद ७३) व देवदत्त पडिक्कलच्या (६१) अर्धशतकी खेळीच्या जोरावर आरसीबीने १८.५ षटकांत ३ बाद १५९ धावा काढून विजय साकार केला.

पंजाब किंग्जकडून प्रियांश आर्य ( २२) व प्रभसिमरन सिंग (३३) या सलामी जोडीने ४२ धावांची भागीदारी केली. या दोघांनी




सामनावीर विराट कोहली

पॉवरप्लेमध्ये मोठी खेळी केली. मात्र हे दोघांनाही कृणाल पांड्याने टिम डेव्हिडकडून झेलबाद करून तंबूत परत पाठविले. कर्णधार श्रेयस अय्यर (६) पुन्हा एकदा अपयश ठरला. रोमारियो शेफर्डच्या चेंडूवर त्याचा उडालेला झेल कृणाल पांड्याने लाँग-ऑनवर पकडला. पुढे जोश इंग्लिस (२९) व शशांक सिंगने (३१) संघाची दावसंख्या वाढवण्याचा प्रयत्न केला. नेहल वढेरा (५) अनावश्यकपणे धावबाद झाला. सुयश शर्माने एका षटकांत दोन गडी बाद केले, त्यामुळे पंजाब किंग्जची १४ व्या षटकात ६ बाद ११४ अशी घसरली. शशांक सिंग व मार्को जानसेनने डेथमध्ये मोठी खेळी करण्याचा प्रयत्न केला, परंतु भुवनेश्वर आणि हेझलवूडने त्यांना फारशी संधी दिली नाही. जानसेन व शशांक बाद झाले नाहीत, परंतु शेवटच्या चार षटकांमध्ये ते केवळ २८ धावा करू शकले. जॅनसेनने डावाचा शेवट षट्कार मारून केला. आरसीबीने २० षटकांत ६ बाद १५७ धावांची नोंद केली. आरसीबीकडून कृणाल पांड्या व सुयश शर्माने प्रत्येकी २ बळी, तर रोमारिओ शेफर्डने एक बळी टिपला.

विजयासाठी १५८ धावांचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात निराशाजनक झाली. सलामीवीर फिल सॉल्ट एक धाव काढून अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीला बळी पडला. मात्र त्यानंतर विराट कोहली व देवदत्त पडिक्कलने आपापले अर्धशतक साजरे करत दुसऱ्या गड्यासाठी १०३ धावांची भागीदारी करत संघाच्या विजयाच्या आशा पल्वीत केल्या. पडिक्कलने ३५ चेंडूंत ५ चौकार व ४ षट्कारांसह ६१ धावांची खेळी केली. पुढे विराट कोहलीने रजत पाटीदार (१२) व जितेश शर्माच्या ( नाबाद ११) साथीने १८.५ षटकांत ३ बाद १५९ धावा काढून आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. विराट कोहलीने ५४ चेंडूंत ७ चौकार व एका षट्कारसह नाबाद ७३ धावांची खेळी केली. ◂(वृत्तसंस्था)

# अर्जुनने पटकावले रौप्यपदक

### आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी

### पदकतालिकेत भारत तिसऱ्या स्थानावर

◆ **लिमा (पेरू), २० एप्रिल**

येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या पॅरिस ऑलिम्पिकपटू अर्जुन बाबुताने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत रौप्यपदक जिंकले, तर महिलांच्या नेमबाजी स्पर्धेत आर्या बोरसेने पाचवे स्थान पटकावले. आर्याची हे पहिलेच विश्वचषक होते.

गत वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिलेल्या अर्जुन बाबुताला (२५२.३) रोमांचक अंतिम फेरीत चीनच्या ऑलिम्पिक विजेत्या शेंग लिहाओ (२५२.४) कडून केवळ ०.१ गुणांनी पराभव पत्करावा लागला.

४० हून अधिक आयएसएसएफ पदके जिंकणारा अनुभवी हंगेरीचा नेमबाज इस्तवान पेनीने एकूण २२९.८ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

अंतिम फेरीत स्टार खेळाडूंचा समावेश होता, यात विद्यमान विश्वविजेता व पॅरिसचा रौप्यपदक विजेता स्वीडनचा व्हिक्टर लिंडग्रेन,



नॉर्वेचा जॉन-हर्मन हेग आणि भारताचा माजी विश्वविजेता रुद्राक्ष पाटील यांचा समावेश होता.

भारताला दुहेरी पदक मिळण्याची संधी होती, परंतु तांत्रिक उल्लंघनामुळे रुद्राक्षचा ११ वा लक्ष्य पंचांनी रद्द केला. परिणामी, भारतीय खेळाडू आठव्या स्थानावर राहिला व पहिल्या एलिमिनेशन टप्प्यातच तो बाहेर झाला. रुद्राक्षने गत आठवड्यात ब्यूनस आयर्स येथे झालेल्या विश्वचषकात सुवर्णपदक जिंकले होते.

भारताची हृदय हजारिका अंतिम फेरीत थोड्या फरकाने हुकली, ६२९.३ गुणांसह १० व्या स्थानावर राहिली.

**आर्याची उत्कृष्ट कामगिरी**

आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात १० मीटर एअर रायफल महिला स्पर्धेत आर्याने शनिवारी ६३३.९ गुणांसह उत्कृष्ट लक्ष्य साधत महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत पाचवे स्थान पटकावले.

आर्या २४-शॉटच्या अंतिम फेरीच्या १८ व्या शॉटनंतर बाहेर पडली, तिचा स्कोअर १८८.१ होता, त्यावेळी ती रौप्यपदक विजेत्या चीनच्या हान जियायू हिच्यापेक्षा केवळ ०.१ गुणाने मागे होती. तत्कालीन कनिष्ठ गट विश्वविजेती चीनची वांग झिफेई हिने सुवर्णपदक स्थान पटकावले. ◂(वृत्तसंस्था)



# सोलापूरच्या महिला उपविजेत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, २० एप्रिल-**

**१९ वर्षांखालील क्रिकेट : पुणे जिल्ह्याने हरविले**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या महिलांच्या निमंत्रित १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत सोलापूरला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

पुणे येथील गहुंजे स्टेडियम वर झालेल्या अंतिम सामन्यात त्यांना पुणे जिल्ह्याने १00 धावांनी हरविले. सोलापूरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पुण्याने प्रथम फलंदाजी करताना ५0 षटकात सर्वबाद १६६ धावा केल्या. त्यात सर्वाधिक ४६ धावा प्रांजली पिसे हिने काढल्या. तिला सृष्टी भांगे ३३ व तृष्णा नहर १४ यांनी साथ दिली. गोलंदाजी मध्ये सोलापूर संघाकडून साक्षी लामकाने हिने २९ धावांत ४ बळी टिपले. भक्ती पवार हिने ३ तर विभावरी देवकते व प्रतिक्षा नंदर्गी यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

विजयी १६७ धावांचे लक्ष्य सोलापूरला पेलवले नाही. पुण्याच्या गायत्री सुरवसेच्या (६-१४)भेदक गोलंदाजीमुळे सोलापूरचा डाव २६.४ षटकांत ६६ धावांत आटोपला. शिवांशी कपूर हिने २ तर आमनी नंदाल हिने १ गडी बाद केला गौरी पाटील (२९ धावा) वगळात सोलापूरच्या अन्य खेळाडूला दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही. पी डी सी ए संघाने हा सामना १00 धावांनी जिंकला. गायत्री ही सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

# गुजरातविरुद्ध केकेआरचा फलंदाजीवर भर

◆ **कोलकाता, २० एप्रिल**


अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी ईडन गार्डन्स स्टेडियमवर गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि गुजरात टायटन्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. केकेआरचा संघर्षरत फलंदाजी विभाग गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या गुजरात टायटन्सविरुद्ध आपला प्रभाव मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

सध्या आयपीएल गुणतालिकेत केकेआर १० गुणांसह अव्वल स्थानी, तर केकेआर सात सामन्यातील तीन विजय व सहा गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

अलिकडेच मुल्लानपूर येथे पंजाब किंग्जविरुद्धच्या गमावलेल्या सामन्यात ११२ धावांचा पाठलाग करताना केकेआरला ९५ धावांतच बाद व्हावे लागले. ही घसरण केकेआरच्या फलंदाजांमध्ये निर्माण झालेल्या एकूणच वाईट फॉर्मचे प्रतिबिंब होते. केकेआरकडे सध्या सात सामन्यांतून सहा गुण आहेत आणि प्ले-ऑफच्या



अजिंक्य रहाणे



शुभमन गिल

शर्यतीत टिकून राहण्यासाठी त्यांना उर्वरित सात सामन्यांपैकी किमान पाच सामने जिंकावे लागतील.

केकेआरचे माजी सहायक प्रशिक्षक अभिषेक नायर यांचे पुनरागमन कोलकाताच्या संघाला निश्चितच प्रोत्साहन देईल. अलिकडेच नायर यांना भारतीय संघाच्या सहायक प्रशिक्षकपदावरून काढून टाकले आहे. अभिषेक नायर यांनी उपकर्णधार वेंकटेश अय्यर आणि रमणदीप सिंग सारख्या प्रमुख फलंदाजांसोबत काम करण्यास सुरुवात केली आहे. या हंगामात केकेआरचे हे दोन कमकुवत दुवे आहे. या हंगामात संघाचा सर्वात महागडा खेळाडू २३.७५ कोटी रुपये असलेल्या व्यंकटेश अय्यरने २४.२० च्या सरासरीने केवळ १२१ धावा केल्या आहेत, तर रमणदीपने सहा डावांमध्ये केवळ २९ धावा केल्या आहेत.

आंद्रे रसेलने पाच डावांमध्ये केवळ ३४ धावा केल्या आहेत, तर रिंकू सिंगने ३८.६६ च्या सरासरीने ११६ धावा केल्या आहेत.

केवळ कर्णधार अजिंक्य रहाणे (२२१ धावा, २ अर्धशतके) आणि तरुण अंगकृष रघुवंशीने (१७० धावा) आशादायक कामगिरी केली आहे. मात्र २० वर्षीय रघुवंशीला सातत्य राखण्यास संघर्ष करावा लागला आहे.

क्विंटन डी कॉक व सुनील नरेनने काही चांगली सुरुवात केली, परंतु ते नियमितपणे कामगिरी करू शकले नाहीत. अभिषेक नायर त्यावर उपाय शोधतील अशी आशा आहे.

या सामन्यासाठी दोन खेळपट्ट्या तयार करण्यात आल्या आहेत आणि एका खेळपट्ट्यावर गवताचा अतिरिक्त थर आहे. खेळपट्टीवरील अंतिम निर्णय संघाच्या रणनीतीवर अवलंबून असेल.

**उत्तम दर्जाचा जीटी**

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्सने या हंगामात केवळ दोन वेळा पराभव पत्करला आहे. गोलंदाजीचे आक्रमण ही गुजरात टायटन्सची एक मोठी ताकद आहे. वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने सात सामन्यांत १४.३५ च्या सरासरीने १४ बळी टिपले आहेत. डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोरने ११ बळी टिपले आहेत व तो ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीवरील बदलत्या उसळीता फायदा घेऊ शकतो. या हंगामात अव्वल-१० बळी घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये मोहम्मद सिराजचाही समावेश आहे.

फलंदाजी विभागात सलामीवीर बी. साई सुदर्शन (३६५ धावा) निकोलस पूरनपेक्षा केवळ तीन धावांनी मागे आहे, तर जोस बटलर (३१५ धावा, सरासरी ६३.००) तिसऱ्या क्रमांकावर मजबूत आहे. गुजरात टायटन्सचा शेर्फन रदरफोर्ड जबरदस्त फॉर्मात आहे. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**कोलकाता नाईट रायडर्स वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



**सोलापूर : नेहरूनगर शासकीय मैदानावरील मोठ्या स्क्रीनवर आयपील फॅन पार्कला मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्ज या सामन्यास रविवारी सोलापूरकर क्रिकेटप्रेमींनी केलेली गर्दी.**

# आयपीएल पदार्पणात वैभव सूर्यवंशीचा धडाका

### पहिल्या चेंडूवर षट्कार

**नवी दिल्ली, २० एप्रिल**

शनिवारी रात्री लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यातून राजस्थान रॉयल्सच्या १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने शानदार पदार्पण केले. सूर्यवंशीने आयपीएलमध्ये आपल्या पहिल्याच चेंडूवर शार्दुल ठाकूरला षट्कार मारून जगाला आपल्या प्रतिभेची दखल घेण्यास भाग पाडले.



हा चमत्कार काही एका रात्रीत घडला नाही. विजेता घडवण्यासाठी एका गावाची आवश्यकता असते अशी एक जुनी म्हण आहे आणि १४ वर्षांचा वैभव सूर्यवंशी त्या म्हणीशी अगदी जुळतो. वैभवही अशा अनेक लोकांच्या सहकार्यातून घडला आहे. १० वर्षांच्या वयापासून ते १५० किमी थ्रोडाऊन खेळण्यापर्यंत दररोज ६०० चेंडूंचा सामना करणे अशी मेहनत घेत वैभव सूर्यवंशी घडला. वैभवच्या क्रिकेट स्वप्नांना चालना देण्यासाठी शेतजमीन विकली. पाटना येथील क्रिकेट प्रशिक्षक मनीष ओझा यांनी या विशेष प्रतिभेची ओळख पटवली आणि त्या वेळी १० वर्षांच्या वैभवला दिवसाला किमान ६०० चेंडूंचा सामना करावा लागला, जेणेकरून तो संधी दार ठोठावताना मोठ्या आव्हानासाठी सज्ज होईल याची खात्री केली.

त्यानंतर बिहार क्रिकेट संघटनेने आपल्या मुलाला पाठिंबा दिला आणि किशोरवयीन वैभवला रणजी करंडकात खेळवले. थिलक नायडू यांच्या अध्यक्षतेखाली १९ वर्षांखालील राष्ट्रीय निवड समितीने त्याची कोल्ट्स टेस्ट क्रिकेटमध्ये निवड केली आणि शेवटी राजस्थान रॉयल्समधील राहुल द्रविड व झुबिन भरुचा यांच्यासारख्या खेळाडूंनी आयपीएल सुरू होण्यापूर्वी १५० पेक्षा जास्त क्लिकवर साइड-आर्म थ्रोडाउनचा सामना करून न कापलेल्या हिऱ्याला चमकवण्यात आपले योगदान दिले. जेव्हा सरासरी १४ वर्षांचे खेळाडू ५ खेळण्यात आणि होमवर्क करण्यात व्यस्त असतात, तेव्हा बिहारच्या समस्तीपूरमधील किशोरवयीन खेळाडूने शार्दुल ठाकूरसारख्या अनुभवी कसोटी खेळाडूला सवाई मानसिंग स्टेडियम स्टॅण्डवर चेंडू हाणला आणि हजारोंना आश्चर्यचकित केले.

आयपीएल विश्वात २० चेंडूत ३४ धावा करणे ही एक सामान्य गोष्ट आहे, पण किशोरावस्थेत वैभव सूर्यवंशीने केलेलीखेळी कौतुकास्पद आहे. राजस्थान रॉयल्सने त्याला १.१० कोटी रुपयांत खरेदी केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# वीर, अनाहत विश्व स्क्वॅश स्पर्धेसाठी पात्र

◆ **क्वालालम्पूर, २० एप्रिल**

रविवारी मलेशियातील क्वालालम्पूर येथे झालेल्या जागतिक स्क्वॅश आशियाई पात्रता स्पर्धेत विजय नोंदवून भारताच्या वीर चोत्राणी आणि अनाहत सिंगने पुढील महिन्यात होणाऱ्या जागतिक स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

आगामी ९ ते १७ मे दरम्यान शिकागो येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष एकेरीत रमित टंडन, अभय सिंग व वेलावन सेंथिलकुमार यांच्यासोबत वीर चोत्राणी सहभागी होत असताना महिला एकेरीत अनाहत एकमेव भारतीय असेल. १७ वर्षीय अनाहतने चीनमधील हाँगकाँगच्या सातव्या मानांकित टोबी त्सेचा ३-१ (११-४, ९-११, ११-२, ११-८) असा पराभव करून आपला पहिलाच



जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग निश्चित केला.

पुरुषांच्या अंतिम फेरीत २६ मिनिटांत तिसऱ्या मानांकित आणि स्थानिक आवडत्या अमिशेनराज चंद्रनवर ३-० (११-३, ११-४, ११-८) विजय मिळवल्यानंतर २३ वर्षीय द्वितीय मानांकित वीर चोत्राणी सुद्धा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदार्पण करणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# ऊस उत्पादकांनी कृत्रिम बुध्दीमत्ता पध्दत वापरावी

## सहकार शिरोमणी कारखान्यात ऊस विकास कार्यक्रमात तज्ञांनी मांडले मत

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२० एप्रिल -

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ऊस पीक जोमात घेऊन मोठा नफा मिळवता येतो. तर कारखान्याच्या साखर उताऱ्यातही फरक पडतो. त्यामुळे कृत्रिम बुध्दीमत्तेचा (एआय) ऊस पीकांसाठी वापर करणे सध्या काळाची गरज असल्याचे बारामती कृषी विज्ञान केंद्राचे तज्ञ संतोष करंजे यांनी सांगितले.

येथील सहकार शिरोमणी सहकारी साखर कारखान्यात झालेल्या ऊस विकास कार्यक्रमात ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार शंभर दिवसीय कार्यालयीन विशेष मोहिमेअंतर्गत चेअरमन कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. ऊस विकास कार्यक्रम अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




उदघाटन सतिश माने विभागीय कृषी विद्यावेता (आय.सी.एल.) पुणे, प्रा.ज्ञानसागर सुतार, संतोष करंजे कृषितज्ञ, कृषि विज्ञान केंद्र बारामती व कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांचे हस्ते करण्यात आले.

यापसंगी कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक पी.डी.घोगरे यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणात कारखान्याचे ऊस उत्पादक शेतकरी यांना कारखान्याचे वतीने ऊस बेणे, सुधारीत रोपे,जैविक व सुक्ष्म अन्नद्रवे, कंपोस्ट खते वाटप करण्यात येते. तसेच शेतकरी प्रशिक्षण योजना, सभासदांकरीता अपघात विमा योजना इ. विविध योजना राबविल्या जातात. त्यांनी कारखाना चाचणी हंगाम १९९८-१९९९ रोजी झाला पुर्वी २५०० टि.सी.डी.चा कारखाना ३५०० टि.सी.डी. ने सुरु आहे. ३० केल.पी.डी. आसवणी प्रकल्प व १८ मे.को-जन कार्यरत आहेत. यावर्षी कारखाना पुर्ण क्षमतेने चालवू असे सांगितले.

ज्ञानसागर सुतार यांनी ऊस पीक जोपासना व वाढ यावर आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, जर ऊसाची उत्पादन क्षमता वाढवायची असेल तर प्रथम माती परिक्षण करुन घेणे, पाण्याचा पी.एच.चेक करणे व त्याप्रमाणे खते वापर केल्यास १०० टक्के ऊस उत्पादक क्षमता वाढेल. त्याच बरोबर सतिष माने यांनी ऊस पीक, अन्न द्रव व्यवस्थापन व किड नियंत्रण यावर माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी आधुनिक तंत्रज्ञान युगात प्रत्येकाने कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचे शेती विषयक ऍप मोबाईल मध्ये डाऊनलोड करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना औषधे, खते, विद्राव्ये खते, पिकांवरील रोग व त्यावरील उपाय लगेच मोबाईल पवर मिळू शकेल. यापुढे त्यांनी युवा शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आर्टिफिशयल इंटेलिजन्सचा वापर करावा तसेच कार्यक्षेत्रातील सभासदांनी (ख) तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये वापर केल्यास कारखान्याचे वतीने त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले जाईल तसेच भागातील सभासदांनी ग्रुप केल्यास त्यांना कृषी विज्ञान केंद्र बारामती येथे अभ्यास दौरा करण्यात येईल असे काळे यांनी सांगितले.

यापसंगी कारखान्याचे व्हा.चेअरमन भारत कोळेकर, संचालक सर्वश्री म हेन नागटिळक, युवराज दगडे, जयसिंह देशमुख, अमोल माने, अरुण नलवडे, शंकरमहाराज चव्हाण, भारत आंबुले, विक्रम बागल, ज्योतीराम पोरे, संतोष भोसले, कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन मारुती भोसले, माजी संचालक, राजाराम माने, इब्राहिम मुजावर, मा.पंचायत समिती सदस्य सुरेश देठे, यशवंतराव चव्हाण पतसंस्थेचे चेअरमन शहाजी साळुंखे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाअध्यक्ष अनिल नागटिळक, नारायण शिंदे, ऊस बागायतदार अर्जुन जाधव, महादेव सुर्यवंशी, कारखान्याचे खाते प्रमुख,कृषि ग्रीओव्हरशिअर, भागातील ऊस उत्पादक शेतकरी मोठया संख्येनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आर.एस.पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रगतशिल बागायतदार सुरेश देठे यांनी मानले.

## महत्वाचे...




### महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशनच्या स्थापना दिनानिमित्त रक्तदान शिबीर

बार्शी, दि. २० एप्रिल-
ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन या बँकिंग क्षेत्रातील बलाढ्य संघटनेचा ८० वा स्थापना दिवस आहे. या दिवशी देशभरामध्ये विविध उपक्रम राबवून संघटनेचा स्थापना दिन साजरा केला जातो. महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशनच्यावतीने राज्यभरामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे ठिकठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून बँक कर्मचारी समन्वय समिती बार्शीच्यावतीने रामभाई शहा रक्तपेढी, जवाहर हॉस्पिटल बार्शी येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. जवळपास १५ लोकांनी या ठिकाणी रक्तदान केले. यात बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे करमाळा, निमगाव, टेंभुर्णी, श्रीपूर, बार्शी या शाखांतील कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. या ठिकाणी समितीचे अध्यक्ष कॉ. राहुल मांजरे समन्वयक कॉ. सरिता कुलकर्णी उपस्थित होते.

### मंगळवेढयाच्या ग्रामीण भागातून अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविले

मंगळवेढा, दि.२० एप्रिल-
मंगळवेढयाच्या ग्रामीण भागातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञात कारणावरून फुस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून तिच्या वडीलाच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ एप्रिल रोजी पहाटेच्या दरम्यान राहते घरातून फिर्यादीच्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून फूस लावून पळवून नेले असल्याचे वडीलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. तीचे वर्णन पुढील प्रमाणे- रंगाने गोरी, अंगाने सडपातळ, उंची ५ फुट, अंगात नेसणेस जांभळया रंगाचा टॉप व काळया रंगाची पँट, शिक्षण दहावी, कानात रिंगा, भाषा मराठी, हिंदी, कन्नड. अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास तपासिक अंमलदार पोलिस हवालदार मनोज खंडागळे (मोबा.९८८१०४५२९५) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### श्री गणेश मंदिरात चंदन उटीचा कार्यक्रम संपन्न

मंगळवेढा, दि.२० एप्रिल-
येथील बाजार चौकातील श्री गणेश मंदिरामध्ये चैत्र महिन्यातील चंदन उटीचा कार्यक्रम भक्तीमय व मंगलमय वातावरणात पार पडला. उन्हाळ्यात मुर्तीस थंडावा मिळावा म्हणून चंदनाची उटी लावली जाते. चंदन उगाळून त्याचे घट्ट केलेले गंध श्री गणेश मुर्तीस लावतात. यालाच चंदन उटी असे म्हणतात. श्री गणेश मंदिरामध्ये श्री गणेश जयंती, कार्तिक महिन्यामध्ये दीपोत्सव, चंदन उटी, गणेशोत्सव काळात दहा दिवस विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. परिसरातील भाविक नवसाला पावणाऱ्या या श्री गणेशाचे दर्शन घेवूनच आपल्या दिवसाची सुरवात करतात. सायंकाळी पुरोहित सुधीर जोशी यांच्या हस्ते श्री गणेशाच्या मुर्तीस उटी लावण्यात आली. यावेळी मनिषा महालकरी यांच्या काशीविश्वेश्वर महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम पार पडला. थंड कैरीचे पन्हे व अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समिती अध्यक्ष अमोल माने, उपाध्यक्ष भालचंद्र देशमुख,रवी खांडेकर,शिवदास गोरे, रामानुज मर्दा, बाबुराव राजमाने, सदाशिव जामदार, सागर मेरू, आण्णा राऊत,दादा टाकणे, संतोष राऊत,दत्तात्रय शिर्के,सतीश शिर्के,सौरभ शिर्के,नारायण बजाज आदी गणेश परिवारातील सदस्यांनी परिश्रम घेतले.

### अक्कलकोट तालुक्यात उद्या सरपंच आरक्षण सोडत

अक्कलकोट दि २० एप्रिल
तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत २२ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता नविन तहसिल कार्यालयात होणार असल्याची माहिती तहसीलदार विनायक मगर यांनी दिली. अक्कलकोट तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, आमदार माजी आमदार, माजी सभापती, उपसभापती, माजी जिप सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आदिंनी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसिलदार मगर यांनी केले.

# पंढरपूरच्या 'सिंहगड'मध्ये माहिती तंत्रज्ञानावर वेबिनार

## दक्षिण आफ्रिकेतील तज्ञ डॉ. पिसे यांनी केले मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२० एप्रिल-
कोर्टी (ता. पंढरपूर) येथील सिंहगड अभियांत्रिकी म हाविद्यालयात माहिती तंत्रज्ञानातील नविन प्रवाह व डेटा सायन्स आणि क्लाऊड कंप्युटिंगचे भविष्य या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनारद्वारे डॉ. अनिल पिसे यांनी मार्गदर्शन केले.

संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रम ासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गच्या क्युम्युलस सोल्युशन्सचे वरिष्ठ



सल्लागार डॉ. अनिल पिसे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. पिसे यांचे स्वागत केले. संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुभाष पिंगळे यांनी प्रस्तावना केली. डॉ. पिसे यांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), यंत्र शिक्षण, डेटा सायन्स व क्लाऊड कंप्युटिंग यामधील अद्ययावत ट्रेंड्स, भविष्यातील संधी, आणि त्यांचा उद्योगजगतातील उपयोग यावर मार्गदर्शन केले. स्केलेबिलिटी, सुरक्षा, बिग डेटा प्रोसेसिंग यासारख्या संकल्पनांवर त्यांनी मार्मिक उदाहरणांसह प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग घेत आपले संदेह स्पष्ट केले. या वेबिनारमध्ये महाविद्यालयातील तिसऱ्या वर्षाचे १२० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी प्राचार्य डॉ. करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, अधिष्ठाता डॉ. संपत देशमुख यांनीही मार्गदर्शन केले. प्रा. एस. जी. लिंगे यांनी संयोजन

# वटवृक्ष मंदिरात सत्कार हा जीवनातील मोठा गौरव : क्रिकेटपटू केदार जाधव

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट, दि.२० एप्रिल-
सर्वसामान्य स्वामी भक्तांप्रम ाणे मीही स्वामी भक्त आहे. याच स्वामी भक्तीच्या माध्यम ातून अक्कलकोटला आल्यानंतर समर्थांनी स्वामी दर्शनाची संधी वेळोवेळी देत रहावी. या माध्यम ातून स्वामी कृपेचे वरदहस्त माझ्या व माझ्या कुटुंबीयांवर कायम रहावी याकरिता आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटूंब भेट देऊन स्वामी सम र्थांचे दर्शन घेतले आहे. स्वाम ींच्या दर्शनानंतर लाभलेला तथा येथील श्री वटवृक्ष स्वामी म हाराज मंदिरातील विश्वस्त समि तीच्या वतीने झालेला सत्कार म्हणजे जीवनातील मोठा गौरव असल्याचे मनोगत मा.प्रसिध्द क्रिकेटपटू केदार जाधव



यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी म हाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी बोलताना क्रिकेटपटू केदार जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मंदिर समि तीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, रवी मलवे, श्रीकांत मलवे, उद्योगपती प्रमोद साठे, केदार माळशेट्टी, अभिषेक लोकपुरे, भागानगरे, कापसे, प्रसाद सोनार उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलांमुलीसाठी समाज माध्यमाच्या वापरावर निर्बंध येणार

## डॉ. रेखा चौधरी यांनी सुप्रिम कोर्टात दाखल केली होती याचीका

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२० एप्रिल -
वर्ल्ड डिजीटल डिटॉक्स डे आणि झेप फाऊंडेशन यांच्या माध्यमातून डॉ. रेखा चौधरी यांनी सुप्रिम कोर्टात याचिका दाखल करुन अल्पवयीन मुलांमुलीसाठी समाज माध्यमाच्या वापरावर निर्बंध ह्या विषयाला वाचा फोडली. त्यांच्या या प्रयत्नाला यश आले असून मा. सुप्रिम कोर्टाने केंद्र सरकारला तसे निर्देश दिले आहेत. आठ आठवडयाच्या कालावधीत सरकारने योग्य ती कार्यवाही करुन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अल्पवयीन मुलांमुलीना मोबाईल आणि समाज माध्यमाचा वापरावर निर्बंध आणण्यासाठी वय ठरविणारी प्रणाली निश्चित करावी असे आवाहन केले आहे.

वर्ल्ड डिजीटल डिटॉक्स डे आणि झेप फाऊंडेशन यांच्या माध्यमातून लहान मुलांच्या म ोबाईल वापरावर निर्बंध यावेत यासाठी डॉ. रेखा चौधरी, डॉ. वैशाली चव्हाण आणि टिमच्या माध्यमातून सातत्याने लढा चालू ठेवला आहे. विविध कार्यशाळा आणि परिषदेतून मोबाईल



आणि समाज माध्यमाच्या वापरावर खास करून लहान मुलांमुलीना निर्बंध आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले जात होते. या अनुषंगाने एस.के.एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये रॅली, निंबध स्पर्धा, सम ाजातील विविध स्तरावर विविध उपक्रम घेतले होते. डिजिटल डिटॉक्स ही अलीकडच्या काळात उदयास आलेली संकल्पना आहे. मोबाईल, कम्प्युटर, आयपॅड यासारख्या गॅजेट्सच्या अति वापराच्या सवयीमुळे माणसाचा आसपासच्या जगाशी तुटलेला संपर्क, त्यामुळे निर्माण होणारे मानसिक असंतुलन अशा अनेक कारणांमुळे डिजिटल डिटॉक्स या संकल्पनेची गरज भासू लागली. मोबाईल आणि समाज माध्यमांचा अतिवापरामुळे लहान मुलांच्याच नव्हे तर मोठया मुलांचेही नुकसान होत आहे. त्यांच्या शारीरीक हलचाली, मनावर, बौध्दीक विकासावर अंत्यत वाईट परिणाम होताना दिसत आहे. त्यामुळे या डिजिटल डिटॉक्स संकल्पनेमुळे मुलांमध्ये सकारात्मकता येईल या दृष्टीने सिंहगड म हाविद्यालयामध्ये सातत्याने डिजिटल डिटॉक्स डे सारखे उपक्रम वारंवार होत असतात. डॉ. रेखा चौधरी, डॉ. वैशाली चव्हाण आणि टिम यांच्या या प्रयत्नांला मिळालेल्या यशाबद्दल एस. के. एन. सिंहगड महाविद्यालय, पंढरपूरचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, डॉ. संपत देशमुख, डॉ. दिपक गानमोटे यांनी अभिनंदन केले.

# राज्य परिवहन महामंडळातर्फे जिल्ह्यात 'प्रवासी राजा दिन' उपक्रमाचे नियोजन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२० एप्रिल -
राज्य परिवहन महामंडळातर्फे सोलापूर जिल्ह्यात प्रवासी राजा दिन या उपक्रमाचे नियोजन केले असल्याची माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना मिळणाऱ्या सेवा, सुविधांम धील अडचणी, समस्या, तक्रारी व सुचना ऐकून घेऊन जिल्हास्तरावरील अधिकारी व आगार प्रमुखांनी उपस्थित राहून तक्रारींचे निराकरण करावे व सेवेतील त्रुटी तातडीने दूर कराव्यात असे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात प्रत्येक आगारात एका बुधवारी प्रवासी राजा या उपक्रम ाचे नियोजन केलेले आहे. यावेळी जिल्हास्तरावरील एसटीचे अधिकारी व संबंधित आगार प्रमुख उपस्थित राहून अडचणींचे निराकरण करणार आहेत. तरी प्रवाशांनी, प्रवासी ग्राहक संघटनांनी आगारानिहाय बुधवारी दु.११ ते १ या वेळेत संबंधित आगार प्रमुख कार्यालयाम ध्ये उपस्थित राहावे असे आवाहन म हाम ंड ळाचे सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांत



कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रम ुख माधुरी परदेशी, सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी केले आहे.

### सोलापूर जिल्ह्यातील प्रवासी राजा दिन

प्रत्येक आगारनिहाय -बुधवार २३ एप्रिल पंढरपूर, ७ मे बार्शी, १४ मे अक्कलकोट, २१ मे करमाळा, २८ मे अकलूज, ४ जून सांगोला, ११ जून कुर्डुवाडी व १८ जून मंगळवेढा.


## निधन वृत्त...

### मधुकर बडवे



बार्शी दि. २० एप्रिल-
श्री भगवंताचे पुजारी मधुकर मनोहर बडवे यांचे रविवार दि. २० एप्रिल रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९८ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन विवाहित मुली, जावई, सुना, नातवंडे, नात सुना, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता

### सुरेश मोरे



मंगळवेढा दि.२० एप्रिल-
दामाजी गृह निर्माण संस्था शासकीय गोडावून पाठीमागील सुरेश हरी मोरेगुरुजी यांचे रविवार दि. २० एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दयानंद कॉलेज सोलापूरचे प्रा. सुहास मोरे यांचे ते वडील होत.

### शांताबाई पाटील



मंगळवेढा, दि.२० एप्रिल-
ब्रह्मपुरी (ता. मंगळवेढा ) येथील शांताबाई दादासाहेब पाटील( वय ९०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या पश्चात दोन नातवंडे, सुना असा परिवार आहे. दामाजी कारखान्याचे माजी संचालक के. धनंजय पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

# मानवाचे श्वसन यंत्र ही एक दैवी शक्तीच

## स्वामी चरणाश्रीतजी गिरी महाराज

## स्वामी समर्थ पुण्यतिथी धर्मसंकीर्तन महोत्सवात प्रवचन

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. २० एप्रिल-
देश विदेशात स्वरयोग विद्याशास्त्र आत्मसात केला जात आहे. मृत्युचा काळ वेळही बदलता येण्याची शक्ती स्वरयोग शास्त्रात आहे. अनेक भारतीयांनी श्वासाचे शास्त्र जपून जीवनाचा उद्धार करून घेतला आहे. परंतु आता कलियुगात या शास्त्राचे महत्व, माहिती व ज्ञान फार कमी लोकांना आहे. विदेशातील लोकांची या स्वरयोग शास्त्र संदर्भात अभ्यास



करण्याची सकारात्मक मानसिकता आहे. मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंडपणे काम करणारे श्वसन यंत्र ही एक दैवी शक्तीच असल्याचे प्रतिपादन हरिद्वारच्या पंचदशनाम जुना आखाड्याचे महामंडलेश्वर स्वामी चरणाश्रीतजी गिरी महाराज यांनी येथे केले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या स्वामी समर्थ १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त धर्मसंकीर्तन महोत्सवातील सातवे पुष्प गुंफताना गिरी महाराज बोलत होते. स्वरयोगी मानवी श्वासाचे रहस्यमयी विज्ञान हा त्यांच्या प्रवचनाचा विषय होता. मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी गिरी महाराज यांना स्वामी समर्थांचे दर्शन घडवून श्री स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी महेश इंगळे मि त्रपरिवारच्या वतीनेही प्रयागराज येथील म हाकुंभमेळ्यास उपस्थित सदस्यांच्या वतीने फळे देऊन स्वामी चरणाश्रीतजी गिरी महाराज यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महाराजांनी अनेक प्रात्यक्षिकांसह सर्वोत्तम स्पष्टीकरण करून उदाहरण दिले जे उपस्थित भाविकांना मनोभावे भावले. मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशम ुख, मंदार महाराज पुजारी, निंगुताई हिंडोळे, ओंकार पाठक, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, स्वामीनाथ लोणारी, प्रकाश कासेगावकर, सागर गोंडाळ, शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, सुनील पवार, संतोष पराणे, श्रीकांत झिपरे, ज्ञानेश्वर भोसले, मनोज इंगळे, संजय पवार, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे, डॉ. मल्लिनाथ बोधले, बंडोपंत घाडगे, डॉ.तृप्ती तानवडे, शकुंतला तानवडे, श्री डिग्गे, मोहन जाधव, श्रीकांत मलवे, आदित्य गवंडी, प्रसाद पाटील सह आदींसह भाविक भक्तांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

दरम्यान चरणाश्रीतजी गिरी महाराज यांनी श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित कै कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयास भेट दिली. यंदाच्या प्रयागराज येथील महाकुंभमेळाव्यात २ कोटी भाविकांच्या उपस्थितीत स्वामी चरणाश्रीत गिरी महाराजांच्या दिव्य सान्निध्यात वसंत पंचमीच्या मुहुर्तावर गंगा-यमुना-सरस्वती नद्यांच्या त्रिवेणी संगमात शाही स्नान करता आल्याने आमचे जीवन सार्थक झाल्याचे महेश इंगळे यांनी सांगितले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीतील देखाव्याची क्षणचित्रे...


सम्राट अशोक चौक जयंती उत्सव मंडळ कंपनीचा देखावा


बुद्धभूमी सामाजिक संस्थेचा देखावा


आम्रपाली सामाजिक संस्थेचा देखावा


महाबोधिसत्व लेझीम संघाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्ध धर्म स्वीकारतानाचा देखावा


कर्मचारी सामाजिक संस्थेचा देखावा


महापालिकेच्या वतीने काढलेल्या मिरवणुकीप्रसंगी डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मंडळाचे पूजन करताना मान्यवर.



रमाजंली तरुण मंडळाचा देखावा


प्रशिक सामाजिक संस्थेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्र रेखाटन करतानाचा देखावा



छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठानचा देखावा

# हिंदूंच्या संयमाचा अंत पाहू नका

## सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता अश्विन उपाध्याय; विकास बँकेच्यावतीने व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

भारत देश हा संविधानावर चालतो. आणि संविधानाची रक्षा ही केवळ हिंदूमुळे झालेली आहे. जेथे हिंदूंची संख्या जास्त तेथे अशांती कमी, मात्र जेथे हिंदूंची संख्या कमी तेथे अशांती जास्त. त्यामुळे हिंदूंच्या संयमांचा अंत पाहू नका. संविधान केवळ हिंदूमुळे जिवंत आहे. हिंदू जनसंख्याशिवाय संविधान वाचले नसते, त्यामुळे हिंदूंच्या संयमांचा अंत पाहू नका असे, खडे बोल सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विधीज्ञ अश्विन उपाध्याय यांनी भारतीय न्यायव्यवस्थेला सुनावले आहेत.

विकास सहकारी बँकेच्या जाहीर व्याख्यानात ते 'महान भारत' या विषयावर बोलत होते. या व्याख्यानाचे उद्घाटन भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर बँकेचे चेअरमन कमल किशोर राठी, माजी चेअरमन राजगोपाल मणियार, यावेळी माजी आमदार नरसिंग मेंगजी, भाजप नेते शहाजी पवार, चन्नवीर चिट्टे आदी उपस्थित होते.

उपाध्याय पुढे म्हणाले, हिंदू धर्म हा प्राचीन धर्म आहे. धर्म जोडतो तोडत नाही. दानधर्म हा सनातन वैदिक हिंदू धर्मांमधून आलेला आहे. त्यानंतर वक्फ आणि चॅरिटी हे शब्द रुजू झाले आहेत. वास्तविक पाहता हिंदू धर्मामध्ये दानधर्माला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. हिंदू समाज या दानाचा कोणताही दुरुपयोग करत नाही. दानाचे फळ घेण्याचा अधिकार देखील हिंदूंना नाही.





### वक्फ बोर्ड दुरुस्त विधेयक का आवश्यक

स्वातंत्र्यपूर्व काळात जीना यांनी १९१३ रोजी वक्फ बोर्ड कायदा अस्तित्वात आणला. तेव्हा संविधान अस्तित्वात नव्हते. त्यावेळेस या वक्फ बोर्डाकडे सुमारे ५० हजार एकर प्रॉपर्टी होती. आता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून ७५ वर्षात बोर्डाकडे सुमारे ४० लाख एकर प्रॉपर्टी जमा झालेली आहे. सदरची प्रॉपर्टी ही कशा पद्धतीने जमा करण्यात आली आहे. याबाबत कोणतेच कागदपत्र अस्तित्वात नाहीत. मुघलांच्या काळात हिंदूंची मंदिरे तोडण्यात आली. त्यांची जमीनी बळकावण्यात आली. जबरदस्तीने त्यांचे धर्मांतर करण्यात आले. जजिया कर लादण्यात आला. जो कर देण्यात समर्थ राहिला तो हिंदू म्हणून टिकला. परंतु जे ज्या कर देऊ शकले नाहीत त्यांना नाईलाजाने धर्मांतर करावे लागले. आपल्या सर्व वस्तू जमिनी वक्फ ( दान) करावे लागल्या. जेथे ९९ टक्के हिंदू आहेत तेथे शांती आहे. परंतु ज्या ठिकाणी हिंदूंची संख्या कमी आहे तेथे धर्मांतर वाढत गेले आहे. त्यामुळेच वर्षानुवर्ष आणि दिवसेंदिवस बोर्डाची ही प्रॉपर्टी कशा पद्धतीने वाढत आहे. याची चौकशी होणे आवश्यक आहे. यासाठीच वक्फ बोर्ड दुरुस्त विधेयक आवश्यक आहे. परंतु न्यायालयामध्ये आपलेच हिंदू बोर्डाच्या बाजूने केस लढवत आहेत. ही दुर्दैवाची बाब आहे. विशेषतः त्यांच्याकडे वकिली करण्याचे कोणतेही अधिकार नसताना देखील खासदार आमदार पद भूषवलेले लोक वकिली करत आहेत एवढी नामुष्की आलेली आहे, ही वस्तुस्थिती देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली आहे.

मात्र दुसरीकडे दानाच्या माध्यमातून करोडोंची माया आणि जमिनी बळकावली जात आहे. वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकावरून अधिवक्ता उपाध्याय यांनी न्यायव्यवस्थेला तसेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना आरसा दाखवला आहे. हिंदूंच्या अधिकारांमध्ये प्रत्येक वेळेस कागद दाखवा, असे म्हटले जाते. परंतु मुस्लिमांच्या केसेसमध्ये कोणताही कागद दाखवा, असे म्हटले जात नाही. दुजाभाव आणि भेदभाव न्यायालयातच सुरू होत आहे. त्यामुळे हिंदूवर बिकट परिस्थिती ओढावत आहे. मात्र, आता आम्ही गप्प बसणार नाही. हा त्यांचा मनमानी कारभार खपवून घेतला जाणार नाही. असा गर्भ गळीत इशारा उपाध्याय यांनी या व्याख्यानाच्या माध्यमातून विरोधकांना दिला आहे.

आपल्या पूर्वजांमुळे धर्मांतर थांबलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी पाहिलेले स्वप्न यापुढे आम्ही साकारणार आहोत. या पुण्यकार्यामध्ये तुम्हा सर्वांची साथ आवश्यक आहे. हिंदू धर्मातील जागरूकता सर्वांनी वाढवली पाहिजे.

### जन्मदर नियंत्रण कायदा अस्तित्वात आणला पाहिजे

देशाची वाढती लोकसंख्या हा महत्त्वाचा मुद्दा आहे. लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे भेसळ आणि खाबोगिरी वाढलेली आहे. या सर्वांना आळा घालण्यासाठी जन्मदर नियंत्रण कायदा अस्तित्वात आणला पाहिजे. भारत आणि चीन या देशांनी एकाच कालखंडात स्वातंत्र्य भोगण्यास सुरू केले. आज चीनची लोकसंख्या नियंत्रणात आलेली आहे. मात्र भारत देशाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. लोकसंख्या नियंत्रणात आल्यास देशाचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात होणार आहे त्यामुळे सरकारने लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी नवीन कायदा करण्याची आवश्यकता आहे असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

जोपर्यंत हिंदू गप्प आहे, तोपर्यंत अन्याय होत राहणार आहे. यापुढे कोणताही अन्याय सहन करणार नाही. यासाठी सर्वांनी सज्ज व्हा, असे आवाहन देखील यावेळी त्यांनी केले.

आराध्य दैवत श्रीरामचंद्रांची जन्मभूमी अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्राचे मंदिर साकारले आहे. आता मथुरेमध्ये श्रीकृष्ण भगवानचे भव्यदिव्य मंदिर साकारण्याचे स्वप्न उराशी बाळगले आहे. ते ही लवकरच साकार करू, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.


सोलापूर : जी. एम. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या देखाव्याच्या उदघाटप्रसंगी मान्यवर.



सोलापूर : कबीर सोशल संस्थेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारितेचा देखावा सादर केला.

## श्री बृहन्मठ होटगी मठाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

मंगळवार २२ एप्रिल ते शुक्रवार २ मे पर्यंत ज्ञान सिंहासनाधीश्वर श्री.श्री.श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींच्या दिव्य सानिध्यात श्री जगद्गुरु दारूकाचार्य व एकोरामाराध्य जयंती, श्री वीरतपस्वी मंदिर सुवर्ण कळसारोहण,देव देवतांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना, लिं.श्री चन्नबसव शिवाचार्य स्वामीजी पुण्यतिथी, अय्याचार व दीक्षाविधी इत्यादी कार्यक्रम आयोजित केला आहे.



मंगळवार २२ एप्रिल ते शुक्रवार २ मे पर्यंत श्री. दानम्मा देवी पुराण, निरूपणकार श्री.शंभुलिंग शास्त्रीजी गोब्बूर व सोमवार २८ एप्रिल ते शुक्रवार दिनांक २ मेपर्यंत श्री.श्री.श्री.१००८ जगदाचार्य मूर्तीस व गुरु गादीस रुद्राभिषेक करण्यात येईल.

बुधवार ३० एप्रिल रोजी जगद्गुरु एकोरामाराध्य जयंती उत्सव व पहाटे ६:०० वाजता श्री.श्री. श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींच्या अमृत हस्ते श्री. गणपती, देवी, नवग्रह, महामृत्युंजय, नंदी देवता प्राणप्रतिष्ठापना व शिवाचार्यांच्या उपस्थितीत अय्याचार व दीक्षाविधी कार्यक्रम. तदनंतर श्री. वीरतपस्वी मंदिर सुवर्ण कळसारोहण वेदमूर्ती परमेश्वर शास्त्री हिरेमठ व वेदमूर्ती सिद्धया हल्लाळी शास्त्री यांच्या वैदिकत्त्वाखाली कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी ज्या माहेश्वर बटूंना, वीरशैव बांधवांना अय्याचार व दीक्षा करून घ्यावयाचे आहे, त्यांनी मौजे होटगी येथील मठामध्ये नावे नोंदवावीत. गुरुवार १ मे रोजी सायंकाळी लिंबीचिंचोळी येथील श्री.जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर नंदीध्वज व त्यांचे मानकरी समवेत भक्तगणांचे होटगी ग्रामस्थांच्या वतीने हार्दिक स्वागत व नंदीध्वजाचे सवाद्य मिरवणूक. शुक्रवार दिनांक २ मे रोजी श्री.श्री.श्री १००८ जगद्गुरु दारूकाचार्य जयंती श्री चंन्नबसव शिवाचार्य पुण्यतिथी यात्रा महोत्सव निमित्त सकाळी ८:०० वाजता श्री.श्री.श्री १००८ जगद्गुरु दारुकाचार्य मूर्तीची मिरवणूक महामंगलारती तदनंतर महाप्रसाद.तरी सर्व सदभक्तानीं वरील सर्वच कार्यक्रमास उपस्थित राहून गुरुकृपाशीर्वादास पात्र व्हावे. असे आवाहन श्री. बृहन्मठ होटगी मठाच्या वतीने करण्यात येत आहे.

## शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास प्रति महिना आठ टक्के परतावा देतो असे अमिष दाखवून फिर्यादी रोहित सतीश खारवे (वय-३२,रा. गुरुकृपा अपार्टमेंट,उत्तर कसबा शिवाजी चौक, सोलापूर) यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून रक्कम घेऊन त्या बदल्यात डिसेंबर २०२३ पर्यंत परतावा म्हणून सहा लाख रुपये दिले.त्यानंतर आजतागायापर्यंत यासीन दाऊद बागवान (रा.आडम प्लॉट,श्रमजीवी नगर) याने दिलेल्या पैशाच्या ठरल्याप्रमाणे परतावा किंवा रक्कम परत न करता फसवणूक केली आहे.याप्रकरणी रोहित खारवे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून यासीन बागवान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना जानेवारी २०२४ ते १९ एप्रिल २०२५ रोजी दरम्यान घडली.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करीत आहेत.



## दक्षिण सोलापूर तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण सोडत उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी एकुण ८३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी २२ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता श्री. छत्रपती रंगभवन सभागृहात सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

या आरक्षण सोडत कार्यक्रमासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील इच्छुक सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन दक्षिण सोलापूरचे तहसिलदार किरण जमदाडे यांनी केले आहे.

# प्रत्येक शहराच्या निर्मितीमध्ये मुळतः एक वारसा : डॉ. सुरज पंडित

## जागतिक वारसा दिनानिमित्त कै. आनंद कुंभार स्मृती व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

जेव्हा गावांपासून शहर निर्माण झाली, त्यावेळेला प्रत्येक शहर निर्मित होत असताना त्यामध्ये मुळतः एक वारसा असतो. काळाच्या अनेक स्थित्यंतरानंतर, अनेक घटनांच्या माध्यमातून त्या शहरांमध्ये वारसा निर्माण होत असतो. स्थलांतरित घटक, नैसर्गिक घटना, सामाजिक स्थित्यंतरे अशा अनेकांच्या माध्यमातून वारसा निर्माण होऊन ती शहराची प्रतिमा निर्माण करत असतात, असे विचार थोर इतिहास संशोधक डॉ. सुरज पंडित यांनी कै. आनंद कुंभार स्मृती व्याख्यान सत्र मध्ये नागरी वारसा व पुरातत्त्व या विषयावरचे व्याख्यान प्रसंगी केले.

इंट्याक सोलापूर व श्री हि.ने. वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वारसा दिनानिमित्त कै. आनंद कुंभार स्मृती व्याख्यान सत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी कै. आनंद कुंभार यांच्या इतिहास संशोधन कार्याबद्दल चित्रफित दाखवण्यात आली. तसेच त्यांचा इंट्याक सोलापूरशी असणारा ऋणानुबंध याबाबत




आर्किटेक सीमंतिनी चाफळकर यांनी उजाळा दिला. याप्रसंगी व्यासपीठावर यावेळी इंट्याकचे पदाधिकारी समन्वयक प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, सहसमन्वयक आर्किटेक श्वेता कोठावळे, श्री हि ने वाचनालयाचे पदाधिकारी डॉ. श्रीकांत कामतकर, मोहन सोहनी व रविशंकर कुंभार उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने श्री रविशंकर कुंभार यांचा सत्कार करण्यात आला.

प्रस्ताविक करताना प्रा. डॉ. काटीकर यांनी जागतिक वारसा दिन साजरा करण्यामागचा इतिहास व उद्दिष्ट सांगताना, विविध संस्था, नागरिक यांचे वारसा जतन व संवर्धन या अनुषंगाने असणारी कर्तव्य याबाबतही विवेचन केले. त्याबरोबर इंट्याक सोलापूरचे गतकाळातील कार्य विशद करताना, वारसा दिनानिमित्त हे व्याख्यान प्रतिवर्षी करण्याचा मानस असून, त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे म्हणाले.

व्याख्यान विषय मांडताना पुढे डॉ. पंडित म्हणाले, शहराचे वर्तमान स्वरूप पाहून त्याचा अभ्यास करताना, एकूणच त्याचा वारसा निर्माण-प्रवास अत्यंत रंजक असू शकतो. डॉ. पंडित यांचे विशेषतः मुंबई या शहराबाबतचा वारसा संदर्भातले गेले २५ वर्षाचे संशोधन त्यांनी सविस्तररित्या मांडले. शासनाच्या सहयोगाबरोबरच विविध संस्था, मुंबई विद्यापीठ, साठे महाविद्यालय, विद्यार्थी-संशोधक, प्राध्यापक यांच्या मदतीने मुंबईच्या विविध भागात केलेले पुरातत्वीय संशोधन त्यांनी सचित्र व उदाहरणाद्वारे मांडले. मरोळ, माहीम, कान्हेरी केव्हज अशा अनेक भागांमध्ये केलेले संशोधन व त्यावरून हजारो वर्षाचा मुंबईचा इतिहास व वारसा त्यांनी विशद केला. प्रत्येक शहराचं वस्तुसंग्रहालय हा त्या शहराचा वारसा बाबतचा प्रवास दर्शवणार एक जिवंत उदाहरण असत व प्रत्यक्ष ते असणे आवश्यक आहे. या महत्त्वाच्या मुद्द्याबरोबर त्यांनी, ज्या त्या ठिकाणच्या नागरिकांनी, आपला स्थानिक वारसा बाबत अभिमान बाळगणं व त्याचं जतन संवर्धन करणे त्यासाठीही मार्गदर्शन करत, जागरूकता दर्शविण्याविषयी आवाहन केले.

कार्यक्रमास इंट्याक सोलापूरचे सभासद, इतिहास संशोधक, आर्कि. अमोल चाफळकर, नितीन अनवेकर, आर्कि. पुष्पांजली काटीकर, अरविंद जोशी, प्रा. प्रभाकर कोळेकर, डॉ. शिवाजी शिंदे, जितेंद्र लाड, रवींद्र नाशिककर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. धानेश लिगाडे, प्रा.विनायक सदाफुले, कृपा कुलकर्णी, विनय बुरबुरे, श्रुती दिद्दी, रमेश बटगिरी आदींनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे आभार सहसमन्वयक आर्किटेक श्वेता कोठावळे यांनी केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : डॉ. आंबेडकर मिरवणुकीतील आर.जी.(राजगृह) बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा देखावा.



# ऐतिहासिक देखाव्यातून घडले डॉ. आंबेडकरांच्या कार्याचे दर्शन

## मिरवणुकीने लक्ष लक्ष डोळ्यांचे फिटले पारणे

## उन्हातही जनसागराच्या उत्साहाला उधाण

## डॉल्बीच्या दणदणाटात हायटेक मिरवणूक

## संविधान आणि बुद्धगया महाविहार देखाव्यांवर भर

## तब्बल १२ तास चालली मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

बोलो रे.. बोलो.. जय भीम बोलो.. ताकत से बोलो जय भीम बोलो चा गगनभेदी जय घोष... ढोल, ताशाच्या तालावर आणि डॉल्बीच्या दणदणाटात विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती सप्ताहाची सांगता सोलापुरात रविवारी भव्यदिव्य, दिमाखदार , अतिविराट आणि हायटेक अशा मिरवणुकीने करण्यात आली. आंबेडकरी विचारांचा जागर करत शानदार मनोहारी मिरवणूक पाहून लक्ष लक्ष डोळ्यांचे पारणे फिटले. मिरवणूक मार्गावर रस्त्यांच्या दुतर्फा जनसागराला भरती आल्याचे चित्र पाहायला मिळाले. ऐतिहासिक देखाव्यातून डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी कार्याचे दर्शन घडले. रखरखत्या उन्हातही जगभरातून आलेल्या लाखो आबालवृद्ध भीम सैनिकांचा आंनद व उत्साह ओसंडून वाहत होता. सुमारे १०० मंडळांनी सहभाग नोंदवला.

१४ एप्रिलपासून प्रारंभ झालेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताहाची आज रविवारी या मिरवणुकीने सांगता करण्यात आली. तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची दिमाखदार आणि विराट मिरवणूक जयंती उत्सव मंडळांनी काढली. यंदा प्रथमच सकाळी १२ वाजल्यापासूनच सर्व मंडळांनी मिरवणुकीस सुरुवात केल्याचे दिसून आले. मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य तसेच चळवळीचा इतिहास देखाव्याच्या माध्यमातून उलगडण्यात आला. जगभरातून समाज बांधव सोलापुरात मिरवणुकीला आले होते. मिरवणुकीत बहुजन समाज बांधवांचा उत्साह ओसंडून वाहत होता. लाखो तरुण आणि अबालवृद्ध या मिरवणुकीत डॉल्बीच्या निनादात थिरकताना दिसून आले. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सकाळी ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुकीत महापालिकेच्या मानाच्या गाडीतील प्रतिमेस तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पोलीस आयुक्त एम राजकुमार आणि म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक बुद्धवंदना घेण्यात आली. त्यानंतर मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, ज्येष्ठ नेते विश्वस्त राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे, सुभानजी बनसोडे, एड. संजीव सदाफुले, सुबोध वाघम ोडे, उत्सव समितीचे अध्यक्ष पृथ्वीजीत सरवदे , कार्याध्यक्ष डॉ. सायली शेंडगे, राजा कदम, राजा दावणे, सुग्रीव जेटीथोर , नागेश रणखांबे, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे विश्वस्त आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, मध्यवर्ती उत्सव समितीचे अध्यक्ष विकी शेंडगे, रॉकी बंगाळे उपस्थित होते.

बोलो रे बोलो जय भीम बोलो, ताकत से बोलो जय भीम बोलो, हिम्मत से बोलो जय भीम बोलो अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला. डोळ्याचे पारणे फिटावे असे मनोहारी दृश्य या मिरवणुकांकडे पाहिल्यानंतर दिसून आले. सुमारे १०० हून अधिक मंडळांनी या मि रवणुकीत सहभाग नोंदविला.बहुतांश मंडळांनी डॉल्बीसह भव्य अशा मिरवणुका काढल्या. डॉल्बीवर डॉ. आंबेडकर यांच्या जीवन कार्यासह विविध प्रकारची गाणी वाजविण्यात आली. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान आणि बुद्धगया महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या या विषयांवरचे अधिक देखावे दिसून आले. दरम्यान, या मिरवणुकीसाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ठिकठिकाणी पाणपोईची सोय करण्यात आली होती. मातोश्री रमाबाई आंबेडकर तरुण मंडळ लेझीम संघाने संविधानाचे महत्व आणि त्यातील कलमांनुसार असलेले अधिकार सांगणारा देखावा सादर केला होता.आर.जी. कंपनी संचलित बुध्ददर्शन बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्थेच्यावतीने सिम्बॉल ऑफ नॉलेज हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा देखावा सादर केला होता. फळी तालीम पूर्वविभाग क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने आम्ही भारताचे लोक ही संविधानाची प्रस्तावना आणि संविधानकर्ते डॉ.आंबेडकर हा देखावा सादर करून मिरवणुकीत रंगत आणली.आर.जी. (राजगृह) म ागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाढदिवसानिमित्त राजगृह येथे त्याकाळी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित अस्पृश्य महिला समाजाच्या महिलांचा देखावा सादर केला होता. कर्मवीर सामाजिक संस्थेच्या वतीने मुलगा राजरत्न याचा अंत्यविधी करतानाचा डॉ. बाबासाहेब आणि माता रमाई यांचा भावनिक प्रसंगाचा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. त्याचबरोबर बुद्धभूमी बहुउद्देशीय सामाजिक संस्था : वळसंग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत झालेला वळसंग येथील बावडी लोकार्पणाचा देखावा, ग्लोबल यूथ फाउंडेशन : कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडियाचा देखावा, सम्राट सोशल फाउंडेशन संचलित धाकटा राजवाडा : फिरत्या पृथ्वीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती , सम्राट चौक येथील सम्राट क्रीडा मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली धर्मांतराची घोषणा आणि बौध्द धम्म दीक्षा हा देखावा, तथागत प्रतिष्ठान : पुस्तक वाचतानाचे बाबासाहेब हा देखावा, डी.के. सामाजिक मागासवर्गीय सामाजिक संस्था : चलो बुध्द की ओर हा देखावा, जय भीम मित्र परिवार : बाबासाहेबांची जन्मतारीख असलेला देखावा, भीमशक्ती बहुउद्देशीय सामाजिक संस्था : बुद्धगया बुद्ध विहारचा देखावा, आनंद बौध्द मंडळ : बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण घेतलेले सातारा येथील छत्रपती प्रतापसिंह हायस्कूलचा आकर्षक देखावा, बुध्द राष्ट्र प्रतिष्ठानच्यावतीने बाबासाहेबांची फिरती सही आणि त्यांचा पंचरुपी सुंदर असा देखावा, सम्राट अशोक चौक जयंती उत्सव मंडळ : आरक्षण देणाऱ्या जातींवर बाबासाहेबांचे किती उपकार आहेत हे सांगणारा आणि बुध्दगया देखाव, एस.बी. प्रतिष्ठान : बाबासाहेबांचे भव्य ग्रंथालय साकारले. तर प्रबुद्ध ग्रुप : जग बदलणारा बापमाणूस देखावा, रमांजली सामाजिक संस्था : भारतीय स्त्रीमुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मनुस्मृती दहनभूमी हा देखावा, आम्रपाली तरुण मंडळ : बुद्ध धम्माला पुनर्स्थापित करणारे महान बोधिसत्वांचा देखावा, रमापती तरुण मंडळाच्यावतीने सातारा स्कूलमधील वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेतानाचे बाबासाहेब आंबेडकर, आयडल्स बहुउद्देशीय सामाजिक संस्था : पीपल्स एज्युकेशन सोसायटी, रयत शिक्षण संस्था अन् कर्मवीर भाऊराव पाटील आणि शाळेत मुलाला घेऊन जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा देखावा, विश्वरत्न प्रतिष्ठान : संविधान प्रतिकृती, जी.एम. मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त देशाला सविधान अर्पण करतानाचा देखावा, एकता प्रतिष्ठान : बुद्धगयाचा देखावा, आर.बी. दयावान ग्रुप : बाबासाहेबांचे जीवन कार्य, पंचशील तरुण मंडळ : बुद्धगया वाचवा हा संदेश देणारा देखावा, प्रशिक सामाजिक संस्था : चित्रकार बाबासाहेब देखावा, कबीरा सोशल फाउंडेशन : पत्रकार बाबासाहेब - मूकनायक छापखाना देखावा, थोरला मंगळवेढा तालीम संघ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया सम ोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिकृती साकारण्यात आली होती. तसेच भीम युवक तरुण मंडळ गुजर वस्ती , अशोक जागृती तरुण मंडळ खणी, भीमगर्जना तरुण मंडळ, सिद्धार्थ तरुण मंडळ, सिद्धार्थ फाउंडेशन, भिमरत्न तरुण मंडळ यासह आमराई, देगाव नका, विजापूर रोड, लष्कर आदी मंडळांनी या मिरवणुकीत आकर्षक अशी सजावट केली होती.



### या मार्गावरून काढली विराट मिरवणूक

पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास सकाळी पुष्पहार अर्पण करून व सामुदायिक बुध्दवंदना घेऊन भव्य मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली. ही मिरवणूक डफरीन चौक, जुना एम्प्लॉयमेंट चौक, वाडिया हॉस्पीटल, चांदणी चौक, महापौर निवास, स्टेशन चौक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक(भैय्या चौक), सुपर मार्केट, मेकॅनिक चौक, नवी पेठ, दत्त चौक, माणिक चौक, सोन्या मारुती चौक, मधला मारुती, मंगळवार पेठ, चाटी गल्ली, बाळीवेस, तरटी नाका पोलिस चौकी, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बुधवार पेठ, मिलिंद नगर येथील अस्थी मंदिरासमोर पंचाची चावडी येथे सभेच्या रुपाने रात्री १२ वाजता मिरवणूकीची सांगता झाली.




### मिरवणुकीची वैशिष्ट्ये

- * मुख्य मिरवणूक चालली १२ तास
- * मिरवणुकीत 100 मंडळे सहभागी
- * मिरवणुकीत लाखो अनुयायी सहभागी
- * बंदोबस्तासाठी जवळपास 1600 पोलिस तैनात

### सोलापुरात सन १९५२ पासून मिरवणुकीची परंपरा : राजाभाऊ सरवदे

सोलापूर शहर हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने क्रांतीप्रवण झालेले शहर आहे. सोलापुरात सन १९५२ पासून मिरवणुकीची परंपरा आहे. या मिरवणुकीत महाराष्ट्रासह देशभरातील इतर राज्यातूनही बहुजन बांधव सहभागी होतात. भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. त्या निमित्ताने संविधानाने काय दिले? हे या मिरवणुकीत दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे. जगभरातील सर्वात मोठी आणि नेटकी मिरवणूक म्हणून सोलापूरच्या मिरवणुकीचा नावलौकिक असल्याचेही यावेळी ज्येष्ठ नेते राजाभाऊ सरवदे यांनी सांगितले.

### पुस्तकांसह विविध वस्तूंच्या स्टॉल्सवर गर्दी

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात पुस्तकांसह चळवळीतील विविध साहित्य थाटण्यात आले होते. डॉ. आंबेडकर, बुद्ध आणि महापुरुषांच्या जीवन कार्यावरील पुस्तके, झेंडे, टोप्या खरेदीसाठी विविध स्टॉलवर मोठी गर्दी दिसून आली.

### पोलीस पथकांकडून डॉल्बीची तपासणी

या मिरवणुकीत पोलीस प्रशासनाने एक टॉप आणि एक बेसला परवानगी दिली. नियमाप्रमाणे सर्व मंडळाच्या मिरवणुकीत साऊंड सिस्टिम आहे का? याची तपासणी पोलीस पथकांकडून करण्यात येत होती. साऊंडचा आवाज नियंत्रित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने चांगले प्रयत्न केले.

### ऐतिहासिक विद्यार्थी वसतीगृह देखाव्याने वेधले लक्ष

छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठानच्या वतीने सोलापुरातील थोरला राजवाडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या पहिल्या ऐतिहासिक बकवर्ड क्लास विद्यार्थी वसतिगृहाची प्रतिकृती देखावा सादर केला. या वसतीगृहाच्या कार्याची वर्षपूर्तीकडे लक्ष वेधले.

### पाणी, सरबत वाटप

मिरवणूक मार्गावर विविध सामाजिक संघटनांकडून सरबत, पाणी वाटपाचे स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी तीव्र उन्हात मिरवणुकीत सहभागी झालेल्या भीम अनुयायांनी मोफत अल्पोपहार तसेच पाण्याची सोय केल्यामुळे त्याचा आस्वाद घेतला.

# प्रबुद्ध भारत मंडळातर्फे 'झोपाळ्यात माता रमाई - डॉ. आंबेडकर' देखावा

## दिमाखदार मिरवणुकीने स्फुल्लिंग चेतविले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी.बी. ग्रुप ) यांच्या वतीने ''झोपाळ्यात समाज हिताची चर्चा करताना माता रमाई - डॉ. आंबेडकर'' तसेच छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यांचा भव्य देखावा सादर करण्यात आला.

या देखाव्यामध्ये हरणे बागडत असलेल्या सुंदर बागेत झोपाळ्यामध्ये एकमेकांशी समाज हिताची चर्चा करत असताना माता रमाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. प्रमुख मार्गदर्शक माजी गटनेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली नेटक्या पद्धतीने ही मिरवणूक काढली. रविवारी सकाळी १२ वाजता या मिरवणुकीची सुरुवात विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पोलीस आयुक्त एम राजकुमार आणि महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, अजित बोराडे, उद्योजक इंदरमल जैन, धूत सारीजचे पुरुषोत्तम धूत, मंडळाचे मार्गदर्शक माजी गट नेते आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी , बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सवाचे अध्यक्ष विकी शेंडगे, रॉकी बंगाळे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. दिमाखात ही मिरवणूक मार्गस्थ झाली.





यावेळी पी. बी. ग्रुप प्रमुख गौतम चंदनशिवे, प्रतीक चंदनशिवे, उत्सव अध्यक्ष बाबा गायकवाड, कार्याध्यक्ष प्रथमेश सुरवसे, धीरज वाघमोडे, एस. के. फाउंडेशनचे संस्थापक रविकांत कोळेकर, उपाध्यक्ष महेश श्वाके, सचिव सिद्धांत तळभंडारे, खजिनदार रवी मॅतरोलु ,श्रीमंत जाधव, ॲड. विशाल मस्के आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, यावेळी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी मंडळाच्या देखाव्याचे कौतुक केले. सर्वांनी शिस्तबद्ध रित्या शांततेत मिरवणूक काढण्याचे आवाहन करताना शुभेच्छा दिल्या. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनीही सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

### आदर्श घेण्यासारखा देखावा : आनंद चंदनशिवे

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंडळाच्या वतीने शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली. डॉ. आंबेडकर हयात असताना पासून सोलापूर शहरात मिरवणुकीची परंपरा आहे. त्यामुळे आमच्या मंडळाने समाजाला आदर्श वाटेल असा देखावा सादर केला आहे. सर्व जाती - धर्माचे लोक या मिरवणुकीत उत्स्फूर्तपणे आणि उत्साहाने सहभागी होतात, असे यावेळी मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १०९३

**अंतरींची घेतो गोडी ।**
**पाहे जोडी भावाची ।।**

नि:स्वार्थ प्रेम, आनंद, जिव्हाळा, आपुलकी हे मानवी जीवनाचे आधारस्तंभ आहेत. मानवी जीवनाचे खरे सुख नि:स्वार्थ प्रेमातच सामावलेले आहे. हे सर्व सत्य असतांनाही नि:स्वार्थ प्रेमाची प्रचंड उणीव मानवी जीवनात जाणवते. अशी उणीव निर्माण होण्याला प्रामुख्याने माणूसच कारणीभूत आहे. मानवाचा स्वार्थ हा द्वेष, मत्सर, ईर्षा आदिला जन्म देतो आणि ईर्षा, द्वेष, मत्सराच्या वाढीमुळे माणूस अंतर्गत व बहिर्गत असे वेगवेगळे वर्तन करु लागतो. त्याचे हे वर्तन केवळ मानव जातीपुरतेच मर्यादित असते, असे नव्हे तर तो इतर प्राणीमात्रांबरोबर व साक्षात भगवंतांबरोबरही असेच वेगवेगळया पध्दतीने वागत असतो. आपले अंतर्गत विचार इतरांच्या लक्षात येत नाहीत, असा भ्रमही माणूस बाळगतो. बाह्य गोडवा करुन आपण इतरांना फसवून आपले इच्छित प्राप्त करीत असल्याचा आनंद मानवाला होत असला तरीही खऱ्या अर्थाने तो स्वत:लाच फसवित असल्याचे दु:ख त्याला होत नाही. हे एक आश्चर्यच आहे. प्रत्येकाला जशी नि:स्वार्थ प्रेमाची गरज व आवड आहे, तशी भगवंतालाही आहे, याचा त्याला विसर पडतो. त्याचा हा विसरच त्याच्या भक्तीत कोरडेपणा आणत असतो. माणूस एखाद्यावेळी बाह्यसौंदर्याला, बाह्यवर्तनाला भूलू शकतो, पण भगवंत कसा भुलेल? आपल्याबद्दल आपल्या भक्तांच्या हृदयात किती जागा आहे? त्याचा आपल्याविषयी भाव कसा आहे? हे भगवंत पहातो. भक्ताच्या हृदयातील जागा, गोडी व भाव विचारात घेवून भगवंत भक्ताजवळ जातो. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ।।**

भगवंत मानवाच्या ढोंगाला बळी पडत नाही. पण माणूस माणसाच्या ढोंगाला, बाह्य वर्तनाला बळी पडत असतो. एकमेकांचे अंत:करण जाणून घेईपर्यंत बरेच कांही नुकसान होऊन जाऊ शकते. मनात अहेतू ठेवून गोड गाणे गाणारा पारधी हरणांचे जीव हरण करतो. त्याप्रमाणे बाहेरुन गोडवा दाखविणारे लोक अनेकांचे जीवन उद्ध्वस्त करीत असतात. हे भगवंताला आवडत नाही. मानवी मनाचा, भावनांचा सकारात्मक दृष्टीने विचार करणारा माणूस इतरांची फसवणूक करीत नाही. संतांनी भगवंतांची व मानव जातीची कधीच फसवणूक केली नाही. इच्छित प्राप्त व्हावे म्हणून व्यावहारिक भक्ती करणारा, भगवंतांशी व्यावहारिक तडजोड करणारा मानव इतर मानवांशी चांगला वागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. भगवंत हा प्राणीमात्रातच भरुन उरला आहे, त्याची जाणिव ठेवून माणूस मानवांशी अंत:र्बाह्य सारखाच वागला तर तो इतरांबरोबर स्वत:ही सुखी होऊ शकतो. प्रत्येक जीवाला अंतरीच्या गोडी, भावाची अत्यंत गरज आहे. ही गरज ओळखून माणूस वागू लागला तर संत तुकाराम महाराजांप्रमाणे प्रत्येक जीवमात्रात त्याला भगवंत दिसू लागेल व संतांप्रमाणे माणूसच आदरणिय ठरेल. अंतर्बाह्य समान वागण्याची सुरुवात आपल्या कुटूंबापासून केली तरी बरेच साध्य केल्यासारखे होईल. आपली ही सुरुवात एके दिवशी ज्ञानोबा- तुकारामांच्या आशीर्वादाला पात्र ठरेल, यांत शंका नसावी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. २१ एप्रिल २०२५**
**विक्रम संवत् २०८१**
**शके - १९४७**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - चैत्र**
**कृ. अष्टमी (१८.५८)**
**ऋतु - ग्रीष्म**
**नक्षत्र - उत्तराषाढा (१२.३६)**
**योग - साध्य (२२.५९)**
**करण - बालव (०७.०४)**

**दिनविशेष - चांगला दिवस, भारतीय वैशाख मासारंभ**
**यमाई यात्रा माडी - सोलापूर**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील.

**वृषभ :** समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. दुसऱ्याचा द्वेष करू नका.

**मिथुन :** व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# बाजार समितीच्या हमाल, तोलार मतदारसंघातही काटे की टक्कर

### माजी संचालक पुजारी परिवर्तन पॅनल पुरस्कृत

### हमाल तोलार विभागाचे माजी संचालक पुजारी यांनी ठोकले शड्डू



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

सोलापूर बाजार समितीच्या हमाल तोलार मतदार संघातून माजी आमदार दिलीप माने गटाकडून गफ्फार चांदा यांना उमेदवारी मिळाली आहे. तर आमदार विजयकुमार देशमुख यांच्याकडून अपक्ष माजी संचालक शिवानंद पुजारी यांना उमेदवारी दिल्याचा दुजोरा पुजारी यांनी दिला आहे. तर यासह आठ उमेदवार या मतदार संघातून निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. दरम्यान, हमाल तोलार मतदार संघातून यंदाच्या पंचवार्षिक निवडणुकीत दिपक गदगे, विठ्ठल पुजारी, गुरूशांतय्या पुराणिक, सिध्दाराम रामशेट्टी, भिमराव सिताफळे, सिध्दाराम हिप्परगी हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. विशेष म्हणजे मागील पाच वर्ष संचालक असलेले शिवानंद पुजारी हे पुन्हा एकदा मैदानात उतरले आहेत. हमाल, तोलारांचे प्रश्न मागील एकही संचालकांना सोडविता आलेले नाही. त्यामुळे अनेक अपक्ष उमेदवारांनी या निवडणुकीत मागे न हटण्याचा निर्णय घेतला आहे. सोलापूर बाजार समितीमध्ये हमाल, तोलाराचे जवळपास १ हजार ८४ मतदान आहे. सुमारे ६०० मतदानाहून अधिक मतदान ज्या उमेदवाराला मिळेल तो उमेदवार विजय होईल असे संकेत आहेत. गत संचालक मंडळाच्या निवडणुकीत पुजारी यांनी यामध्ये बाजी मारली होती. त्यांनी सत्ताधारी विजयकुमार पॅनलच्या माध्यमातून निवडणूक लढवली होती. परंतु यंदा विजयकुमार देशमुख हेच निवडणुकीत सक्रिय नसल्याने, पुजारी यांना कोणाला पाठिंबा द्यावे यावर निर्णय घेतला नाही. परंतु जेव्हा विजयकुमार देशमुख यांनी सुभाष देशमुख यांच्या परिवर्तन पॅनलला पाठिंबा दिल्याचे कळल्यानंतर, तात्काळ पुजारी यांनी देखील परिवर्तन पॅनलमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे बाजार समिती परिवर्तन पॅनल पुरस्कृत हमाल तोलार गटातील उमेदवार म्हणून पुजारी यांच्याकडे पाहिले जात आहे. गत पाच वर्षात हमाल तोलार यांच्यासाठी केलेली विकास कामे यंदाच्या वर्षी साथ देतील, अशी आशाही माजी संचालक शिवानंद पुजारी यांनी व्यक्त केली आहे.

### दीपक गदगे, चांदा, पुजारी, रामशेट्टीसह आठ जण रिंगणात

बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये हमाल आणि तोलार या गटातून आठ उमेदवार जण उमेदवार आहेत. यापूर्वीच्या निवडणुकीत चांदा आणि दीपक गदगे यांनी आपले नशीब आजमावले होते. परंतु माजी संचालक शिवानंद पुजारी यांना यात यश मिळाले होते. एक जागेसाठी आठ उमेदवार रिंगणात उतरले असले तरी निवडणुकीच्या शेवटच्या दिवशी कोण-कोणाला पाठिंबा देईल हे अद्याप सांगणे कठीण आहे. परंतु देशमुख मालकांचा आशिर्वाद गतवर्षी पुजारी यांना मिळाला होता. यावर्षीही मिळाला असल्याचे त्यांचे म्हणणे असल्याने यामध्ये कोण बाजी मारणार हे मात्र निवडणुकीनंतर समजणार आहे.

# अंगणवाडीच्या २०५ कर्मचाऱ्यांना नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची भरती प्रक्रिया सुरु आहे. जिल्ह्यात ४८ सेविका आणि १५७ मदतीनीसांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. तर उर्वरित कर्मचाऱ्यांना पुढील आठवड्यात नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील बऱ्याच अंगणवाडीमध्ये सेविका, मदतनीसांच्या जागा रिक्त असल्याने महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने ११३ सेविका, २५३ मदतनीसांचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यातील

२०५ कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश दिले आहेत. अंगणवाड्यांमध्ये सेविक, मदतनीसांची भरती होत असल्याने बालकांची शैक्षणिक गुणवत्ता वाढ होण्यास मदत होणार आहे.

अंगणवाडीतील रिक्त पदांची टप्प्याटप्प्याने भरती होत आहे. सर्व रिक्त पदावर अंगणवाडी सेविका, मदतनिसांच्या पूर्ण जागा भरण्यात येणार आहेत.

### नियुक्ती आदेश दिलेले कर्मचारी संख्या

करमाळा - १९, माढा - १५, टेंभूर्णी - ७, माळशिरस - २०, अकलूज - ११, मंगळवेढा -६, मोहोळ -११, पंढरपूर - ९४, सांगोला - ७, कोळा - ५, दक्षिण सोलापूर १० असे एकूण २०५.

शासनाकडून जिल्ह्यातील अंगणवाडीमध्ये रिक्त असलेल्या सेविका, मदतनीसांची भरती प्रक्रिया सुरु आहे. २०५ कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश दिले आहेत. उर्वरित १६१ अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पुढील आठवड्यात नियुक्ती आदेश देण्यात येईल.

**- प्रसाद मिरकले, जिल्हा कार्यक्रम अधिकारी,**
**महिला व बालकल्याण, जि.प. सोलापूर**



# राज मेमोरियल स्कूलमध्ये उन्हाळी प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

जुनी मिल कंपाऊंड मुरारजी पेठ येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलमध्ये इयता चौथी ते सातवी तील विद्यार्थ्यांकरिता आर्म कॅडेट कोर्स महाराष्ट्र यांच्यावतीने उन्हाळी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. मुख्याध्यापिका रोहिणी सुरा, आर्म कॅडेट कोर्सचे कमांडर निलेश कसबे यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती, स्वर्गीय विष्णुपंत तात्यासाहेब कोठे, स्वर्गीय राजेश अण्णा कोठे, स्वर्गीय महेश अण्णा कोंठे यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून व पूजन करून उन्हाळी प्रशिक्षण शिबिराची सुरुवात करण्यात आली. शिबिरात विद्यार्थ्यांना कमांडो पी.टी., समंत्र सूर्यनमस्कार, स्व संरक्षण, रायफल व पिस्तूल शूटिंग, आर्चरी, लाठी काठी दांडपट्टा तलवारबाजी, रस्सीखेच, या खेळाचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण देऊन मुलांकडून प्रात्यक्षिक रित्या ते करून घेण्यात आले. तसेच एडवेंचर ऍक्टिव्हिटीज, जीप लाईन, फन गेम्स, आट्या पाट्या, हूला हुप, बलुन पॉप, फन रेस, सारखे सांघिक खेळ घेण्यात आले. कॅम्पसाठी डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, विलास बेत, मुख्याध्यापिका सुरा यांचे मागदर्शन लाभले. कॅम्प यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक कादीरहुसेन चोपदार, क्रीडा शिक्षक आशितोष जाधव, अतुल सोनके यांनी परिश्रम घेतले.

# होटगी संस्थेत परमपूज्य तपोरत्न जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

श्री बृहन्मठ होटगी संचलित एमआयडीसी येथील चन्नवीर नगरातील श्री गुरु होटगीश्वर आश्रम मध्ये तपोरत्न जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री.श्री. श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी काशी महापीठ यांच्या अध्यक्षतेखाली लिं. श्री. ष. ब्र. परमपूज्य तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींची ९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यासमयी डॉ. राजेंद्र घुली,यांच्या शुभहस्ते मठातील वेदमूर्ती जगन्नाथ शास्त्री व जंगम बटूंच्या वैदिकत्वाखाली परम पूज्य तपोरत्न योगिराजेंद्र यांचे पूजन करण्यात आले. परमपूज्य श्री.श्री.श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते पूज्य तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या मूर्तीस पुष्पमाला अर्पण करण्यात आले. त्यानंतर उपस्थित डॉ. राजेंद्र घुली डॉ.राजीव मठ यांच्याकडून श्रीमद जगद्गुरुंना मालार्पण करण्यात आले. परमपूज्य तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या जयंती उत्सवानिमित्त श्रीक्षेत्र होटगी गावांमधील तपोरत्न मंदिरात गुरु गादीस व बाळीवेस मठात रुद्राभिषेक करण्यात आले. याशिवाय श्री.बृहन्मठ होटगी शैक्षणिक संस्थेतील सर्वच शिक्षण शाखांमध्ये योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांची ९५ वी जयंती उत्सव मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाले. एमआयडीसी येथील आश्रमामधील कार्यक्रमास संस्थेचे सचिव श्री शांतय्या स्वामी सर, मल्लू पाटील, स्वामीनाथ कलशेट्टी सर, हणमंतू पाटील ,शांतू सर, यमनप्पा होटगोंड सर,संतोष हिरेमठ, बसू स्वामी,श्रीशैल मठपती व सोलापूर,होटगी, बोरामणी, धोत्री, दर्गनहळ्ळी, आदि गावातील सदभक्त मंडळी आणि मद्वीरशैव गुरुकुलातील समस्त जंगम बटू आदि भक्तगण उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थित भक्तगणांना महाप्रसादाची सोय करण्यात आली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी याउद्देशाने ८ ते १४ एप्रिल या कालावधीत राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आयुक्त, म.न.पा. डॉ. सचिन ओंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिक्षक सोलापूर अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते संविधान वाचन करून बौद्धवंदना करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांना भारतीय संविधानाची प्रत व पुष्पगुच्छ सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय सोलापूर यांनी केले असून, कार्यक्रमास सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण सोलापूर मनीषा फुले, संशोधन अधिकारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सचिन कवले व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील कर्मचारी, तालुका समन्वयक, महामंडळाचे व्यवस्थापक, प्रकल्प अधिकारी, समतादूत व वसतिगृहाचे विदयार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन राजश्री कांबळे यांनी केले.

### विवाहितेचा छळ ; पतीसह नऊ जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी वेळोवेळी शिवीगाळ करून पाच लाख रुपये व चार तोळे सोने व घरामध्ये लागणारे साहित्य आण नाहीतर तू माझ्याकडे राहू नको असे म्हणून हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक त्रास दिल्याची फिर्याद प्राजक्ता सोमनाथ प्रक्षाने (वय-२५,रा. जिल्हा परिषद शाळेजवळ हडपसर,पुणे) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती सोमनाथ, सासू शोभा,ननंद राधिका गायकवाड,आम्रपाली, रामा,पतीचा मामा भाऊराव व पतीचे मावस बहीण मनीषा,महेश लोखंडे,अनिता शिंदे (राहणार पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



# विरभद्र मंडळाच्या शिबिरात ५३ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विरभद्र महिला मंडळाच्या वतीने इंडिया न्यूज फास्ट चैनल संपर्क कार्यालयात रक्तदान शिबीर घेण्यात आले. सर्व प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटीक) चे शहराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र क्षीरसागर, महिला मंडळाची संस्थापिका संगीता बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. बाळासाहेब गायकवाड, नरेंद्र क्षिरसागर आदिंनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पपन मस्के, किशोर गायकवाड, युसूफ शेख, नागेश हरोळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबीरात ५३ रक्तदातांनी रक्तदान केले. प्रास्ताविक प्रविण बिराजदार यांनी केले, तर आभार संगीता बिराजदार यांनी मानले.


# जनआक्रोश मोर्चाची नियोजन बैठक बुधवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य शाखा सोलापूर यांच्या वतीने २० मे रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर धडकणाऱ्या आक्रोश मोर्चाच्या नियोजन बैठकीस अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरण चळवळीतील सर्व कार्यकर्त्यांनी आणि विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षातील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन माजी राज्यमंत्री उत्तमप्रकाश खंदारे आणि सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य समन्वयक सुरेश पाटोळे यांनी केले आहे.

ही बैठक बुधवार दि.२३ मे रोजी प्रथम हॉटेल, सात रस्ता येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण या चळवळीत काम करणारे सर्व आजी-माजी आमदार, आजी -माजी खासदार, मंत्री महोदय उपस्थित राहणार आहेत. क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शिफारस केलेल्या ६८ शिफारशीपैकी एकाही शिफारशींची अंमलबजावणी केली नाही म्हणून सरकारने बजेटसह तरतुद करून या शिफारशींची अमंलबजावणी करण्यासाठी सर्व खात्याना परिपत्रक काढावे.

# शौचालय अनुदानाच्या प्रतीक्षेत अडीच हजार लाभार्थी



| | |
|---|---|
| * शौचालये उद्दिष्टे | ३८९२ |
| * पूर्ण झालेली शौचालय | ३४७१ |
| * थांबलेली कामे | ४२१ |
| * अनुदान दिले | १०६६ |
| * निधीची गरज | ३ कोटी |

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालये पूर्ण केलेल्या १०६६ लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान जमा केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांना अनुदान देण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी केली आहे. ज्या लाभार्थ्यांच्या शौचालयाचे काम अपूर्ण आहे. त्यांनी बांधकाम पूर्ण करुन प्रस्ताव सादर करावा. निधी आल्यास तत्काळ अनुदान जमा केले जाईल.

**- अमोल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

जिल्हा परिषदेच्या स्वच्छता आणि पाणीपुरवठा विभागाच्या वतीने स्वच्छ भारत मिशन टप्पा दोन अंतर्गत जिल्ह्यात वैयक्तिक शौचालयांची कामे सुरु आहेत. हजारो शौचालयांची कामे पूर्ण झाली आहेत. अडीच हजार लाभार्थी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. अनुदान मिळत नसल्याने शेकडो शौचालयांची कामे थांबली आहेत.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राज्यात मागील ११ महिन्यांत ८० हजार तर जिल्ह्यात साडेतीन हजार वैयक्तिक शौचालये बांधली आहेत. जिल्ह्यात तीन हजार ८९२ शौचालयांचे उद्दिष्ट होते. त्यातील तीन हजार ४७१ शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्यातील फक्त एक हजार ६६ लाभार्थ्यांना अनुदान मिळाले आहे. अद्यापही अडीच हजार लाभार्थी अनुदानापासून वंचित आहेत. वैयक्तिक शौचालये पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना मार्च अखेरीस अनुदान मिळेल अशी आशा होती. मात्र, शासनाकडून निधी न आल्याने जिल्ह्यातील अडीच हजार लाभार्थी अनुदानाची वाट पाहत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळातर्फे वकील आप्पासाहेब दिवटे यांना श्रध्दांजली

**बार्शी, दि. २० एप्रिल-**

श्री भगवंत सहकारी पुरवठा संस्था समूहाचेवतीने दि. १५ एप्रिल रोजी मातृ मंदिर, ढगे मळा या ठिकाणी कै. गोपालकृष्ण वासुदेव दिवटे उर्फ आप्पासाहेब (वकील) यांना भावपूर्ण श्रध्दांजली शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी कै आप्पासो दिवटे यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन श्रध्दांजली वाहण्यात आली. बार्शीतील उपस्थित वकील मंडळीमध्ये ॲड. सर्वश्री ए. आर. देशपांडे, बापूसाो करंजकर, सुभाष जाधवर, शिवाजी क्षीरसागर यांनी त्यांचे वकीली व्यवसायाम ध्ये कै. आप्पासो यांनी केलेले मार्गदर्शन आजही आम्हांस उपयोगी पडते. याबाबत सविस्तर मनोगत व्यक्त केले. सर्वश्री. भागवतराव बडवे, बापुराव केसकर, सौ. अमृता देशपांडे, सुशील पाटील यांनी कै. आप्पासाो प्रती असलेल्या भावना व्यक्त केल्या. कै. तात्यासाो देशमुख व कै. आप्पासाो दिवटे यांचे संस्थेशी असलेले मैत्रीपूर्ण संबध व त्याबाबतचे कै. आप्पासो यांचे संस्थेप्रती असणारे प्रेम व जिव्हाळा याबाबत संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ. बी. वाय. यादव, ॲड. असिफभाई तांबोळी, आनंद कुलकर्णी (अंबेजवळगेकर) यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी कै. आप्पासाो यांचे प्रतिमेस सर्वांनी फुले अर्पण करुन भावपूर्ण श्रध्दांजली वाहून त्यांचे प्रतिमेसमोर नतमस्तक होवून त्यांचे आत्मांस सद्गती लाभो अशी श्री भगवंत चरणी प्रार्थना केली. सभेस सर्वश्री नंदकिशोर देशमुख, उमेश ठोंबरे, ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ, ॲड. प्रसाद कुलकर्णी, दादासो बुडूख, मिठूशेठ सोमाणी, श्री भगवंत सहकारी संस्था समूहाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन रविंद्र माचवे यांनी केले.



### प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते नामवीणा सप्ताहाचा शुभारंभ

**अक्कलकोट, दि. २० एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवातील अखंड नामवीणा सप्ताहाची सुरुवात आज दिनांक १९ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता झाली. या नामवीणा सप्ताहाचे शुभारंभ मंदिर समितीचे चेअरमन व मा.नगरसेवक महेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी मुख्य गाभाऱ्यात मंदार महाराज पुजारी यांच्या हस्ते वीणा पुजन होऊन सत्संग महिला भजनी मंडळ यांचे भजन झाले. तदनंतर मंदार महाराज पुजारी व महेश इंगळे यांचे हस्ते प्रथमेश इंगळे यांच्या हाती वीणा देण्यात आला. श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवात अखंड नामविणा सप्ताहास अनन्य साधारण म हत्व असून सतत ७ दिवस हा वीणा खाली न ठेवता मुखाने स्वामी नाम घेत अखंड चालू ठेवणेची परंपरा आज देखील देवस्थानने जपली आहे. याप्रसंगी उज्वला सरदेशमुख, इरपा हिंडोळे, कौशल्या जाजू, प्रदीप हिंडोळे, अक्षय सरदेशमुख, बाबर, निर्मलाताई हिंडोळे, तेली, स्वाती गंभीरे, भंडारे, प्रसाद सोनार, बाळासाहेब घाटगे, शिवाजीराव घाटगे, प्रसन्न हत्ते, नागनाथ गुंजले, गिरीश पवार, काशिनाथ इंडे, श्रीशैल गवंडी, ऋषिकेश लोणारी उपस्थित होते.




### जाकिर तांबोळी मित्र परिवाराकडून जयंती मिरवणुकीत ज्यूस वाटप

**अक्कलकोट, दि. २० एप्रिल-**

येथील जाकिर तांबोळी व मित्र परिवाराच्या वतीने शुक्रवार दि. १८ एप्रिल रोजी काढण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणूक मध्ये ज्यूसचे वाटप करण्यात आले. एपीआय पवार यांच्या हस्ते ज्यूस वाटप करण्यात आले. सदरचा कार्यक्रम हा बस स्थानकासमोर घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे प्रकाश गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते तम्मा मामा शेळके, जाकिर तांबोळी, आरपीआय तालुका अध्यक्ष अविनाश मडिखंबे, सोहेल बागवान, समीर शेख राहुल शेळके, सद्दमस शेख, अनिल मोरे, ओंकार कांबळे, स्वामीराव लोणारी, रवी कोरे, भीमा कोळी, अप्पू किनगी, अनिल लोणारी, आदम शेख रोहित जाधव आदी उपस्थित होते.

### फॅशन ब्रँड वन ह्यूसेनचा नवा स्टोअर

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

भारतातील प्रीमियम फॅशन ब्रँड वन ह्यूसेनने आता सोलापूरमध्ये आपले नवीन स्टोअर सुरू केले आहे.सरस्वती चौक,सिटी कॉर्नर,संकेत लॉजच्या समोर,या प्रमुख ठिकाणी वसलेले हे नवीन स्टोअर,शहरातील फॅशनप्रेमींसाठी खास आकर्षण ठरणार आहे.वन ह्यूसेन सोलापूर हे स्टोअर २,०१५ स्क्वेअर फूटमध्ये पसरलेले असून,आधुनिक व सुबक रचनेमुळे ग्राहकांना मोकळेपणाने आणि सहजपणे खरेदी करता येईल असा अनुभव देण्यावर भर आहे.येथे पुरुष आणि महिलांसाठी फॉर्मल,कॅज्युअल व ॲक्सेसरीज यांचा उत्कृष्ट संगम उपलब्ध आहे. स्टाइलची नवी व्याख्या - सोलापुरात या स्टोअरमध्ये मर्यादित किंवा एक्सक्लुझिव्ह कलेक्शन्स नसले तरी, नवीन सीझन ट्रेंड्स आणि मुख्य कलेक्शन्स नेहमी उपलब्ध असतील.स्वच्छ रचना, न्यूट्रल टोन आणि मॉडर्न डिझाईन यामुळे एक अत्याधुनिक पण आरामदायक शॉपिंग वातावरण निर्माण केले आहे.

# कासेगावात घुमला 'शिव पार्वते शिव हर हर महादेव'...चा गजर

## शंभू महादेव कावड यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि.२० एप्रिल-**

कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामदैवत शंभू महादेवाची कावड यात्रा शिव पार्वते शिव हर हर महादेवच्या जयघोषात वाद्यवृंदाच्या निनादात मि रवणूकीने संपन्न झाली.

येथे १३ व्या शतकाच्या उत्तरार्धातील सुमारे आठशे वर्षांपूर्वीचे पुरातन हेमाडपंथी शंभू महादेव मंदिर आहे. सालाबाद प्रमाणे या शंभू महादेवाची कावड यात्रा मोठ्या उत्साहवर्धक व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. शिखर शिंगणापूर येथे शंभू महादेवाचे मंदिर बांधणाऱ्या राजा सिंघणदेव यांच्या कारकीर्दीत त्यांचे प्रधान हेमाद्रीपंत यांच्या मार्गदर्शनाखाली कासेगाव (तालुका दक्षिण सोलापूर) येथे शिंगणापूर सारखीच रचना असणारे मंदिर बांधण्यात आले. सिंहासनावरील शिवलिंग दुर्मिळ असल्याचे येथील जेष्ठ मंडळी सांगतात.

मंदिराची रचना अशा पध्दतीची आहे कि सकाळच्या वेळी सूर्याची किरणे लिंगावर पडतात. मंदिर अतिशय सुबक रेखीव आहे. मंदिरातील दगडावर सुंदर नक्षीकाम असून दगडी खांब कोरीव व आकर्षक आहेत. शिखराबर हनुमान व इतर देवदेवतांच्या मुर्ती आहेत. वरच्या बाजुला १२ ज्योतिर्लिंग आहेत. लिंगासमोर पितळी धातुचा नंदी आहे. सध्या या मंदिराचे पुरातत्व विभागामार्फत संवर्धन व जतन करण्याच्या उद्देशाने नुतनीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे मंदिराचा संपूर्ण ढाचा उतरवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे यंदाच्या कावड यात्रेवरही त्याचा परिणाम



दिसून आला. येथील कावडीचे मानकरी वाडकर व गंगेवाडीचे जाधव परिवारातर्फे कावडकाठी शिखर शिंगणापूर येथे नेऊन महादेवाला जलाभिषेक करण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे.

चैत्र शुक्ल दशमीला भाविक कावड घेऊन शिंगणापूरसाठी निघतात. अवघड अशा मुंगी घाटातून कावड नेत असताना श्रद्धेची कसोटी लागते. घाटातून कावड नेण्यासाठी महादेवानेच मदत करावी यासाठी भाविक म्हाद्या धाव, म्हाद्या धाव अशी आरोळी देतात. त्यानंतर तळ्यामध्ये कावड काठीला स्नान घालण्यात येते. कावडीने शिवलिंगास जलाभिषेक करण्यात येतो. शिवभक्त दिवसभर उपवास करतात. द्वादशीला पारणे करून परत निघतात. गावी परत आल्यानंतर कृष्ण पक्षातील चतुर्थीला कासेगाव येथे यात्रा भरते. पहिल्या दिवशी रोकडे मळा येथे भंडारा करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी नगरप्रदक्षिणा करण्यात आली. सायंकाळी थोरला मळा येथे भंडारा करण्यात आला. रात्री पारंपारिक वाद्यांच्या गजरात गावातून कावडीची मिरवणूक काढण्यात आली. पहाटे चार वाजता विठ्ठलरूक्मीणी मंदीराच्या प्रांगणात मिरवणुकीची सांगता झाली. आरती झाल्यानंतर कावडीचे गंगेवाडीकडे प्रस्थान झाले. तिसऱ्या दिवशी सायंकाळी जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी गावोगावचे मल्ल सहभागी झाले होते. यात्रा यशस्वी करण्यासाठी सरपंच यशपाल वाडकर, नितीन वाडकर, महेश वाडकर, पुरुषोत्तम वाडकर, माजी उपसरपंच शंकर वाडकर, निशांत वाडकर, गणेश वाडकर, शिवदास वाडकर, रामदास वाडकर, बळीराम वाडकर, श्रीराम कुंभार, नितीन स्वामी, सोमनाथ स्वामी यांच्यासह समस्त वाडकर बांधवांसह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# अन् चक्क चिखलठाण्यात झाले राधा गाईचे डोहाळजेवण

## अर्जुन गव्हाणे यांनी गाईला लेकीप्रमाणे सजवत केला पंचपक्वानाचा बेत

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२० एप्रिल-**

चिखलठाण (ता. करमाळा) येथील अर्जुन गव्हाणे यांची गाय राधाचे डोहाळजेवण कार्यक्रम धुमधडाक्यात पार पडला. यावेळी राधाला हिरव्या चाऱ्यांबरोबरच पुरणपोळीचाही घास भरवण्यात आला. गव्हाणे यांनी गाईला लेकीप्रमाणे सजवत कार्यक्रम ासाठी उपस्थित सर्व महिला व पुरुषांसाठीही पंचपक्वानाचा बेत करण्यात आला होता.

हौसे ला मोल नसतं म्हणतात ते काही खोटं नाही याची प्रचिती चिखलठाण येथील शेतकरी गव्हाणे यांच्या डोहाळ जेवणाच्या वेळी नक्कीच चिखलठाणकरांना आली आहे. तिला स्वच्छ धुवून रंगवले हार फुलांनी तिला सजवलेफ पंचपकवान्न व वेगवेगळ्या प्रकारची फळे ताटात मांडून नवी कोरी साडी तिला भेट देऊन सुवासिनी महिलांनी तिची ओटी भरून तिचे पूजन केले. गव्हाणे यांना लहानपणापासूनच जनावरे



सांभाळण्याचा छंद आहे आजपर्यंत बैल,गायी महेश शेळ्या अशा वेगवेगळ्या जनावरांना त्यांनी लळा लावला आहे.

काळाच्या ओघात शेतीमध्ये बैलाऐवजी ट्रॅक्टरचा वापर सुरू झाला आणि बैल जोडी कुठे दिशेन अशी झाली परंतु जातिवंत शेतकऱ्यांनी मात्र गावरान गाई बैल पाळणे सोडलेले नाही. अर्जुन गव्हाणे यांना जनावरे सांभाळण्याचा छंद असल्याचे पाहून त्यांच्याच भाकीतील एकाने त्यांना तीन ते चार महिन्याचे लहान कालवड सांभाळण्यासाठी दिली अर्जुन यांनी तिचे नाव राधा ठेवले लहानपणापासून तिचा लाड केला होता शेतातील निवडक चांगला चारा तिला खाण्यासाठी मिळत असे सर्व परिवाराची ती लाडकी होती. अर्जुन यांचा मुलगा ऋषिकेश याने पशुसंवर्धन विषयांमध्ये पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे तोही तिची विशेष काळजी घेत असे पहिल्यांदाच ती गाभण राहिल्यानंतर सर्व परिवाराला मोठा आनंद होता. तिला सातवा महिना झाल्यानंतर सर्व परिवाराने कार्यक्रम करण्याचे नियोजन केले आणि यानुसार सर्व नातेवाईक मंडळींना निमंत्रण देऊन डोहळ जेवण साजरे करण्यात आले.



# अधिकारी बनलेल्या रावगावच्या माजी विद्यार्थ्यांची शाळेला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२० एप्रिल-**

रावगाव (ता. करमाळा) येथील पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि सध्या उदगीर येथे उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेले सुशांत शिंदे आणि मुंबई या ठिकाणी पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असणारे प्रवीण बुधवंत यांनी आपल्या मातृशाळेला नुकतीच भेट दिली.

यावेळी बोलताना त्यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत शाळेतील शिक्षकांशी आणि विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. आपल्या यशाचा प्रवास सांगताना विद्यार्थ्यांना मेहनत, शिस्त आणि सातत्य यांची महत्त्व पटवून दिले. पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयातील शिक्षणच आमच्या आयुष्याची घडी घालणारे ठरले, असे सांगत शिक्षकांचे मनःपूर्वक आभार मानले.

मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनी सुशांत शिंदे व प्रवीण बुधवंत यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत केले. यावेळी ज्यांना नुकताच क्रांतिसूर्य महात्मा फुले समता पुरस्कार मिळाला आहे असे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते भास्कर भाऊ पवार, प्रशांत शिंदे, नानासाहेब कांबळे, मेजर शहाजी ओव्हाळ, सचिन जौंजाळ यांचादेखील सन्मान शाळेच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी दोन्ही अधिकाऱ्यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत विविध शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले आणि शाळेला आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

# कोटलिंग देवाच्या यात्रेची जय्यत तयारी

## आज सायंकाळी छबिना मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २० एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील सर्वात मोठी समजली जाणारी चिखलठाण येथील कोटलिंग देवाच्या यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली असून उद्या सोमवारी २१ एप्रिल रोजी सायंकाळी छबिना मिरवणूक होणार आहे.

राज्यातील सोलापूर सातारा पुणे नगर धाराशिव जिल्ह्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या करमाळा तालुक्यातील कोटलिंग देवाची यात्रा चैत्र कृष्ण अष्टमी म्हणजेच २१ एप्रिल रोजी छबिना मिरवणूक संपन्न होत असून चिखलठाण कोटलींग मंदिर येथे तालुक्यातील यात्रेदरम्यान विविध ठिकाणाहून आलेल्या यात्रेकरूंना सुखकरपणे सर्व व्यवस्था व्हावी यासाठी आरोग्य, सार्वजनिक बांधकाम विभाग,महावितरण, राज्य परिवहन महामंडळ, पोलीस विभाग, पंचायत समिती, यात्रा समिती ग्रामपंचायत व ग्रामस्थांची यात्रा कालावधीत जबाबदारी निश्चित करून कार्यवाहीच्या सचना दिल्या आहेत.यानुसार सर्व विभागांची तयारी पूर्ण झाली असून यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये यात्रा कालावधीत पुरेसा पोलिस बंदोबस्त, तैनात असेल तातडीच्या उपचारासाठी ॲम्ब्युलन्स,



प्रथमोपचार व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध असतील तसेच यात्रेकरूंच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली करण्यात आली आहे.महावितरणच्या वतीने परिसरात पुरेशा प्रकाशनासाठी दिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच ग्रामस्थ, यात्रासमीती व ग्रामपंचायतींच्या वतीने परिसरात स्वच्छता करण्यात आली असून स्वच्छ पाणीपुरवठ्याची सोय करण्यात आली आहे.

दि. २१ एप्रिल रोजी पहाटे पाच वाजल्यापासून या देवाच्या मानाच्या कावडी धार घालण्यास सुरुवात करतील, दिवसभर दंडवट, नवस फेडणे, देवदर्शन होऊन सायंकाळी साडेअकरा वाजता आरती होऊन छबिना मि रवणूक होणार यात्रेपूर्वी वीस दिवसांपासून या देवाला तेल लावले जाते तेंव्हापासून ससा- म ासा, देव पारध, देव शिकारीला जाणे, कोटलींग जोगेश्वरी विवाह सोहळा आंबील पौर्णिमा उत्सव असे कार्यक्रम होतात या कालावधीमध्ये मांसाहार करणे, शेती मशागतीची कामे, दाढी करणे, केस कापणे गादीवर झोपणे या गोष्टी या गावात पूर्णपणे बंद असतात चैत्र अष्टमीला मुख्य छबिना मिरवणूक होते या दिवशी देवाच्या मानाच्या कावडी धार घालतात यानंतर दुसऱ्या दिवशी शेळी जत्रा नंतर बाजार व तेल उतरवणे असे कार्यक्रम होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे.

# श्री स्वामी समर्थ पादुका सोहळ्याचे बुधवारी अक्कलकोटकडे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २० एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ महाराज पादुका सोहळ्याचे बुधवार दि. २३ रोजी श्री क्षेत्र अक्कलकोट कडे प्रस्थान होत असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली.

स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री क्षेत्र वेळापूर ते श्री क्षेत्र अक्कलकोट अशी चार दिवसांची पादुका सोहळा यात्रा काढली जाते. यात्रेचे हे १६ वे वर्ष आहे. बुधवार दि. २३ रोजी पहाटे ६ वाजता श्री नवनाथ बनकर व सौ प्रिती बनकर या उभयतांच्या हस्ते श्रींची प्रस्थान पूजा, अभिषेक व आरती करण्यात येईल. त्यानंतर पादुका श्री अर्धनारी नटेश्वर मंदिरात आणल्या जातील. वेळापूर, बोंडले, पिराची कुरोली मार्गे पहिल्या मुक्कामासाठी श्री क्षेत्र पंढरपूरला पोहोचतील. गुरुवार दि. २४ रोजी श्री क्षेत्र पंढरपूर, देगाव, सुस्ते, तारापूर मार्गे वरकुटे मुक्कामी पोहोचेल. शुक्रवार दि. २५ रोजी वरकुटे, कुरुल, कामती, तिऱ्हे, देगावमार्गे सोलापूर मुक्कामी पोहोचेल. शनिवार दि. २६ रोजी सोलापूर येथून पादुकांची विधीवत पूजा व आरती होवून हा सोहळा सकाळी ८ वाजता विजयबाग अक्कलकोट येथे पोहोचेल. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने पादुकांचे स्वागत, पूजा होईल. स्वामी भक्तांना येथे न्याहारी दिली जाईल. तेथून हा सोहळा श्री क्षेत्र अक्कलकोट येथील समाधी मठ येथे दर्शनासाठी पोहोचेल. सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री गुरु मंदिर येथे भजन व पुण्यतिथीचा सोहळा साजरा केला जाईल. आरती, महाप्रसाद व विश्रांतीनंतर सायंकाळी ४ वाजता हा सोहळा श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात पोहोचेल. तेथे दर्शन घेवून हा सोहळा वेळापूरकडे परतीच्या प्रवासासाठी मार्गस्थ होईल.

### बंद घराचा दरवाजा तोडून घरातील साहित्य लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल -**

बंद घराचा कडी-कोंयडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील लोखंडी कपाट तीन घागरी तांब्याचे एक टेबल फॅन दोन शिलाई मशीन असे साहित्य चोरून नेल्याची घटना २० मार्च ते १६ एप्रिल दरम्यान एसटी कॉलनी सोलापूर येथे घडली.

याप्रकरणी श्रीकृष्ण अर्जुनराव अंबुरे (वय-७५,रा.देवदत्त टावर, बाळीवेस) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार हार हे करीत आहेत. या घटनेने परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.

# अक्कलकोटच्या गटशिक्षण अधिकाऱ्यावर वार्षिक वेतनवाढ रोखण्याचा प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल -**

मार्चअखेर असताना वेळेत बिले सादर न केल्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील शिक्षकांच्या इतर देयकापोटी शासनाकडून आलेले दीड कोटी परत गेल्याप्रकरणी अक्कलकोटचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांना जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

अक्कलकोट तालुक्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्या कार्यपद्धती बाबत तक्रारीत वाढ झाली आहे. मार्चअखेर असताना तालुक्यातील शिक्षकांच्या थकीत वेतन व इतर देयकापोटी आलेले सुमारे दीड कोटी रुपये परत गेले आहेत. याबाबत संबंधित शिक्षकांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे धाव घेत शिक्षण विभागाच्या कारभाराचा पाढा वाचला आहे. त्यामुळे आमदार कल्याणशेट्टी यांनी याबाबत प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना संपर्क साधून संबंधित शिक्षकांना न्याय द्यावा व ज्यांच्यामुळे या चुका झाल्या आहेत त्यांच्यावर कारवाई करावी अशा सूचना केल्या आहेत. प्रभारी गटशिक्षण अधिकारी प्रशांत आरबाळे यांच्या कार्यपद्धतीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आर्थिक दुर्बल घटकांतील मुलीना शाळेच्या प्रवाहात आणण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिदिन एक रुपये प्रमाणे वर्षभरात जास्तीत जास्त २२० रु देण्यात येणारा उपस्थिती भत्ता दिलेला नाही. सन २०२३-२३ -२४ वर्षातील दारिद्र्यरेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता वाटपासाठी अनुक्रमे दोन लाख ७० हजार ६०० रुपये आणि एक लाख ४८ हजार ७१६ रुपये इतका निधी प्राप्त होवूनही वितरणास दुर्लक्ष झाले आहे.

बेटी बचाओ-बेटी पढाओ शासनाचे धोरण असून मुलींच्या शिक्षणासाठी शासन सातत्याने विविध उपक्रम, योजना, आर्थिक मदत याद्वारे मदत करत असताना अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभाग मात्र याकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करत आहे. थेट लाभ हस्तांतरण डीबिटी हे शासनाने धोरण अवलंबिलेले असतानाही वादग्रस्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी आरबळे यांच्याकडून सन २०२२-२३ चा निधी मुख्याध्यापक खात्यावर वर्ग करण्यात आला आहे. परंतु त्यातील मोठ्या प्रमाणात खाती बंद असल्याने सदर निधी विद्यार्थीनीना प्राप्त झाला नाही. तसेच सन २०२३-२४ चा निधी प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे परत गेला. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पुरवणी तसेच थकित देयकासाठी संचालक कार्यालयाकडून ५९ कोटी रुपयांचा निधी जिल्हा परिषदेस प्राप्त झाला होता. या निधीतून शिक्षकांचे सातव्या वेतन आयोगाचे थकलेले हप्ते, महागाई फरक प्राधान्यक्रमाने अदा करावेत असे न्यायालयाने आदेश दिल्याने जिल्हा परिषर शिक्षण विभागाने तशा सूचना दिलेल्या होत्या. तसेच चट्टोपाध्याय वेतनग्रणी फरक, आंतरजिल्हा बदलीने हजर शिक्षकांचे थकित वेतन, विज्ञान वेतनश्रेणी प्राप्त शिक्षकाचे देयक, सातव्या वेतन आयोगाचे हफ्ते भरणा करणे आवश्यक होते.परंतु प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्यामुळे अक्कलकोट तालुका वगळता जिल्हयातील अन्य तालुक्यातील शिक्षकांचे देयके अदा करण्यात आली आहेत. सोलापूर जिल्हयातील १० तालुक्यातील ६ कोटी २१ लाख ४९ हजार ४३२ रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला. परंतु अक्कलकोट तालुक्यातील एक ते दीड कोटींचा निधी प्राध्यामिक शिक्षकांना मिळाले नाही. याबाबत प्राथमिक शिक्षणा धिकारी कादर शेख यांनी अरबाळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. समाधानकारक उत्तर न दिल्यास एक वर्षाची वेतन वाढ रोखण्याची कारवाई केली जाईल असेही नोटीशीत इशारा देण्यात आला आहे.

# बोरगाव(दे.) येथील यात्रेत आज कव्वाली कार्यक्रम

### रंगारंग कव्वालीची होणार जुगलबंदी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० एप्रिल-**
तालुक्यातील बोरगाव (दे) पीर राजेबकसार यात्रेस २० एप्रिल पासून प्रारंभ झाला असून २१ एप्रिल रोजी सायंकाळी ९ वाजता मुबंईचे सुप्रसिद्ध कव्वाली गायक मोईन नाझा यांचा काव्वालीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून भोपाल येथील प्रसिद्ध कव्वाली गायिका इंतजार चिस्ती यांच्या सोबत जुगलबंदी होणार असून या दोघात सामना रंगणार आहे.

सालाबादा प्रमाणे याहीवर्षी अक्कलकोट तालुक्यातील पिर राजेबकसार यात्रा निमित्ताने बोरगावं (दे) यात्रेस रविवारपासून प्रारंभ होत असून रविवार २० रोजी गावात पिर राजेबकसार देवाचा गंध ढोल ताशा वाजा गाजत गावातून निघते गंध चडवण्याचा कार्यक्रम होणार आहे.सोमवार २१ रोजी देवाला चिराग, नैवद सायंकाळी ९ वाजता कव्वाली चा महा मुकाबला कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. २२ रोजी देवाची जियारत होणार असून अशा प्रकारे कार्यक्रम असून पिर राजेबकसार यात्रा ही गावातील हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र मिळून मिसळून साजरा करतात या यात्रेस बाहेरून गावातून येणाऱ्या भक्तासाठी स्वागत यात्रेतील सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा आणि सहकार्य करावे अशी माहिती पिर राजेबकसार उरूस कमिटी व ग्रामस्त मंडळ बोरगावं (दे) यांनी दिली आहे.

## महत्वाचे...



### दक्षिण तालुक्यात धम्म प्रबोधन शिबिर

**सोलापूर, दि.२० एप्रिल-**
क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समतेचे नायक महात्मा बसवेश्वर यांच्या संयुक्त जयंती निमित्त बौद्धजन सेवक संस्था, पुणे व भीमगर्जना प्रतिष्ठान टाकळी यांच्या वतीने पाच दिवसीय धम्म प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समारोपीय कार्यक्रमा वेळी घनश्याम वासनिक यांनी पंचशील माणसाला धनवान, बलवान, शीलवान बनवते असा उपदेश केला. दक्षिण सोलापुरातील टाकळी, औज, कारकल, भंडारकवठा, माळकवठा, विंचूर येथे पाच दिवसीय धम्म शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भीमगर्जना प्रतिष्ठानच्या वतीने पाच दिवशीय शिबिर राबवण्यासाठी खास पुण्यातून आलेल्या घनश्याम वासनिक, ॲड. रवी पाटील, संजय महाजन, अनुप गडलिंग, सुरेश बनसोडे, संतोष गायकवाड, सतीश शिंदे, विलास गायकवाड यांचा फेटा व पंचशील उपरणे देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी चंद्रशेखर गायगवळी, लक्ष्मी कदम, मीनाक्षी घाडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल केंगार, प्रशांत तुर्भे, पुरुषोत्तम गायकवाड, लालसाब बोरगी, राजकुमार गायकवाड, राजशेखर गायगवळी, बोलूशा साबळे, दिलीप चांदकवठेकर, रमेश साबळे, प्रकाश साबळे आदींनी परीश्रम घेतले.

### मंगळवेढयात बेकायदा होर्डिंग्ज

**मंगळवेढा, दि. २० एप्रिल-**
येथील असणाऱ्या मुख्य रस्त्यावर नगरपालिकेच्या मालकीच्या असणाऱ्या जागेत संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदा होर्डिंग्ज लावले आहेत.




याची चौकशी करून नगरपालिकेच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी जनतेतून होत आहे. याबाबत अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून सांगून देखील याची दखल घेत नाहीत. या उलट होर्डिंग्ज लावणाऱ्याना पाठीशी घालत आहेत. मंगळवेढा शहरात मुख्य रस्त्यावर असणाऱ्या नगरपालिकेच्या मालकीच्या जागेत अनेक वेळा अनाधिकृत होर्डिंग्ज संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने लावण्यात येतात.याबाबत संबंधित अधिकार्याकडे तक्रार करून सुद्धा या बाबीकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे. तरी बेकायदेशीर होर्डिंग लावणाऱ्यावर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावी अशी जनतेतून मागणी होत आहे. नगरपालिकेने कारवाई न केल्यास सदर घटनेबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घ्यावी लागणार आहे.

### महिलेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस एक वर्षाची शिक्षा

**करकंब, दि. २० एप्रिल-**
सन-२०२२ मध्ये महिला फिर्यादी यांचे घरासमोर मौजे मेंढापूर ता.पंढरपूर या ठिकाणी आरोपी लक्ष्मण गहीनिनाथ पाटोळे राहणार मेंढापूर याने जाऊन महिलेस तुझा नवरा कुठे गेला आहे?त्याच्याकडे माझे पैसे राहिले आहेत.त्याने पैसे दिले नाही तर तू आत्ताचे आत्ता माझे सोबत चल माझे सोबत संबंध ठेव असे म्हणून त्याने फिर्यादीचे



उजव्या हाताला धरून फिर्यादीला शरीर सुखाची मागणी करून फिर्यादीस मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून माझे पैसे दिले नाहीत तर मी तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देऊन शिवीगाळ केल्याचे कारणावरून करकंब पोलीस ठाण्याकडे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात आरोपी लक्ष्मण गहीनाथ पाटोळे (रा.मेंढापूर ता.पंढरपूर) यास अटक करण्यात आली होती. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक दत्तात्रय वाघमारे यांनी करून सदर गुन्ह्याचे दोषारोपत्र प्रथम वर्ग न्यायालयात दाखल केले होते. सदर गुन्ह्यांमध्ये प्रथम वर्ग न्यायदांडाधिकारी पी.बी घोरपडे यांनी सदर गुन्ह्याची सुनावणी घेऊन आरोपी लक्ष्मण गहीनाथ पाटोळे (रा. मेंढापूर ता.पंढरपूर) यास दोषी धरून एक वर्ष साधा कारावास व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. यामध्ये सरकारतर्फे सरकारी वकील याकूब एम.मुल्ला यांनी कामकाज पाहिले. सदर गुन्ह्यामध्ये पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, प्रभारी अधिकारी सागर कुंजीर यांचे मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी बंडू कुंभार यांनी काम पाहिले.

### ठाकरे बंधूच्या एकत्रित येण्याने मराठी माणूसही एकवटेल : माजी मंत्री हर्षवर्धन पाटील

**पंढरपूर,दि.२० एप्रिल -**
महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने राज आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही बंधू एकत्र येत असतील.तर त्यांचे आम्ही निश्चितच स्वागत करू. ठाकरे बंधू एकत्र आल्यामुळे मराठी माणूस एकवटेल. यावेळी महाराष्ट्रात काय होईल हे सांगण्याची गरज नाही अशी प्रतिकिया माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केली. ठाकरे कुटुंबीय आणि हर्षवर्धन पाटील ही एकमेकांचे पैपाहुणे आहेत. यानिमित्ताने ठाकरे बंधूंच्या एकत्रीकरणाच्या प्रस्तावावरच हर्षवर्धन पाटील यांनी आनंद व्यक्त केला.

# अक्कलकोटमध्ये धार्मिक पर्यटनासह वाढले व्यवसाय

## रोजगाराच्या संधी उपलब्ध : हॉटेल, प्रवासी वाहतूक, प्रासादिक वस्तूंची होतेय मोठी उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि.२० एप्रिल-**
अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ भक्तांच्या संख्येत दिवसागणिक प्रचंड वाढ होत आहे. वटवृक्ष स्वामी मंदिर, बुधवार पेठेतील समाधी मंदिर, स्टेशन रस्त्याचा राजेराय मठ, राम गल्लीतील गुरु मंदिर, टिळक गल्लीतील जोशी मठ, अन्नछत्र मंडळ, शिवपुरीतील अग्निहोत्र, बॅगेहळ्ळीचा विश्रांती मठ आदि ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटक यात्री भाविकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे येथील युवकांना रोजगाराच्या नवनविन संधी उपलब्ध होऊन हॉटेल, प्रवासी वाहतुक, प्रासादिक वस्तुंची उलाढाल वाढली आहे.

तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविकभक्त येतात. गुरुवार, शनिवार- रविवार, पोर्णिमा, सलग शासकीय सुट्ट्या तसेच वर्षातून विविध धार्मिक सण, श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सव , प्रकटदिन उत्सव, गुरुपौर्णिमा, दत्तजयंती, गुरुप्रतिपदा, त्रिपुरारी पोर्णिमा, आषाढी, कार्तीकी, माघी, चैत्री पंढरीची वारी काळात मोठ्या प्रमाणात भाविक अक्कलकोट तीर्थक्षेत्री दर्शनार्थ येतात. त्यामुळे अक्कलकोट शहर व परिसरातील विविध भागात विविध व्यवसायांना चालना मिळाली आहे. दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. येथे आलेले भाविक तुळजापुर, गाणगापुर, पंढरपुर या जवळच्या तीर्थक्षेत्री जाण्यासाठी स्वतंत्र वाहन भाड्याने घेतात. त्यामुळे छोट्या चारचाकी वाहनाची संख्या येथे वाढली आहे. अनेक युवकांनी या छोट्या प्रवासी वाहनाचा व्यवसाय करण्यावर



भर दिला आहे. येथे ओमीनी, ट्रॅक्स, क्लुजर आदि प्रवासी वाहतुक वाहने आता वाढल्याचे चित्र आहे . अनेक भाविक मुक्कामासाठी हॉटेल, लॉज यास पसंती देतात त्यामुळे हॉटेल व्यवसायाकिंची संख्याही वाढली आहे. भाविकांची वाढती गर्दी ही आता अक्कलकोट शहरातील स्थानिकांना रोजगार देणारी ठरली आहे. अक्कलकोट धार्मिक पर्यटनाचे केंद्र ठरले आहे. हॉटेल खानावळ व्यवसाय, लॉजिंग, धार्मिक वस्तंची दुकाने, चहा तसेच नाष्टा विक्री करणारे व्यवसाय, वडापाव, भजी सेंटर, ढाबे यांचीही संख्या वाढत आहे. गर्दीच्या वेळी लॉजिंग व्यवसाय तेजीत चालतात. भाविकांची गर्दी वाढली की शहरातील व परिसरातील खासगी घरेही भाविकांना भाड्याने दिली जात आहेत. यामुळे अनेकांना चांगला रोजगार उपलब्ध होत आहे. अक्कलकोट-सोलापूर, अक्कलकोट -गाणगापूर, अक्कलकोट-तुळजापूर यासह सर्वच महामार्गावर हॉटेल तसेच ढाबे मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. गर्दीच्या काळात या महामार्गावरील हॉटेल आणि ढाब्यांवर जेवणासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसत आहे. दररोज हजारो रुपयांची उलाढाल हॉटेल आणि ढाब्यांवर होत आहे. महामार्गावर रिसॉर्ट ही वाढले आहेत. श्री स्वामी समर्थ मंदिर

> आगामी काळात शेत शिवार पर्यटन, मनोरंजनाचे पार्क, वॉटर पार्क, रिसॉर्ट, कृषी पर्यटन, हुर्डा महोत्सव विविध उद्योगधंदे वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पर्यटक यात्री भाविकांच्या गर्दीमुळे अनेक व्यवसाय वाढीमुळे आर्थीक उलाढाल वाढली आहे. रोजगाराच्या शोधार्थ लगतच्या जिल्ह्यातील रहिवाशी येथे उपजिविकेसाठी मोठया प्रमाणात स्थलांतरीत होत आहेत.

परिसरातील धार्मिक वस्तू, पुस्तके, पोथी, ग्रंथ, श्रीचे फोटो, स्टीकर, मुर्ती, कंठी माळा, स्फटीक रूद्राक्ष विक्री करणारे टुकाने वाढली आहेत. प्रासादिक वस्तु नारळ, खडीसाखर, पेढे, अष्टगंध, अगरबत्ती, धुप विक्री करणारी दुकानेही मोठ्या प्रमाणात आहेत. या दुकानांमध्ये यात्रा काळात गर्दीच्या वेळी लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. मंदिर परिसरातील धार्मिक वस्तू विक्री करणाऱ्या दुकानांमुळे रोजगार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक सुशिक्षित बेरोजगार हे आज व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर तसेच श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळासमोरील परिसरात छोटे चहा विक्रेते, नाष्टा विक्री करणाऱ्या टपऱ्या, पान, थंडपेय ज्युस सेंटर, भजी वडापाव विकणारे छोटे व्यवसायिक यांचेही व्यवसाय तेजीत आहेत. परगावच्या भाविकांच्यां गर्दी मुळे रिक्षा व्यवसाय ही तेजीत चालत आहे. हजारो बेरोजगार युवकांना हाताला काम मिळत आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज माढा दौऱ्यावर


**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २० एप्रिल-**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज माढा शहरातील राजवी ऑइल मिलच्या भूमिपूजन आणि शिवसेना मेळाव्यासाठी माढा दौऱ्यावर येत असून शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांच्या वतीने मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुंबईहून विमानाने सोलापूर येथे आगमन होईल व तेथून हेलिकॉप्टरने माढा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालय मैदानावर हेलिकॉप्टरने येणार असून तेथून ते मोटारीने राजवी ॲग्रो ऑइल मिलच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी माढा शेटफळ रोड लगतच्या कार्यक्रम स्थळावर उपस्थित राहतील. भूमिपूजन नंतर शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांच्या मेळाव्याला संबोधित करतील यासंदर्भातील संपूर्ण तयारी झाली असल्याचे शिवाजीराव सावंत व राजवी ऑइल कंपनीचे चेअरमन पृथ्वीराज सावंत यांनी सांगितले आहे. या कार्यक्रमाला राज्याचे मंत्री शंभूराज देसाई, मंत्री शरद गोगावले, महंत श्री शिव रूपानंद स्वामी, राजपुरोहित बेदमूर्ती, रवींद्र भगवान पाठक यांच्यासह आमदार अभिजीत पाटील, करमाळा तालुक्याचे आमदार नारायण आबा पाटील, सांगोल्याचे माजी आमदार शहाजीबापू पाटील माजी आमदार धनाजीराव साठे उपस्थित राहणार आहेत.

> **५०० तरुणांच्या हाताला काम मिळणार**
>
> राजवी ऑईल मिल सुमारे ५८ कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. यामध्ये ५०० टीसीडी क्षमता आणि १०० टन ऑइल रिफायनरी क्षमता आहे. १५ एकर परिसरात हा प्रकल्प उभारला जाणार आहे. या माध्यमातून जवळपास ५०० तरुणांना वेगवेगळ्या प्रकारचा रोजगार मिळणार आहे.
>
> **- पृथ्वीराज सावंत, चेअरमन राजवी ऑइल मिल**

# भगवंत महोत्सवानिमित्त वृक्ष संवर्धन समितीकडून मंदिराची स्वच्छता



### हेल्थ क्लब बार्शी आणि कर्मवीर ढोल ताशा ध्वज पथकाचाही सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० एप्रिल-**
श्री भगवंत जयंतीनिमित्त होणाऱ्या भगवंत महोत्सवाचे औचित्य साधून वृक्ष संवर्धन समितीमार्फत भगवंत मंदिराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी हेल्थ क्लब बार्शी तसेच कर्मवीर ढोल ताशा पथक बार्शी यांचे सदस्य देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला सर्व मंदिर झाडून काढून स्वच्छ करण्यात आले. मंदिरातील गाभाऱ्यात देखील स्वच्छता करण्यात आली. मंदिराचे खांब पुसून स्वच्छ करण्यात आले. त्यानंतर पाण्याने सर्व मंदिर धुवून स्वच्छ करण्यात आले.

बार्शी शहर व परिसरात दररोजच्या श्रमदानातून वृक्षारोपण तसेच संवर्धन वृक्ष संवर्धन समितीमार्फत केले जाते. त्याचबरोबर समितीमार्फत महापुरुषांच्या जयंती तसेच श्री भगवंत जयंतीनिमित्त गेल्या चार वर्षापासून स्वच्छता मोहीम राबविले जाते. सकाळी सहा वाजल्यापासून नऊ वाजेपर्यंत ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जवळजवळ शंभर लोकांनी या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. मंदिर स्वच्छतेनंतर मंदिरातील पुजारी सुशांत बडवे यांनी वृक्ष संवर्धन समितीचे उमेश काळे, हेल्थ क्लब बार्शीचे भगवान लोकरे आणि कर्मवीर ढोल ताशा पथकाचे हर्षद लोहार यांचा श्रीफळ देऊन सत्कार केला. संदीप पवार यांनी आभार मानले.

# कवी, लेखकांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते



### ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास

### मागे वळून बघताना व जागल या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० एप्रिल-**
कवी, लेखक यांचे अंतरंग, संवेदना, समाजमन, मानवतावादी दृष्टिकोन यांचे प्रतिबिंब त्यांचे साहित्यात उमटत असते. लेखक व कवीची भूमिका, माणूस म्हणून स्वीकारलेली नाय्य बांधिलकी वाचकांना अंतर्मुख बनविते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा बार्शी यांचेवतीने आयोजित केलेल्या 'मागे वळून बघताना' या कवी प्रकाश गव्हाणे लिखित काव्यसंग्रहाचे तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अरुण नवले लिखित 'जागल' कादंबरी, 'ओढ मातीची' लघुनिबंध संग्रह व 'गंध मातीचा' ललित लेख संग्रहाचे प्रकाशन समारंभ प्रसंगी केले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. कृष्णा इंगोले हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ लेखक व समीक्षक डॉ. रणधीर शिंदे हे होते.

प्रकाश गव्हाणे हे ग्रामीण शेतकरी कुटुंबातील असून देखील विस्तारित, राष्ट्रव्यापी भविष्याचे सुंदर चित्र साकार करु शकतील, असे कवी लेखक होतील अशी अपेक्षा सार्थ ठरवतील. अध्यक्षीय भाषणात डॉ. कृष्णा इंगोले यांनी केले. 'तुटलेले धागे' हा ललित संग्रह प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा आहे. असे नमूद केले. यावेळी डॉ. दत्ता घोलप यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर म.सा.प. शाखा बार्शीचे अध्यक्ष पां. न. निपानीकर, कवी व प्रकाशक इंद्रजित घुले, राजेंद्र अत्रे, प्रा. चंद्रहंस गंभीर, डॉ. चंद्रकांत मोरे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. रविराज फुरडे यांनी केले. प्रास्ताविकामधून 'मागे वळून बघताना' चे प्रभावी विवेचन केले. डॉ. फुरडे यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. स्वागत गीत अंजली गव्हाणे यांनी सादर केले. सूत्रसंचालन नीता देव यांनी केले तर आभार बी. आर. देशमुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी गव्हाणे, अंजली गव्हाणे, प्रकाश महामुनी, कल्याण घळके, गिरीश सोनार, प्रा डॉ.रविराज फुरडे, आबासाहेब घावटे, मयुरी बाबर, मिठू नाना काळदाते, डॉ. श्री व सौ मंजुश्री मुळे, दत्ता गोसावी, प्रा. प्रमिला देशमुख यांनी परिश्रम घेतले.

# अखेर मंद्रुप-नांदणी नवीन रस्त्याचे काम सुरू

### दैनिक तरुण भारतच्या वृत्ताची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**
मंद्रूप-नांदणी गावाला जोडणारा दोन किलोमीटर रस्ता खड्ड्यांनी भरला असून वाहने चालवताना वाहन चालकांना त्रास होत आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्यावर नवसाला पावणारा गणेश मंदिर असून गणेश भक्तांची मोठ्या प्रमाणात ये जा असते. त्यामुळे येथील वर्दळ पाहून मंद्रूप नांदणी रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी दैनिक तरूण भारत सोलापूरने पाठपुरावा केला. अखेर मंद्रुप नांदणी गावाला जोडणारा रस्ता अधिक रूंदीकरणासह नवीन रस्ता तयार करण्यात येत असल्याने प्रवाशांमधून दैनिक



तरूण भारत सोलापूरचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.प्रवाशी व नवसाला पावणाऱ्या गणेश भक्तांच्या मागणीनुसार दैनिक तरूण भारत सोलापूरने गुरूवार ३ एप्रिल रोजी बातमी प्रसिध्द करून आ. सुभाष देशमुख यांनी लक्ष देण्याची मागणी केली होती. त्यानुसार या रस्त्याची निविदा काढून रूंदीकरणासह दर्जेदार नवीन रस्ता बनविण्यात येत आहे. सध्या या रस्त्यावरील खड्डे बुजवून मुरूमीकरण करण्याचे काम सुरू आहे. हा नवीन रस्ता अधिक रूंदीचा व दर्जेदार झाल्यास कर्नाटकला जाणार्या वाहनचालकांचे त्रास कमी होणार आहे.

> आ. सुभाष देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे नवीन रस्त्यांसाठी निधी उपलब्ध झाले आहे. मंद्रुप ते नांदणी रस्त्यावरील गणेश मंदिरापर्यंत दोन किलोमीटर अंतराचे आठ मीटर रूंदीकरणासह नवीन रस्ता बनविण्यात येत आहे. येळेगाव-गावडेवाडी-वांगी व नांदणी गावाना जोडणाऱ्या रस्त्यासाठी ३. ५६ कोटी निधी मंजूर आहे. त्यानुसार मंद्रुप-नांदणी रस्त्याचे मुरूमीकरण दर्जेदार डांबरी रस्ता बनविण्यात येणार आहे.
>
> **- अजिंक्य उंबरजे, ठेकेदार**

> **२० वर्षानंतर नवीन रस्ता**
>
> मंद्रुप-नांदणी गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर दीड ते दोन फूट खड्डे होते. या रस्त्यावरच गणेश मंदिर असल्याने खड्यांचे भक्तांनाही त्रास होत असे. वीस वर्षापूर्वी हा रस्ता बनविण्यात आला होता. आ. सुभाष देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे निधी मिळाल्याने दर्जेदार नवीन रस्ता तयार होत आहे. त्यामुळे गणेशभक्तांची संख्या वाढणार असून वाहनचालकांचे प्रवास आरामदायी होणार आहे.
>
> **- निलेश हेळकर, प्रगतशील शेतकरी, मंद्रुप**